म. ग्रं. सं. ठाणें

विषय

लेखक ... डोंगरे

संग्रहालय क्रमांक

पुस्तकाचें नांव ... ज्ञानी

३५६

# रा. रा. पुरुषोत्तम भास्कर डोंगरे,

कारकून तालुका अलीबाग, यांणीं रचिलें

तें

रा. रा. केशव रावजी गाडगीळ कारकून

मार्केट पोष्ट—आफिस—मुंबई, यांणीं

मुंबई येथें,

जगदीश्वर छापखान्यांत छापविलें.

सन १८८९ इसवी.

( हें पुस्तक सन १८...

तत्संबंधी सर्व ...

This book belongs to

Moro Lakshman Parachure

Clerk Court Callian

17th November 1889

कोल्हापूर येथील राजाराम कालेजचे प्रिन्सिपाल यांणीं १५०रुपयांचें बक्षीस दिलेलें.

# भीमसिंग आणि पद्मिनी नाटक.

हें

रा. रा. पुरुषोत्तम भास्कर डोंगरे.
कारकून तालुका अलीबाग, यांणीं रचिलें
व
रा. रा. केशव रावजी गाडगीळ कारकून
मार्किट पोष्ट–आफिस–मुंबई, यांणीं

मुंबई येथें.

'जगदीश्वर' छापखान्यांत छापविलें.

सन १८८९इसवी.

(हें पुस्तक सन१८६७ च्या २५ व्या आक्टाप्रमाणें नोंदून, तत्संबंधी सर्व हक्क प्रकाशकानें आपल्याकडे राखिले आहेत.)

किंमत १० आणे
ट. हा. एक आणा.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

# प्रस्तावना.

हें नाटक प्रसिद्ध होण्याचें सर्वस्वीं श्रेय राजाराम कालेजच्या प्रोफेसर लोकांचे सभेला व त्यांचे अध्यक्ष मेहेरबान प्रिन्सिपाल साहेब यांस आहे. सदहु सभा व राजमान्य राजश्री विष्णु मोरेश्वर माहाजनी एम्. ए. हेडमास्तर हायस्कूल उमरावती, यांणीं या संबंधीं केलेल्या महत्वाच्या सूचनांबद्दल त्यांचे फारफार आभार आहेत. त्यांप्रमाणें यांत जितकी व्हावी तितकी दुरुस्ती करण्याला फुरसत न सांपडल्यामुळें दिलगिरी वाटते.

आमचे मित्र, रा. रा. केशव रावजी गाडगीळ ग्रंथप्रकाशक यांचे या कामीं जे परिश्रम झाले आहेत त्यांचा व जगदीश्वर छापखान्याचे मालक रा. रा. नारायण रामचंद्र सोहनी यांणीं मुदतींत पुस्तक छापून देण्याचें कबूल करून त्याप्रमाणें काम शेवटास नेलें त्याबद्दल त्यांचाही येथें उल्लेख न करणें हा कृतघ्नपणा होणार आहे.

अल्लीबाग,<br>
ता. २५ सप्तंबर १८८९. — पुरुषोतम भास्कर डोंगरे.

सूचना. तीन तासांतच खेळ होण्याचे सोईसाठीं तिसरा अंक सबंध गाळला तरी चालेल.

प्रकाशकाची विनंति.

पुस्तक तपासून प्रसिद्ध करण्याचा हा पहिलाच प्रसंग, व तशांत नियमित वेळांत पुस्तक छापून तयार होणें जरूर; या कारणामुळें कांहीं ठिकाणीं अशुद्ध राहिलें असेल त्याबद्दल सुज्ञ वाचक क्षमा करतील अशी आशा आहे.

के. रा. गा.

# भीमसिंग आणि पद्मिनी नाटक

नाटकांतील मुख्य स्थळः—चितूरशहर (मेवाड देशाची राजधानी)

नाटकांतील कथानकाचा काळः—ख्रिस्ती शकाच्या तेराव्या शतकाची अखेर.

## नाटकांतील मुख्य पात्रें.

### पुरुष.

भीमसिंगः .... .... .... .... .... ....मेवाड देशाचा राणा.

ऊरसिंग ऊर्फ कुंवरजीः .... ....भीमसिंगाचा वडील पुत्र.

हमीरसिंग .... .... .... .... .... ....ऊरसिंगाचा पुत्र.

संग्रामसिंगः .... .... .... .... ....राण्याचा एक परमविश्वासु मंत्री.

केसरीसिंग, राजसिंग, मानसिंग } .... ....राण्याचे फितुरी दरबारी लोक.

गोरा आणि बादल .... .... ....पद्मिनीचा चुलता आणि भाऊ.

अल्लाउद्दीन .... .... .... .... ....दिल्लीचा बादशहा.

मालदेव .... .... .... .... .... ....बादशहाला फितूर असलेला एक रजपूत सरदार.

ज्ञानदेवमहाराज .... ..............एक महासाधु आळंदीकर.

याखेरीजः—भाट, हुजुऱ्ये, बातमीदार इत्यादि इत्यादि.

### स्त्रिया.

पद्मिनी .... .... .... .... .... ....भीमसिंगाची राणी.

शांता ऊर्फ सुशीला..............ऊरसिंगाची राणी

याखेरीजः—शाहजादी, ग्रामदेवी वगैरे उपपात्रें आहेत.

# भीमसिंग आणि पद्मिनी.

## एक दुःख परिणामी नाटक.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

### श्लोक

( मंगलाचरण )

बीजा बीजत्वशक्ति प्रकटति जिथुनीः जीवना जीवशक्ति; ॥
भूतां भूतत्व; तत्वां स्थिति निपजविली तात्विकी[1] ज्या प्रभावें ॥
दृश्या दृश्यांतरात्मा; प्रकृतिविकृतिला मूल जें; स्वांतें[2] शांतें[3] ॥
तर्क्यातर्क्या अशातें प्रणति[4]; गुणगणा नेणतां अर्पिजेली ॥१॥

" सूत्रधारः— ( शिष्टाचारपूर्वक हात जोडून प्रस्तावना करितो. )

॥ ओंव्या ॥

॥ या विश्व[5]- प्रांतें- रंगणीं ॥ दिवस्या नक्षत्रें, चंद्र, दिनमणि ॥
॥ अंबरें[6] सुंदर चांदिणीं[7] ॥ अचलें[8] कनाथी साजिऱ्या ॥ १ ॥
॥ गर्द देखावे दरी खोरें[9] ॥ समुद्र, नद्या; जलाशय फवारे[10] ॥
॥ स्थावर प्रेक्षकजन सारे ॥ कामक्रोधादि गायक ॥ २ ॥
॥ जेथें काल पारिपार्श्वक[11] ॥ प्राणीमात्र सवंगडे[12] देख ॥
॥ सूत्रधारू जगन्नायक ॥ नाट्यलाघव दाखवी ॥ ३ ॥

---

१ तत्व संबधी. २ आपल्याच ठायीं अंत आहे ज्याचा. ३ ब्रह्मालाही शांत ही संज्ञा आहे. ४ नमस्कार. ५ विश्व हेंच कोणी रंगभूमि ६ आकाश ७ छत ८ पर्वत; अथवा न ढळणाऱ्या ९ नाटकांत सीन १० कारंज्याचे तुषार ११ सूत्रधाराचा साथीदार १२ सोंगाडे.

॥ जैसें जैसें कर्मसूत्र ॥ नाचती तैसे सर्वत्रें ॥
॥ परि सत्पात्रांचें चरित्र ॥ विचित्र कैसें पाहा हो ॥ ४ ॥
॥ "कीं होवो सर्वस्व-हानि ॥ प्राण जावोत कीं निदानीं ॥
॥ परि सत्पथा वर्जोनी ॥ न ढळती ते अणुरेणु ॥ ५ ॥ "
॥ दिसेल याचा अनुभव ॥ हा सत्वशील भीमसेन राव ॥

( पडद्यापलीकडे ) कोणरे ए गाणार, खडा रहा–

सूत्रधारः–( दचकून )

॥ अरे हा कोतवाल रामसिंह ॥ गस्त आली पळा हो ॥ ६ ॥

( लगबगीनें निघून जातो )

---

१ सर्वकाळ २ सज्जन अथवा नाटकांतील उत्तमपात्रें ३ राणाभीमसिंग

# अंक पहिला.

## प्रवेश १ ला.

स्थळः—चितूरशहर; राजरस्ता. वेळः—रात्र.

( शहरचा कोतवाल रामसिंग व जमादार सरूपसिंग हे गस्त घालीत येतात. )

**कोतवालः**—अरे, कोण वेळ आहे? आणि गातोस काय? कशाचा तुला येवढा आनंद झाला आहे?

**जमादारः**—हुजूर, अस्मानाला केलेला गोळीबार वांया आहे.

**कोतवालः**—( इकडे तिकडे पाहून ) रास्त आहे. येथें कोणी नाहीं ठिकाणावर.

**जमादारः**—मला वाटतें, आतांचा हा पळपुट्या गवय्या त्या दुस्मान झालोरकराचा साथीदार—

**कोतवालः**—शिवशिव! त्या फंदफितुऱ्याचें नांव कशाला घेतां? जीभ विटाळेल. त्यानें गलीमाचे कांहीं हेर शहरांत शिरकावले आहेत. जरूर त्याचा छडा लागला पाहिजे.

( दोघे पुढें चालूं लागतात. )

**कोतवालः**—( दर्डावून ) कोण ए, जाणार, थांब.

( पडद्या पलिकडे ) "राधाकृष्ण, राधाकृष्ण, राधाकृष्ण."

**कोतवालः**—अच्छा, जाव. ( जमादारास अनुलक्षून ) सरूपसिंगजी, हा तो ठाकुरजीचा पुजारी. शेजारती होऊन चालला आहे.

**जमादारः**—आज संध्याकाळीं लालबगीचांतील जळमंदिरांत रोषनाई कां केली होती?

**कोतवालः**—माहित नाहीं? त्या गलीमाच्या बदमाष पाद-

शहानें ‘ पद्मिनीराणी माझ्याकडे ओलीस पाठवा, नाहींतर किल्ला सर करून सर्वशहर जमीनदोस्त करीन’ .असा उर्मट बेपर्वाईचा निरोप पाठविला आहे! करितां मंत्रीमंडळ तेथें जमलें होतें. शहाच्या फौजेनें किल्याच्या तटबंदीला प्रतितट तर घातलाच.

जमादारः–तर मोठी मजा झाली. फार दिवस बसलेला आपल्या तरवारींचा गंज तरी उडेल. ( दूर पाहून ) बरें, पण ते-ते-चोरमाफक बगीच्यानजीक कोण दबतदबत येताहेत.

( दोन पुरुष दबत दबत येतात. )

जमादारः–( पुढें होऊन ) कोण आहे ? उभे रहा.

दोन्हीपुरुषः–साव.

जमादारः– काय बिल्ला आहे ?

एकपुरुषः– ‘ गफूर ’.

कोतवालः– ( दरडाऊन ) काय? काय आहे?

दुसरापुरुषः– नाहीं नाहीं, ‘ काफूर ’.

कोतवालः– नीट बोल. ‘काफूर’ की ‘ काफर ’? ( मनांत ) यांचें बोलणें, पेहराव, यांचें कचरणें, इत्यादिकांवरून खास हे परकी असावे. मात्र म्यां पहिला विल्ला फिरवून चोरांकरितां दुसऱ्यानदां ‘ कापूर ’ बिल्ला ठरविला; पण तोही यांनां कळला, ही मोठी आश्चर्याची गोष्ट आहे. असो. ( उघड )बोला. ‘ गफूर ’ ‘ काफूर,’ किंवा ‘ काफर ’

दुसरापुरुषः–(जरा गोंधळून ) हुजूर, ‘ काफूर ’ च.

कोतवालः–(मनांत) आपला तर्क खचीत आहे. ‘ कापूर ’ ही वार्ता सुद्धां यांच्या कानीं दिसत नाहीं. तो शब्द, हे मनुष्यवाचक समजतात. ( उघड ) राणाजींची तुह्मांला ह्राही आहे. पळू नका. तुह्मीं तूर्त आमच्या अटकेंत अहां.

---

१ ( रात्रींस शहरांत फिरण्यासाठीं )परवाना; हा कांहीं तरी खुणेचा शब्द असे तो सांगितला कीं, शहर रखवालदार सोडीत असत.

पहिलापुरुषः–( घाबरून ) हुजूर, पाश्शाची कसम. आह्मी दगेखोर अदमी नव्हे. ( मागें पाय काढूं लागतो. )

दुसरापुरुषः– ( मनांत ) वा! काय याची अक्कल. आतां आणखीं काय बहकेल नकळे. शहाणा शत्रु पुरवेल; पण मूर्खमित्र पुरवणार नाहीं. याच्यामुळें मला पकडण्याची वेळ आली. ( उघड ) हुजूर, राणाजींची कसम-

जमादारः–अरे, बाच्छा राहिला गोटांत. तुह्मीं आधीं आह्मां सांगातीं चला. ( पहिला पुरुष पळूं लागतो. )

कोतवालः–सरूपसिंगजी, मी यांच्या पाठीवर आहें. तुह्मीं शेजारच्या चौकीवर दौडत जाऊन नाकेबंदीचें शिंग करा.

जमादारः–जी हुकूम. ( निघून जातो. )

कोतवालः–( दोघां पुरुषांस ) गड्यानों, आतां निमूट मजसवें चला.

( सर्व निघून जातात. )

## प्रवेश २ रा.

( स्थलः–चितूरशहर; राजमंत्री संग्रामसिंग यांचें घर.
वेळः–मध्यरात्र. )

राजमंत्रीः–( आश्चर्य मुद्राकरून ) एकाएकीं नाकेबंदीचें शिंग कां बरें झालें? मगाशीं राजवाड्यांत असतां जे इसम शहरांत आल्याची बातमी लागली त्यांचा तर सुगावा लागला नसेलना ? ( इतक्यांत तेथें शहराचा कोतवाल येतो. )

कोतवालः–( मुजरा करून ) महाराज, गलीमाचे दोन गुप्त हेर पकडिले आहेत. आणखी कोणी असल्यास त्यांचा तपास सुरू आहे.

---

१ मनुष्य एकदां घाबरलें कीं, खरें बाहेर पडूं लागतें बादशहाची शपथ घेण्यांत हा कोणीकडचा हें सहज बाहेर पडतें.

**राजमंत्रीः**—शाबास रामसिंग! कोठें आहेत ते?

**कोतवालः**—तो शिपाई घेऊन येताहे, पहा.

( इतक्यांत एक शिपाई दोन इसमास कैदी केलेले आणितो. )

**राजमंत्रीः**— ( हेरांकडे निरखून पाहून ) अरे, जलदी एक खुर्ची आणा. ( हेरांपैकीं एकास उद्देशून ) आं, झफरखां, आपण स्वतां! ( कोतवालास )रामसिंग, आधीं यांचे बंद खुले करा.

( कोतवाल झफरखानाचे बंद खुले करितो; व शिपाई खुर्ची घेऊन येतो. )

**राजमंत्रीः**—( खुर्चीकडे बोट करून ) बसा खान साहेब. ( हांसून ) आज रात्रींची वेळ पाहिली भेटीला! आपण समरंगणांत समशेर सरसावून सरसे भेटावयाचे.

( झफरखान मान खालीं घालून मुकाट्यानें बसतो. )

**राजमंत्रीः**—आपण मोठे बहादर लढवय्ये, कीं ज्यांचें नुस्तें नांव ऐकून दुराणी मोगलांनीं पिच्छे हाट केली; ज्यांणीं देवगिरीच्या रामदेवरावालाही एकवार हल्यांत हटविलें; ते या राजधानींत हेरांचे झोरप्पी बनून गुप्त शिरलां? अजब बात आहे! आपण मलीकूकाफुरागत कमअस्सल अगर दगेबाज नव्हे.

**झफरखानः**— हज़रत्, बोलण्याला फार दिलगिरी वाटते.

**राजमंत्रीः**—असो. आपली तबियत तर दुरुस्त आहे?

**झफरखानः**—सुमंत, शहरांत चोरमाफक शिरल्याची पुरी शरम खाते. पण बंदा हुकुमाचा नौकर आहे. ( मनांत ) छिः- पादशहाचे हुकुमानें आलों हें सांगणें गैरशिस्त आहे.

( मान खालीं घालून बसतो. )

**राजमंत्रीः**— खानसाहेब, आपल्या अब्रूला धक्का नाहीं पोहोंचणार आह्मां राजपूतांकडून. रात्रींस जो आमच्याकडे येईल तो आमचा पाहुणा. आह्मीं दुस्मानावरही सूर्यास्तानंतर वार करणार नाहीं. वैरी आह्मांवर चढाव करून आल्याविना

आह्मीं त्यावर हत्यार नाहीं धरणार. गैरसावध शत्रूला हुशार करून हल्ला करूं. जो आपली मान आमच्या गळ्यावर सोंपवील, त्याच्या जिवाला आह्मीं आपली छाती पेटी करूं. शरणागताला मरण न देऊं. असे आह्मां राजपूतबच्चांचे नियम आहेत. आमचा धर्म सर्व धर्मांहून फार कडकडीत नीतीचा आहे. या उघड बोलण्याचा आपणांस रोष न यावा.

झफरखानः—संग्रामसिंगजी, आपलें ह्मणणें रास्त आहे. तरी पण आमचे हसनहुस्सेन सारिखे अल्लाच्या लालांचे पिढीजाद अस्सल मुसुलमीन लोक कमी नामी ठरणार नाहींत.

राजमंत्रीः— खां, आपल्या सारिखे आपल्या जातींत थोर मनाचे फार विरळा. असो. झफरखां, आजदीन बहुत चक्रवर्ती झाले; बहुत पादशाह झाले; परंतु आपले पादशहानें पाठविला असा बेशरम खलिता कोणीं पाहिला नसेल, व ऐकिला नसेल. हा तो शुद्ध मगरमस्त जंगली जनावराचा मासला दिसतो. फिकीर नाहीं. आमचे राणाजी सूर्यवंशातील क्षत्रीय आहेत.

झफरखानः— ( हांसून ) सुमंत, आमच्या एका फारसी किताबतीमध्यें असा लेख आढळतो कीं, सूर्यवंशाचा सोमवंशानें शिकस्त निकाल केला. आणि आह्मीं पैगंबराच्या बच्यांनीं सोमवंशांतले बडेबडे समशेरबहादर पोरस, जाधव वगैरे राजे हारीस आणिले.

राजमंत्रीः— ( हांसून ) ह्मणून आह्मींही जिंकलोंच ह्मणतां? असो. आतां आपण गोटांत परतल्यावर मेहेरबानीनें शहाला अशी समज द्या कीं, ही आमची जिवाची शहनिशहाची हारजीत आहे. जरा नशीबाचा पगडा फिरला तर पादशहाला पंचपहाडाच्या गर्द जंगला बगर छावणीला आसरा नाहीं. मग कशाची पद्मिनी आणिक कशाची दिल्ली?

झफरखानः—सुमंत, आपल्याला जसा या नामुष कर्माचा

घुस्सा आहे, तसाच आह्मांलाही आहे. सत्ताधारी पुरुषास मद झाला ह्मणजे तो अंध होतो. खाखावलेल्या मगरापुढें कशाचा न्याय आणि कशाची नीति.

राजमंत्रीः— बाजवी आहे. बरें, कोतवाल आतां तुह्मी आपल्या कामाला जा.

( कोतवाल व शिपाई निघून जातात. )

राजमंत्रीः—खानसाहेब, आपण जरा दोन पावलें येऊन थोडें शरबत, फळफळावळ घेऊन मग आपल्या गोटांत परत जावें अशी माझी विनंति आहे.

झफरखानः— ( सलाम करून ) सुमंत तखसीर माफ करा. हजरत्, आपली तारीफ काय सांगूं तोंडावर?

राजमंत्रीः—नाहीं, आपण आलेंच पाहिजे.

झफरखानः—बरें आपली मर्जी.

राजमंत्रीः—( त्याच्या हातांत हात घालून, दुसऱ्या हेरास ) चला दोस्त.

( तिघे निघून जातात. )

## प्रवेश ३ रा.

**स्थळः**—चितूरराजवाडा; एक लहान दिवाणखाना.

( **राणाभीमसिंग; राजसिंगः**—सचीव, सालोंबऱ्याचा ठाकूर; **संग्रामसिंग, आणि केसरीसिंगः**—मंत्री; **मानसिंगः**—सेनाधिपति, अछरोलचा ठाकूर; आणि **गोरा व बादल**; असे सात असामी एकांतांत विचार करीत बसले आहेत. )

**राणाभीम०ः**—बोला, अछरोलकर ठाकुरजी, आपला काय सल्ला आहे? केसरीसिंगजी, आपला कसा विचार? सालोंबरेकर आपला कोणता? सर्वानुमतें ठरेल तो ठरवूं.

**मानसिंगः**—माझें मत ठाकुरजी राजसिंग यांच्याप्रमाणें

आहे. त्या बदफैली बादशहाला, राणी साहेबांची आयन्यांत पडलेल्या पडच्छायेची पडसांवली दाखविण्यास हरकत नाहीं. माझी ह्मणजे लढण्याची तयारी नाहीं, अथवा लढण्याला भीतों आहें, असें नाहीं. तथापि वृथा रक्तपात कां?

**बादलः**—काय हो मानसिंगजी, हाच आपला मान? हा वृथा रक्तपात काय? असलें हें भागुबाईपणाचें सेनाधिपत्य आपल्यालाच साजो. आह्मीं सिंहलद्वीपस्थ[1] रहाटोरगर्डी असलें अभद्र, कानांनीं ऐकणार सुद्धां नाहीं. मग हें आह्मांला खपणार कसें?

**गोराः** ( हांसत ) बेटा, गरम होऊं नये—जरा शांत हो.

**बादलः**—काका, शांत कसा होऊं? आमच्या बहिणीचें तोंड त्या यवनाच्या दृष्टीस पडूं द्या? उद्यां कोणी ह्मणतील 'जगदंबेच्या देवळांत शिरून त्या गनीमाला श्रीजगदंबे मातेचें मुख पाहूं द्या; शहरांतील सर्व मूर्ति फोडूं द्या; कारण वृथा रक्तपात होतो!' चालेल?

**संग्रामसिंगः**— ( हांसून ) आहे. सिंहाचा बच्चा आहे. बादलजी, आईबापांनीं आपलें नांव यथायोग्य ठेविलें आहे. मला ही वाटतें या नोडग्यांवर निकरानें तुटून पडून त्यांच्या बिब्बींनाच 'हाय तोबा हाय तोबा,' नमाज पढवावी.

**बादलः**—छिः मंत्रिराज, हा आपला मंत्र चुकला. वाघाला मनुष्याच्या रक्ताची चटक लागूं द्यावी; आणि मग आपणच 'हाय दोस्त' 'हायदोस्त,' करीत रडत पडावें. एकदाका त्या नोड्यांला आमच्या या सुंदर सुंदर परी दिसल्या कीं, ते नोडे भाई हजारों राजपुतिणी आपल्या जनानखान्यांत नेऊन बाटवितील! याला उदाहरण त्या बेशरमी, बेकैद कमलादेवींचेंच घ्याना. तिचे लावण्याला हाच दुराचारी, बेइमानी, पितृव्यघातकी,[2] बादशाह आषक होऊन, गुजराथच्या राण्याला समूळ उलथूं पहात

१ राणी पद्मिनी ही सिंहलद्वीपच्या रावाची कन्या होती.

२ अल्लाउद्दिनानें आपला चुलता मारवून त्याचें राज्य बळकाविलें

आहे. व ती त्याच्यावर भाळून आपल्या नवरदेवाची परागंदा होण्याची वाट पाहत आहे! अशी बोलवा आहे तर वेळींच सावध व्हा.

**गोरा**:—हो हो, सर्व ठाकूरजी लोक, बादलजीच्या या बोलण्याचा विचार नीट होणें जरूर आहे. अलिफखानाला बागलाणाकडे शहानें कोणत्या कामगिरीस पाठविलें आहे, हें सर्वांस मशहूर आहेच. नहरवाल्याला पळतां भुई थोडी झाली आहे.

**राजसिंग**:— काकाजी, बादल छावडा बेटा आहे. परंतु आपण आणखी संग्रामसिंगजी हे कसे चुकतां? शहरांत दाणावैरणीची टंचाई पडली आहे; गढींतले कुवे कोणी दावेदारानें गोंवर, शेणमाती टाकून नासले आहेत, नागरीक थकून हैराण झाले आहेत; शहाचे फौजेला कुमकेवर कुमक येत आहे; फार झालें तर आपला महिना दोनमहिने तग निघेल. गिलच्यांच्या खजिन्यानें किल्ल्यांत फितुर मांडिलें आहे!

**केसरीसिंग**:—माझ्याही विचारास असेंच येतें कीं, पद्मिनीराणीसाहेबांचें प्रत्यक्ष रूप दृष्टीस न पाडतां, एका आरशांतून दुसऱ्या आरशांत पडलेलें प्रतिबिंब पाहून जर तो ओढाळ शिखानष्ट वेढा उठवीत असला तर सांप्रत ह्याच उपायांनीं त्यास परतविलें पाहिजे.

**बादल**:—आणि प्रतिबिंब पाहून न परतेल तर प्रत्यक्षरूप दाखवावें; आणिक प्रत्यक्ष रूप पाहून न परतेल तर सर्व सचीव, मंत्री, सेनाधिपति, यांच्या पद्मिन्या दाखवाव्या. आणखी त्या पाहूनही न परतेल तर— अरेरे, धिक्कार असो आतांच्या या क्षत्रिय ज्ञातीला! असेच सर्व या कलियुगांत आपआपलें महत्व

---

१ कमला देवीचा नवरा हा नहरवाला शहर गुजराथेंत होतें तेथला राजा. त्याची मुलगी देवलदेवी इला आणण्याकरितां अलिफखानास पाठविलें होतें.

सोडून अधोगतीस जाणार. अशीच स्थिति चालल्यास माझें भविष्य लटिकें पडणार नाहीं. 'हजारों उंच पदवीच्या राजपुतांच्या वेश्या बिब्बी[1] बनतील' !!

**संग्रामसिंग**:– अशी आपसा आपसांत विचाराची दुफळी तर झाली. तरी आतां राणाजींनीं आपला निकालाचा शेरा दिला ह्मणजे झालें.

**राणाभीमसिंग**:– सुमंत, मला दोन्हीं मतें योग्य वाटतात, दोन्होही पंथाला जावेंसें वाटतें; मला दोन्ही पक्षांतले लोक सारखेच प्रिय आहेत. आतां कोणाची मनोधारणा करूं ? आणि कोणाची मानखंडणा करूं ? राणीची पडदपोशी राखीन, तर प्रजेच्या जिवावर तोहमत; प्रजेच्या जिवाकडे पाहीन, तर इतर राजे रजवाडे यानां वाईट कित्ता घालून दिला असें होईल. स्वतांच्या प्राणावर बेतली तर तेही आपल्या स्त्रियांच्या अब्रूची व आपल्या नांव लौकीकाची चाड बाळगणार नाहींत. यास्तव आपणच सर्व एक अनुमतानें, एक दिलानें, जी मला सल्ला द्याल, ती अमलांत आणण्याला मी सिद्ध आहें. वावटळींत गिरगिरत असलेल्या सुख्या पानागत माझें मन घोंटाळत आहे. एकीकडे आड व एकीकडे विहीर.

( सर्व जरा जागचेजागीं स्तब्ध बसतात. )

**केसरीसिंग**:– संग्रामसिंगजी, बादलजी, आपल्याला आज दहा आठवडे शत्रूनें शहांत अडकाविलें आहे. तर कितीसें यश आलें इतक्या काळांत ? किती बरें मोहरीं बळी पडलीं ?

**संग्रामसिंग**:– ह्मणून पुन्हा चढाई करूं नये ह्मणतां आपण? आह्मीं मेल्या आयांचेंच दूध प्यायलों आहों ?

**गोरा**:–आणि मानसिंगजी, मला वाटतें कीं, त्या गलीमाचे खाविंदाची तरी आपला सुरक्षित तट सर करण्याची मजल थकली

---

[1] अकबराच्या वेळेपासून हें भाकित बाहेर येऊं लागलें.

ह्मणून ही बाहेरून वरचष्म्याची छाप आपल्यावरच ठेवून तो गोडीगुलाबीनें कूच करूं इच्छित असेल.

**बादलः**—आणि ह्मणूनच तो डाव त्याला साधूं द्यावयाचा नाहीं.

**मानसिंगः**—लढणारे लोक इतके दिवस पडद्यांत कां बसले ?

**बादलः**—( उभाराहून ) रडणारे राजस्थानचे लोकांनीं आपल्या पद्मिन्यांचीं प्रतिबिंबें—

**गोराः**—हो, हो; बादल, बादल; हें काय ? पुरे; हो मागें. ( त्याला वारितो. )

**राजसिंगः**—बादलजी, मानसिंगजी, मी फार लाचार आहें बोलण्याला; पण महाराजांचा आपण अशा वादानें धडधडीत अपमान करीत आहों. प्रसंग कोणता ? आपण बोलतों काय? आणि कोणा जवळ ? हें नीट पहा. ( जरा थांबून ) शहाचे जासुदा बराबर उलट जवाब तर गेला पाहिजे या घडीला. आतां मुदत संपली. काकाजी, आपलें तरी काय मत, सांगा.

**गोराः**—सचीव, मलाही या बाबतींत मत देतां येत नाहीं.

**केसरीसिंगः**—झालें तर. तूर्त आजच आलेली लढाई तहकूब ठेवणारे पक्षांतली मंडळी जास्त आहे. तरी शहास असा जबाब द्यावा कीं, ‘ तुह्मी ह्मणतां तसें प्रत्यक्ष स्वरूप तर दिसणें नाहींच. परंतु अशी जर आंणभाक क्रिया करीत असलां कीं, आह्मीं कोणत्याही प्रकारची दगाबाजी करणार नाहीं; व मोजक्याच लोकांनिशीं शहरांत येऊं. तर मात्र राणी साहेबांची आरशांत पडलेली प्रतिच्छाया तुमच्या नजरेस पडेल. हें कबूल असल्यास आधीं लष्कर किल्याचे पायथ्याशीं गेलें पाहिजे. आह्मींही अशा शपथा वाहूं कीं, तुह्मी शहरांत आमच्यावर विश्वास ठेवून आल्यास आह्मीं पूर्ण इमानेंइतबारें वागूं. इतकी गोष्ट पथकरत नसेल तर जी बनेल ती बनेल. ’

**राजसिंगः**—ठीक आहे. हाच बेत. ल्यहा तर खलिता.

बादलः—ठरला हा तुमचा बेत? कांहीं चिंता नाहीं. खलिता लिहिणें तुमच्या हातांत आहे; परंतु माझ्या बहिणीचें मुख तर तुमच्या हातांत नाहीं. ( भीमसिंगास मुजरा करून चालता होतो )

मानसिंगः—परंतु आतां हें वादळ तिकडे जाऊन राणीसाहेबांची लहर न फिरवो ह्मणजे झालें.

राणाभीमसिंगः—आपला हाच जर कायम विचार होत-असेल तर मी आपलें स्वतांचें वचन मोडणार नाहीं.

राजसिंगः—फार चांगलें. ह्या प्रसंगीं हेंच करणें दूरदर्शी-पणाचें आहे. चलावें तर आतां.

राणाभीम०:—बरें आहे, चला.

( सर्व उठून राणाभीमसिंगास मुजरे करितात. )

केसरीसिंगः—सेनापति, तरी पण आपलीही फौजेची आटो-काट तयारी असावी. नजाणों वेळ आहे, वखत आहे.

( सर्व जातात. )

## प्रवेश ४ था.

स्थल—एका बागेंतील जळमंदीर.

( **राणी पद्मिनी** व सेनाधिपति मानसिंग याची दुसरी स्त्री **वारुणी** अशा दोघी बोलत बोलत येतात. )

राणीपद्मिनीः—बाईवारुणी, तुझ्या मोठ्याबाई कां नाहीं आल्या? दुसऱ्याही मानकरणी अद्यापि नाहीं आल्या.

वारुणीः—मासाहेब, मोठ्याबाई अस्पर्श आहेत ह्मणून मला स्वतांलाच आपली आज्ञा ऐकण्यास त्यांहीं पाठविलें आहे.

राणीपद्मिनीः—काय बाई, त्याच आल्या असत्या ह्मणजे ठीक झालें असतें. तुझ्यानें ह्मणजे मला सांगावयाचें काम उलगडणार नाहीं, असें नाहीं. पण बाई, अजून तूं अल्लड मूल आहेस. नाहीं तर ह्मणशील बाई 'माझ्या सवतीचेंच कौतूक करितां.' ( जरा थांबून ) बाई, दुर्दैव कसें आहे; एकदां हात धुवून पाठीस लागलें; कीं ब्रह्मदेव सुद्धां त्याला आड येऊं शकत नाहीं

ह्मणून ही बाहेरून वरचष्म्याची छाप आपल्यावरच ठेवून तो गोडीगुलाबीनें कूच करूं इच्छित असेल.

**बादलः**—आणि ह्मणूनच तो डाव त्याला साधूं द्यावयाचा नाहीं.

**मानसिंगः**—लढणारे लोक इतके दिवस पडद्यांत कां बसले ?

**बादलः**—( उभाराहून ) रडणारे राजस्थानचे लोकांनीं आपल्या पद्मिन्यांचीं प्रतिबिंबें—

**गोराः**—हो, हो; बादल, बादल; हें काय ? पुरे; हो मागें. ( त्याला वारितो. )

**राजसिंगः**—बादलजी, मानसिंगजी, मी फार लाचार आहें बोलण्याला; पण महाराजांचा आपण अशा वादानें धडधडीत अपमान करीत आहों. प्रसंग कोणता ? आपण बोलतों काय? आणि कोणा जवळ ? हें नीट पहा. ( जरा थांबून ) शहाचे जासुदा बराबर उलट जवाब तर गेला पाहिजे या घडीला. आतां मुदत संपली. काकाजी, आपलें तरी काय मत, सांगा.

**गोराः**—सचीव, मलाही या बाबतींत मत देतां येत नाहीं.

**केसरीसिंगः**—झालें तर. तूर्त आजच आलेली लढाई तहकूब ठेवणारे पक्षांतली मंडळी जास्त आहे. तरी शहास असा जबाब द्यावा कीं, 'तुह्मी ह्मणतां तसें प्रत्यक्ष स्वरूप तर दिसणें नाहींच. परंतु अशी जर आणभाक क्रिया करीत असलां कीं, आह्मीं कोणत्याही प्रकारची दगाबाजी करणार नाहीं; व मोजक्याच लोकांनिशीं शहरांत येऊं. तर मात्र राणी साहेबांची आरशांत पडलेली प्रतिच्छाया तुमच्या नजरेस पडेल. हें कबूल असल्यास आधीं लष्कर किल्याचे पायथ्याशीं गेलें पाहिजे. आह्मींही अशा शपथा वाहूं कीं, तुह्मी शहरांत आमच्यावर विश्वास ठेवून आल्यास आह्मीं पूर्ण इमानेंइतबारें वागूं. इतकी गोष्ट पथकरत नसेल तर जी बनेल ती बनेल.'

**राजसिंगः**—ठीक आहे. हाच बेत. ल्यहा तर खलिता.

**बादलः**—ठरला हा तुमचा बेत? कांहीं चिंता नाहीं. खलिता लिहिणें तुमच्या हातांत आहे; परंतु माझ्या बहिणीचें मुख तर तुमच्या हातांत नाहीं. ( भीमसिंगास मुजरा करून चालता होतो )

**मानसिंगः**—परंतु आतां हें वादळ तिकडे जाऊन राणीसाहेबांची लहर न फिरवो ह्मणजे झालें.

**राणाभीमसिंगः**—आपला हाच जर कायम विचार होत असेल तर मी आपलें स्वतांचें वचन मोडणार नाहीं.

**राजसिंगः**—फार चांगलें. ह्या प्रसंगीं हेंच करणें दूरदर्शीपणाचें आहे. चलावें तर आतां.

**राणाभीम०**:—बरें आहे, चला.

( सर्व उठून राणाभीमसिंगास मुजरे करितात. )

**केसरीसिंगः**—सेनापति, तरी पण आपलीही फौजेची आटोकाट तयारी असावी. नजाणों वेळ आहे, वखत आहे.

( सर्व जातात. )

## प्रवेश ४ था.

**स्थल**—एका बागेंतील जळमंदीर.

( **राणी पद्मिनीं** व सेनाधिपति मानसिंग याची दुसरी स्त्री **वारुणी** अशा दोघी बोलत बोलत येतात. )

**राणीपद्मिनीः**—बाईवारुणी, तुझ्या मोठ्याबाई कां नाहीं आल्या? दुसऱ्याही मानकरणी अद्यापि नाहीं आल्या.

**वारुणीः**—मासाहेब, मोठ्याबाई अस्पर्श आहेत ह्मणून मला स्वतांलाच आपली आज्ञा ऐकण्यास त्यांहीं पाठविलें आहे.

**राणीपद्मिनीः**—काय बाई, त्याच आल्या असत्या ह्मणजे ठीक झालें असतें. तुझ्यानें ह्मणजे मला सांगावयाचें काम उलगडणार नाहीं, असें नाहीं. पण बाई, अजून तूं अल्लड मूल आहेस. नाहीं तर ह्मणशील बाई 'माझ्या सवतीचेंच कौतूक करितां.' ( जरा थांबून ) बाई, दुर्दैव कसें आहे; एकदां हात धुवून पाटीस लागलें; कीं ब्रह्मदेव सुद्धां त्याला आड येऊं शकत नाहीं

वारुणीः—सरकार असा काय कहर गुजरला आहे आपल्यावर?

राणीपद्मिनीः—वारुणी,आज सकाळींच पुन्हा मंत्रीसभा भरली होती. तींत अखेरीस अतिशय अविचारी बेत ठरला. तो बाई मनांत आला कीं, अंतःकरणाला दचका बसून परमावधीची लज्जा वाटते.

वारुणीः—तो मीं घरांतून ऐकिला आहे. परंतु मासाहेब, तो टाळण्याला अन्य गति कोणती? राहूनें खग्रास केला कीं, चंद्रदर्शनाशिवाय लोकांना मोकळीक नाहीं.

राणीपद्मिनीः—वेडे वारुणी, तेथें चंद्राला पाहणारे भक्तिमान् लोक असतात; येथें तो नष्ट मातंग राहूच पाहूं इच्छितो.

( दोघी जरा स्तब्ध बसतात. )

राणीपद्मिनीः—वारुणी, तो मेला कुळकळंक मालदेव—राक्षसांतला मनुष्य आणि मनुष्यांतला राक्षस— ' मेला कुऱ्हाडीचा दांडा '—( थांबते. )

वारुणीः— होय, ' गोताला काळ ' बरें पुढें ?

राणीपद्मिनीः—त्यानेंच मेल्यानें कमलादेवी विषयीं त्या शिखानष्ट मुसुंड्याचे मनांत भरविलें. आणि मजविषयींही त्यानेंच त्याचे कान भारले असतील. मेल्याच्या आयाबाया नाहींत? मी काय त्याला इतकी देखणी वाटलें ?

वारुणीः—(हांसून) सरकार, या विषयीं मी काय बोलूं? परंतु ह्मणतात बादशहाच्या राण्यांनींही आपल्या लहान लहान तसबिरा काढवून घेऊन त्या आपल्या गळ्यांतले ताइतांत जपून ठेविल्या आहेत.

राणीपद्मिनीः—(हांसून)अग, वा ग वा. बरीच कीं ग बोलूं लागलीस. पण बघ वारुणी, नीच, निलाजरे लोक स्वार्थासाठीं मदांध बलिष्ठ पुरुषांची पाहिजे ती हलकट सेवा करण्याला सजतात ! (पडद्यापलीकडे) ' शेवाधर्मः परमगहणो योगिणामप्यगम्यः ' ' शेवाधर्मः परमगहणो योगिणामप्यगम्यः '

( तोच तोच चरण पुनः पुनः उच्चारिला जातो. )

वारुणीः—हा कोण मेला असला झोटिंग दांडगेश्वर?

राणीपद्मिनीः—(कानोसा घेऊन) हां,ओळखिला. हा,तो आपला राजकुंवर ऊरसिंगाचा खेळाडू—त्याधिप्पाड,घष्टपुष्ट चारण भाभी दुर्गेचा दादलोजी—अग तो—देवला संस्थानांतून नवीन आलेला,सिंगराव.

वारुणीः—( मानहालवून ) असें असें; तो नवा प्रख्यात भाट.

( सिंगराव भाट येतो. )

सिंगरावः—( पद्मिनीस मुजरा करून ) मी 'सिंगराव भाट; माझा बहु थाटमाट; माझी बुद्धि अफाट; मी अचाट वाचाट ';—

राणीपद्मिनीः—( हांसून ) 'पुरे पुरे भाट हा तुझा बोभाट. '

सिंगरावः—( हातजोडून ) जियह्मि, जियह्मि; माताजी, जियह्मि. जय देवी, जगदंबे मातोश्री.

( पद्मिनीस साष्टांग नमस्कार घालितो व घोरूं लागतो. )

राणीपद्मिनीः—अरे, मेल्या ऊठ एकदांचा. आला होतास रे, कशाला?

सिंगरावः—(उभाराहून)माताजी, मला येवविलें ह्मणून आलों.

राणीपद्मिनीः—( हांसून ) अरे, कोणीं येवविलें मेल्या तुला?

सिंगरावः—( हात जोडून) सरकार, ज्याला शक्ति होती त्याणें.

राणीपद्मिनीः—वारुणी, मेल्याची जीभ वांकडी पडली आहे; ती जरा नीट कर ग.

वारुणीः—( त्याजकडे पाहून हांसत ) काढरे भाटा, तुझी रसवंती बाहेर. ( त्याचे पुढें जाऊन उभी राहते. )

सिंगरावः—( मागें सरून ) हांहां, वारुणी बाई, आपल्या संपर्कानें तर—

राणीपद्मिनीः—( त्यास दटावून ) हां, आतां लागशील भकाला अद्वातद्वा.

---

१ जितोस्मि- माझा पराजय झाला-झाला. २ 'वारुणी' असें दारूलाही ह्मणतात. समुद्रमंथनाचे वेळेस दानवांनीं सुरापथकरून नाश पावले.

सिंगराव:—आपल्या संपर्कानें दानवांची दैना झाली.

राणीपद्मिनी:—बाबा, तुला पुढें बोलावयाचें आहे का?

सिंगराव:—हो, साधा प्रश्न करा; ह्मणजे साधारण उत्तर देतों.

राणीपद्मिनी:—तर मग बाबा, इकडे काय योजून आला होतास.

सिंगराव:—मासाहेब, बडे महाराजांची सडीच स्वारी सड्याच मासाहेबांना भेटण्यास येत आहे.

राणीपद्मिनी:—येवढेंच? मेल्यानें केवढा द्राविडी प्राणायाम केला पहा! बरें, कां येणें होताहे?

वारुणी:—त्याच खलबताविषयीं कांहीं असेल.

सिंगराव:— (एकीकडे) एकून, बादलजींनीं येऊन इकडे कांहीं तरी वादळ केलें.

राणीपद्मिनी:—वारुणी, बाई ह्याच करितां साऱ्या बायांनां बोलाविलें होतें पण अजून कोणाचा ठिकाण नाहीं. तरी घरीं जाऊन मोठ्याबाईनां सांग कीं, मजकरितां मानसिंगजींची होईल तितकी मिनतमानी करून त्यांनां गलीमाशीं झगडण्याला रगडून स्फुरण आणा. आणि इतर ठाकुरजींनांही त्यांच्या स्त्रियां करवीं असा च चेव आणवितें. तर जा कशीबाई. जातांना पहारेकरणीला सांग कीं, जर ह्मणावें कोणी सरदारणी आल्या तर त्यांनां हजारी कारंज्याच्या बंगल्यांत बसण्याला सांग.

(वारुणी नमस्कार करून जाते.)

राणीपद्मिनी:—(भाटास उद्देशून) बरें सिंगराव आजचें हें मंत्रिसभेचें करणें तुला आवडलें?

सिंगराव:—खरोखर आवडलें माताजी.

राणीपद्मिनी:— (तिरस्कारयुक्त) काय मेल्या खुळ्या, लुब्र्या, तुला खरोखर आवडलें? तें कारे बाबा?

सिंगराव:—एक तर तें राणाजींस आवडलें ह्मणून मला आवडलें; दुसरें, आपल्यासारख्या महा साध्वीच्या अशा प्रकारच्या

छलानें तो दुरात्मा अल्लाउद्दीन, भस्मासुरासारिखा, आपलेच हात आपल्या डोक्यावर मारून घेऊन निभ्रांत मरेल; तिसरें, तो येणें करून मेला, तर बरेंच झालें; नाहीं तर दुसरे राजेरजवाड्यानांच याची लाज वाटून ते याच्याशीं लढण्याला आपल्या बरोबर उठतील; चवथें,—

राणीपद्मिनीः—(त्रासयुक्त स्वरानें) पुरे रे बाबा, ही कर्मकटकट. एकदाचे आपण चलाना येथून. खरोखर मेला बहुभाष्यभाट.

सिंगरावः—( नमस्कार करून ) माताजी, आतां आपल्याला एकलें सोडून गेलेंच पाहिजे. ( जातो. )

राणीपद्मिनीः—( मनाशींच ) आतां इकडे सरकारस्वारी येऊन काय सांगणें होतें नकळे. काय होईल तें होईल, आज मिळून कसा तो होकार द्यायचा नाहीं. हें काय बाई, सांगणारानें सांगावें कसें ? ऐकणारानें ऐकावें कसें ? मेलें माझें मजजवळ सुद्धां बोलण्याला मला लाज वाटते ! हो. हाच बेत. ( जरा थांबून ) पण बाई, एकदां तें मुख पाहिलें कीं, करुंचें काय, नी करुंचें काय; आपलं सर्व जेथच्या तिथंच विरतं. हा तर स्वरुपाचा महिमा, आणि तेंच माझें स्वरूप मला दुःखाला कारण होतें! बा, ब्रह्मदेवा, अबलांनां अतिलावण्य, अतिनाजुकपणा दिल्क्षांविना तुझें चाललें नसतें का? त्या परीस तें सबलांनां पुरुषांनांच सर्व देतास तर फार तुझें कर्तृत्व शोभलें असतें. यायोगें तीच तुझी अप्रतिम देहेनगी आमच्या दुर्दशेस मात्र कारण होते. अहल्येची, सीतेची, द्रौपदीची काय दशा झाली! परंतु या कामीं एकंदर तुझा अप्रयोजकपणाच दिसून येतो खरा. हरिणें केवळ दुर्बळ; त्यांच्या नाभिस्थानीं त्यांचा प्राण घात करणारी कस्तुरीच ठेविली आहेस. लांडग्याचे ठायीं कांहीं गुण ठेविलास काय ? साळूखी, पोपट यांच्या जिभेंत मधुर, मनुष्य वाणीच ठेविलीस; आणि तिजबरोबर त्यांच्या कपाळीं बंदिखानाही लिहिलास! सारांश, जेथें ह्मणून विशिष्ट गुण

सिंगरावः—आपल्या संपर्कानें दानवांची दैना झाली.

राणीपद्मिनीः—बाबा, तुला पुढें बोलावयाचें आहे का?

सिंगरावः—हो, साधा प्रश्न करा; म्हणजे साधारण उत्तर देतों.

राणीपद्मिनीः—तर मग बाबा, इकडे काय योजून आला होतास.

सिंगरावः—मासाहेब, बडे महाराजांची सडीच स्वारी सद्या-च मासाहेबांना भेटण्यास येत आहे.

राणीपद्मिनीः—येवढेंच? मेल्यानें केवढा द्राविडी प्राणायाम केला पहा! बरें, कां येणें होताहे?

वारुणीः—त्याच खलबताविषयीं कांहीं असेल.

सिंगरावः— (एकीकडे) एकून, बादलजींनीं येऊन इकडे कांहीं तरी वादळ केलें.

राणीपद्मिनीः—वारुणी, बाई ह्याच करितां साऱ्या बायांनां बोलाविलें होतें पण अजून कोणाचा ठिकाण नाहीं. तरी घरीं जाऊन मोठ्याबाईनां सांग कीं, मजकरितां मानसिंगजींची होईल तितकी मिनतमाना करून त्यांनां गलीमाशीं झगडण्याला रगडून स्फुरण आणा. आणि इतर ठाकुरजींनांही त्यांच्या स्त्रियां करवीं असाच चेव आणवितें. तर जा कशीबाई. जातांना पहारेकरणीला सांग कीं, जर म्हणावें कोणी सरदारणी आल्या तर त्यांनां हजारी कारंज्याच्या बंगल्यांत बसण्याला सांग.

(वारुणी नमस्कार करून जाते.)

राणीपद्मिनीः—(भाटास उद्देशून) बरें सिंगराव आजचें हें मंत्रिसभेचें करणें तुला आवडलें?

सिंगरावः—खरोखर आवडलें माताजी.

राणीपद्मिनीः— (तिरस्कारयुक्त) काय मेल्या खुळ्या, लुब्र्या, तुला खरोखर आवडलें? तें कांरे बाबा?

सिंगरावः—एक तर तें राणाजींस आवडलें म्हणून मला आवडलें; दुसरें, आपल्यासारख्या महा साध्वीच्या अशा प्रकारच्या

छलानें तो दुरात्मा अल्लाउद्दीन, भस्मासुरासारिखा, आपलेच हात आपल्या डोक्यावर मारून घेऊन निभ्रांत मरेल; तिसरें, तो येणें करून मेला, तर बरेंच झालें; नाहीं तर दुसरे राजेरजवाड्यानांच याची लाज वाटून ते याच्याशीं लढण्याला आपल्या बरोबर उठतील; चवथें,—

राणीपद्मिनीः—(त्रासयुक्त स्वरानें) पुरे रे बाबा, ही कर्मकटकट. एकदाचे आपण चलाना येथून. खरोखर मेला बहुभाष्यभाट.

सिंगरावः—( नमस्कार करून ) माताजी, आतां आपल्याला एकलें सोडून गेलेंच पाहिजे. ( जातो. )

राणीपद्मिनीः—( मनाशींच ) आतां इकडे सरकारस्वारी येऊन काय सांगणें होतें नकळे. काय होईल तें होईल, आज मिळून कसा तो होकार द्यायचा नाहीं. हें काय बाई, सांगणारानें सांगावें कसें ? ऐकणारानें ऐकावें कसें ? मेलें माझें मजजवळ सुद्धां बोलण्याला मला लाज वाटते ! हो. हाच बेत. ( जरा थांवून ) पण बाई, एकदां तें मुख पाहिलें कीं, कस्चें काय, नी कस्चें काय; आपलं सर्व जेथच्या तिथंच विरतं. हा तर स्वरुपाचा महिमा, आणि तेंच माझें स्वरूप मला दुःखाला कारण होतें! बा, ब्रह्मदेवा, अबलांनां अतिलावण्य, अतिनाजुकपणा दिल्याविना तुझें चाललें नसतें का? त्या परीस तें सबलांनां पुरुषांनांच सर्व देतास तर फार तुझें कर्तृत्व शोभलें असतें. यायोगें तीच तुझी अप्रतिम देहनगी आमच्या दुर्दशेस मात्र कारण होते. अहल्येची, सीतेची, द्रौपदीची काय दशा झाली! परंतु या कामीं एकंदर तुझा अप्रयोजकपणाच दिसून येतो खरा. हरिणें केवळ दुर्बळ; त्यांच्या नाभिस्थानीं त्यांचा प्राण घात करणारी कस्तुरीच ठेविली आहेस. लांडग्याचे ठायीं कांहीं गुण ठेविलास काय ? साळूखी, पोपट यांच्या जिभेंत मधुर, मनुष्य वाणीच ठेविलीस; आणि तिजबरोबर त्यांच्या कपाळीं बंदिखानाही लिहिलास! सारांश, जेथें ह्मणून विशिष्ट गुण

निर्मिला आहेस तेथें कांहींना कांहीं दैन्यगति आहेच. (जरा थांबून) हर, हर! ज्या मला लोकें राजलक्ष्मी ह्मणत व ह्मणतात, तिच्या करितां आमच्या प्रजेच्या जीवितावर असा घाला यावाना? असो. परमेश्वरा, तुझी इच्छा थोर आहे. देवा, आतां या कुळाची लाज तुला.

( डोळे मिटून ईश्वराची प्रार्थना करिते. व राणाभीमसिंग प्रवेश करितो; आणि तिची चित्तवृत्ति पाहून तटस्थ उभा राहतो.)

राणीपद्मिनीः—(डोळे उघडून ) अगबाई, इकडे स्वारी केव्हां आली? ( हांसून, लाजत, भीमसिंगाचा हात धरून त्यास एका मंचकावर बसविते; व आपण एका अंगास जवळच उभी राहते. )

राणाभीमसिंगः—आपल्या ईश्वराच्या स्तुतीला आड आलों, याची क्षमा असावी. आपणही या आसनारूढ व्हावें. कारण,त्याच्या अर्ध्या हिश्श्याची मालकी आपली आहे. ( तिला बसवूं लागतो. )

राणीपद्मिनीः—( जरा आढेवेढे घेऊन ) नको बाई, तो मला येवढा मोठा मान. त्याच्या भारानें वेळेस मेली मानही मोडायची.

राणाभीमसिंगः—(तिच्या गळ्यावर डावा हात टाकून) असें काय बरें? ( ओंठाला उजवा हात लावून ) जेव्हां हें आमचें अर्धे अंग झालें तेव्हांच आह्मीं आपल्या सर्वभाराची सारखी वांटणी केली आहे. व जगन्नियंत्याचीही अशीच योजना आहेशी दिसते कीं, सर्व संसारभाराची वांटणी स्त्रीपुरुषांत सारखी विभागिली जावी.

राणीपद्मिनीः—( मान वेळून ) अहाहा, पुरुषांनां मेलें एखादें कार्य साधायचें असलें ह्मणजे कसे अगदीं साखर पेरितात पण!

राणाभीमसिंगः—(मनांत)आपल्या येण्याचा हेतु तर हिच्या लक्षांत आलासें दिसतें. (उघड)बरें इकडे सिंगराव आला होता का?

राणीपद्मिनीः—हो, सूर्योदयापूर्वीं कोंबड्याची आरवणी झालीच पाहिजे.

राणाभीमसिंगः—प्रिये, चंद्र सूर्य जेव्हां एकाच अंबरांत[1] असतात तेव्हां मोठी मजा दिसते, नाहीं?

---

१ वस्त्र; अथवा आकाश.

राणीपद्मिनीः—नाहीं. एक एकाच्या प्रकाशांत लोपतो.

राणाभीमसिंगः—(मनांत)आज सुध्या शब्दांचा दिवस दिसत नाहीं. आणखी हिच्या जवळ ती गोष्ट बोलण्याला मला धीर होत नाहीं.(उघड)प्रिये, राग येऊं देऊं नको, मी आतां जी तुला विनंति करणार आहें त्याची, मी मंत्रीसभेच्या भाकेला गुंतलों आहें कीं,—

राणीपद्मिनीः—तें मला सर्व समजलें आहे; पण पुढें ?

राणाभीमसिंगः—पुढें काय?त्यांच्या मताप्रमाणें चाललें पाहिजे.

राणीपद्मिनीः—चालावें. नाहीं कोण ह्मणतो?

राणाभीम०ः— ( हांसून ) अग, पण कोणीं चालावें?

राणीपद्मिनीः—जे भाकेला गुंतले असतील त्यांणीं.

राणाभीमः—शाबास प्रिये! रोकडा जबाब.

राणीपद्मिनीः—हो. मी कांहीं त्यांचे भाकेला गुंतलेली नाहीं. पण असें करण्याला त्यांचा अधिकार काय? मंत्रीसभा, मंत्रीसभा ! भेकडा सारखे भ्यायले आहेत ह्मणून, किंवा फितुरी झाले आहेत ह्मणून, असें धडधडीत लज्जास्पद अविचारी मत देतात.

राणाभीमसिंगः—ह्यांतून कोणतीही गोष्ट खरी असली तरी त्यांच्या मताप्रमाणें करणें भाग येतें. भ्यायले असले तर युद्धांतून पळून जातील, फितुर असले तर शत्रूला मिळतील, अथवा पिछाडीवर हल्ला करितील.

राणीपद्मिनीः—तर मग त्या चांडाळानें माझें तोंड पहावें त्यापरीस म्यांच मृत्यूचें तोंड पहावें हें बरें !

राणाभीम०ः—हां हां, प्रिये, मी असतांना तूं मृत्यूचें तोंड पाहणार ? आणि 'तूं त्याच्या मुखांत पड.' असें मी ह्मणूं? (हांसून ) आधीं पतिव्रतांनीं पतीला दुःखांत पाडून जाणें हें त्यांचें ब्रीद नव्हे; तुझ्यानें मला सोडून जाववेल ? आणि तुला पतिव्रतेला मृत्यु स्पर्श करील ह्मणतेस ? सगळेंच असंभाव्य.

राणीपद्मिनीः—( रोषयुक्त मुद्रेनें ) हें काय बाई ? भलत्याच वेळीं भलतें.

राणाभीमसिंगः–प्रिये, हें आपलें एरव्हींच झालें. पण त्या मदोन्मत्त गलिमाला तूं जीव दिलास अशी गोष्ट खरी सुद्धां वाटणार नाहीं. न वाटून तो करणार काय ? परंतु मी त्या मंत्रीसभेला वचन देऊन चुकलों आहें. तें भंग न होऊ. त्यांचें ह्मणणें कीं, 'खासगी संबंधांत थोड्याकरितां लोकांचे जीव खर्चीं कां घालावे ?

राणीपद्मिनीः–पण मी विचारतें अशाच प्रसंगांत त्यांचा खासगी संबंध आला तर ते नाहींना लोकांचे जीव खर्चीं घालणार?

राणाभीम०ः–प्रिये, आपल्याला लोकांचें काय ? ते पाहिजे तें करीनात. आपण नेकीनें चालावें.

राणीपद्मिनीः–(हांसून)हो.हेंच अखेरपर्यंत तगलें ह्मणजे झालें.

राणाभीमः–( हांसून ) अरे, माझ्याच तोंडानें माझ्या मनाविरुद्ध निकाल केला. आतां काय करावें ?

राणीपद्मिनीः–(हांसून) जें खरें होतें तेंच आलें निदानाला पुढें.

राणाभीम०–प्रिये, आतां दुसरें कांहीं नाहीं. ' माझें वचन न मोडो' येवढें मागणें आहे.

राणीपद्मिनीः–( हात जोडून ) माझें सर्व करणें या पायांच्या आज्ञेवर अवलंबून आहे.

राणाभीम०–( हांसून ) बरें. तर आतां मी जातों. पुढची तजवीज आपल्याला सांगून पाठवीन.( चुंबन करून जातो. )

राणीपद्मिनीः–(त्याच्याकडे पहात, मनांत) अहाहा, जगदंबे तुझी मजवर अवर्णनीय कृपा आहे ! जें रत्न अनंत जन्म तपश्चर्या करून सुद्धां लाभण्याला दुर्मिळ, तें एकदम सोडून जाववेल तरी कसें ? जी आज्ञा होईल ती होईल.

( मंचकावर पहुडते; व पडदा पडतो. )

## प्रवेश पांचवा.

अल्लाउद्दीनः– ( आपल्याशींच ) आजदीन लढाई

करितां करितां चार वखत अस्मानांत पुराचांद पाहिला. तरीही जमिनीवरील मेहताब एकवार देखील नजरेस नाहीं पडली. ' दावेदाराला हिकमतीनें ठकवावें, असा जो इन्साफ आहे तो वाजवी आहे. तेग्या पेक्षां बिचवा फार जाफा काम करितो; बिचव्याहून जहराची जलदी जास्त; व जहराच्या अगोदर पैसा मेंदूला झोंबतो. कपट हा स्वार, आणि पैका हा त्याचा लढाऊ खंद्या घोडा आहे. ह्या एका घोडेस्वाराच्या जोरानें किल्ला कधींच सर झाला असता. जरा थैलीचा गळा खुला केला तों शहरांत रिघाव होऊन या खूबसुरत राजपूत औरतीचा माषुकमुखडा नजरेस पडण्याची मज्जल पोहोंचली. हिंदु लोक मोठे लांच खाऊ दिसतात ! आतां काय फिकीर आहे. पैसा खा आणि देश ओका. ( जरा थांबून )अस्सो. अझून ती चांदिणी कां चमकत नाहीं? तिचीही तसबीर पाहिल्या रोजा-तागाईत माझा दिल आषक होऊन इष्काच्या तीरांनीं ऊर घायाळ झाला आहे. ( एक चित्र पुढें ठेवून ) काय अजब नूर आहे ! ही ती पद्मिनी ? हिंदूच्या बेव्या परीलाही मजीत पाडतात. या तसबिरींत कारीगरानें आपल्या कसबानें नखरा ज्यादा आणिला असेल. काय असेल तें घोडा मैदान नजीक आहे. असलीही अस्सल जवाहिराची संदूक बगदादच्या खलिपाच्या जनानखान्यांत सुद्धां मिळायाची मुष्कील. या परीचा नकशा पाहून फर्दूसीच्या गज्जलाची याद पडतेः— ( गातो )

" ॥ गोसल आजमके दरबार ॥ इलाही बरसन लागे ॥ ॥ फवारे नूर्के ॥ गोसल०॥" ध्रुपद— ( चित्राकडे पाहून माना डोलवीत ) अच्छा, काय मजा आहे!—" ॥ लाइलाका कोट

१ ह्मणजे ' चार महिने झाले. ' २ चंद्रजोत. ३ खांडा ( मोठें शस्त्र. ) ४ कट्यारीसारिखें मुठींत धरावयाचें ( बारीक ) शस्त्र. ५ पेटी. ६ अरबलोकांनीं हिंदुस्थानावर स्वाऱ्या करून पुष्कळ हिंदु सुंदर सुंदर स्त्रिया बगदादेस नेल्या. ७ चित्र; नकाशा.

बनाया ॥ ईल्लाके फूल ॥ मोहंमद या रसूल्लिा ॥ जिन्नतमे खडे रहे रसूल ॥ इलाही बरसन लागे ॥ माई ऊड्ते फवारे नबी नूर्के ॥ अजमके दरबार ॥ १ ॥"

( पडद्या पलीकडे गायनाचीं मधुरवाद्यें वाजूं लागतात )

अल्लाउ०:-( चकित होऊन ) काय सतार, सारंगी वाजते ? ( आनंदमुद्रा करून ) हो, हो; राणाजींच्या सांगीवरहुकूम राणीपद्मिणी आयन्यामध्यें दिसण्याची ही निशाणी झाली.

( आरशा पुढें पाहतो; व पद्मिनीचा देखावा दिसतो. )

अल्लाउद्दानः-(गुडघे टेंकून) खुदाबकाश ! या अल्ला ! या अल्ला !- या रसुलिल्ला !—( तिकडे टक लावून बघतो; पुन्हा ) ओ- ओ- पाण्यांतली नागिणी- जमिनीवरील परी- इष्काची कमाण-बशर्त त्या दुनिया कारागिराच्या दर्दी कलमाची. हा राणा खचीत पैगंबराचा प्यारा आहे. या सगळ्या दुनियेंतील- सगळ्या आकाशांतील पऱ्यांच्या रूपाची मूस गाळून ही बावन कशी पुतळी ओतली आहे. चीन देशची अति खबसुरत शाहजादी बदुरा[1] आणिक ही, अशा जर एकेच ठिकाणीं कामरलझमानानें पाहिल्या असत्या तर त्यानें त्या शाहजादीला खचीत इची लवंडीच मानिलें असतें. ( जरा स्तब्ध होतो; व पुन्हा-) या अल्ला ! या इलाह ! ज्या माझी अलंगीर हरूनउर्रशीद[2] बादशहा गत सद्दी ज्यारी शुरू आहे, ज्या मला शिकंदराचा[3] मगदूर दिला आहेस, त्याला हीच किंवा अशीच एखादी बादशाहीण लेखूं नाहींस काय ? इच्या या गुलजार गुलगुलित हातांच्या बंदिखान्यांत हमेशा गुलाम बनून राहिलों असतों; या गुलाबी गालांची अशी हरदम मरामत केली असती. ( अरशांतील प्रति

---

१ आरबी भाषेंतील सुरस गोष्टी. २ जसा हिंदुलोकांत राजा विक्रम, तसा मुसलमान लोकांत हरूनउर्रशीदबादशहा ३ मासिदोन देशचा आलेग्झांडर बादशहा यासारिखे आपणही चक्रवर्ती आहों, असा अल्लाउद्दीन बादशहाला गर्व होता.

बिंबाचें चुंबन करितो आणि वेडा होऊन तें प्रतिबिंब कंवटाळीवयास जातो, तों तोंड आरशावर हापटून आरसा खाड्कन भंगतो.)

अल्लाउद्दीनः—( शुद्धीवर येऊन ) तोबा, तोबा ! काय बेअकली काम झालें! हे लोक मला गव्हार अदमींत काढतील. हें कोणीं पाहिलें नाहींना ? ( इकडे तिकडे बघतो. )

( पडद्यापलीकडे ' दुम्दुम्दुम् ' नौबत वाजते. )

अल्लाउद्दीनः—ओहहो, नौबद झाली? ( आरशांत पाहून ) हाय हाय! पद्मिनी चालली! काय चालण्याची ढब ! किती मारू शरीराचा नूर आहे !—अरेरे, गेली !! (जरा थांबून)काय चिंता आहे? मी राण्यावर पूर्ण इतबार ठेवून आलों; तसाच हा बापडा इमानी रजपूत भीमसिंग मजबरोबर खासास्वारी पोहोंचवावयास खास येईल; राजा मालदेव व काफूर यांनां दबा धरून बसविलें आहेच; तेव्हां जसा फांसेपारधी जंगली जनावर भुलवून नेऊन फशीं पाडितो, तसा मी याला गफलतीनें किल्ल्याखालीं चाळवीत चाळवीत नेऊन कैद करवीन—याचे सचीव, सेनापति, आपले बंदे झालेच आहेत—पद्मिनीला सलोख्यानें अगर जबरदस्तीनें महालांत नेऊन निका लावून आपली प्यारी राणी करीन—हो, जर कमला देवी या माझ्या माशुक चेहऱ्यावर फिदा झाली आहे, तर हीही कां होणार नाहीं? वरताळ्याला चितूरचा मुलूख काबीज करीन. ओ सैतान, ज्यातूं आदम आणि हाव्वा यांस फुसलाविलेंस—जो इसम दुरुस्त रस्त्यानें राबणारा तो तुझाही दावेदार आहे—तरी राण्याच्या व पद्मिनीच्या मगजांत घुमून, राण्याला पकडण्याची ही माझी सफर सलामत जाण्याला स्वतां जातीनिशीं मदत दे!

( सलाम करून बादशहा जातो. )

पहिला अंक समाप्त.

---

१ ' कामार्ताहि प्रकृति कृपणा श्चेतना चेतनेषु ' बादशहा विषयातिरेकानें पाहिजेतें बरळला. २ लग्न ( पाट )

# अंक दुसरा.

## प्रवेश १ ला.

स्थळः—चितूरचा राजवाडा.

( राजसिंग, संग्रामसिंग, केसरीसिंग, गोरा आणि राजकुमार ऊरसिंग विचार करीत चिंतातुर बसले आहेत. )

**राजसिंगः**—कां सुमंत, राणाजींची वार्ता तरी काय? बादशहाला पोहोंचवून अद्याप माघारे कसे नाहीं आले?

**संग्रामसिंगः**—कांहीं समजत नाहीं. दुसरें कांहीं नाहीं बादशहा मोठा काफर आहे, ह्मणून भीति वाटते.

( पडद्यापलीकडे दीर्घाक्रोश होतो ) अहो सचीव, सुमंत, खलबत कशाचें करीत बसलां ? धांवा घर बुडालें. आज चितूरचा सूर्य मावळण्याच्या पंथाला आहे! अहो, चितूरच्या राजलक्ष्मीचें सौभाग्य हरपलें! त्या सुंतावाल्याचें निसंतान हो !!

**राजसिंगः**—हा बादलजींचा स्वर नव्हे का? ( पडद्याकडे बघून. ) अरे बाबा, कोण आहेस तो बाहेर येऊन झटकन् काय तो वृत्तांत सांग. आह्मांला व्यर्थ कां गोंधळांत पाडितोस?

( इतक्यांत संतप्त झालेला बादल बाहेर येतो. )

**बादलः**—( क्रोधानें ) सचीव, ' गोंधळांत कां पाडितोस ' असें ह्मणण्याला आपल्याला कांहीं वाटत नाहीं? घराला आग घालून पेटलें ह्मणून आपणच बोंब ठोकावी? कोणाचा गडावरून कडेलोट करावा आणि ' मेला मेला ' ह्मणून ओरडावें ? काय तुमचें शील! लांडग्याला कळपांत येऊं द्यावें—

**संग्रामसिंगः**—पण बाबा, झालें तरी काय ?

**बादलः**—त्या दगेखोरानें राणाजींनां बंदिवान करून नेलें!

**ऊरसिंगः**—मामा, सरकारांनां कैद करून नेलें? (रडतो) बा-

मराठी ...

बा, आतां तुमचें काय होईल? मला आधींपासून ही शंका होतीच. आतां काय करूं?

गोराः–बाळा, गांगरतोस काय ? बळी, अतुरबळी, वीरगडी बुरुजांवर शिबंदी आहेत. संग्रामसिंग, केसरीसिंग, राजसिंग इत्यादि ( त्यांजकडे बोट करून ) नगरांत असे, असे मुत्सद्दी आहेत; मग धैर्य कां सोडितोस ?

बादलः–काका, यांजवर काडीमात्रसुद्धां इतःपर इतबार ठेवूं नका. खचीत हेही फितुरी असावे. ह्यांनींच प्रथम हट्ट धरून गनीमाला आंत आणिलें; आणि राणाजीला बादशहाबरोबर गडाखालीं जाण्याला त्याच्या देखत इतका आग्रह केला कीं, त्यांनां निरुपायास्तव जावें लागलें.

ऊरसिंगः–( मनांत ) जरी फितुरी असले तरी आतां या समयीं तसें यांच्यासमक्ष बोलतां नये. पण यांचें मन पाहूं ( उघड ) राजसिंगजी, केसरीसिंगजी, ही मोठ्या घोंटाळ्याची वेळ येतली आहे; आतां शहरांत जिकडे तिकडे बंडाळीचा उठाव होईल; तरी पुढं कसें ?

राजसिंगः–मला कांहीं सुचत नाहीं बुवा. आह्मी पडलों बेभरंवशी.

ऊरसिंगः–शिव, शिव! कपट्याशीं कपटानेंच वागणें योग्य. सचीव, हा आपले जातीचा उत्तमपणाच आपल्या नाशास कारण होतो. अस्तु. पुढं तजवीज? बोला, बोला मंत्रिराज.

बादलः–कुंवरजी, यांनां काय पुसावयाचें? हे सल्ला देतील 'पद्मिनीनें बादशहाकडे जाऊन कज्जाचें मूळ मिटवावें ह्मणून!'

केसरीसिंगः–बादलजी, हा आमचा धडधडीत पाणउतारा बरा नव्हे. आमच्या शस्त्रांचें पाणी तुझ्या शस्त्रांहून उणें नाहीं.

बादलः–छेः मुळीच नाहीं. तोंडचें पाणी तर विशेष जास्त आहे.

राजसिंगः—बादलजी, तोंड संभाळ. (तरवारीस हात घालितो) मघांपासून सगळा बकवा मांडिला आहे.

बादलः—राजसिंगजी, हात संभाळा. ( तरवारीस हात घालितो) कधींपासून सगळा बेंदा मांडिला आहे.

केसरीसिंगः—मूर्खा, तुझी जिव्हा फार लळलळ करिते; व हाताला फार खुरखुरी आली आहे, ती जिरविलीच पाहिजे. ( तरवार उसपून उभा राहतो. )

बादलः—अहो, एकेकटे येऊं नका. जोडीनें या ह्मणजे मला लढण्याला दुप्पट श्रम नकोत. ( तरवार उसपून दोघांच्या समोर होतो. )

संग्रामसिंगः—( तिघां मध्यें आड उभा राहतो ) राजासिंगजी, केसरीसिंगजी, जो घाव वैऱ्यावर पडावया योग्य, तो आपल्या मेहमानांहीं खावा, यांत आपली कितीशी बूज राहील ? बादलजी आपल्या स्वामिभक्तीला बट्टा लावूं बघतातना ? तर प्रसंगीं ती यथोचित गाजवा ह्मणजे माथे उजळ होतील. प्रसंग कोणता, आणि हें आपण आचरतों काय? सर्प घरांत घुसल्यावर आपणच गोंगाट करणाऱ्या मुलाबाळांनां चावावें? घराला आग लागली तर विझविण्याला झटणाऱ्या मंडळींसच झोडपीत सुटावें? आमचें शीर शत्रूच्या समशेरी खालीं गेलें आहे; आणि अशा वेळेस मान, अपमान चाहून आपलेच पाठबळाची नागबळ काढावी काय ? काय हा दूरदर्शीपणा? बरें, क्षणभर विचार करा; आतां तुमचें वार्धक्य; हात कांपणार; तो गडी जवान; जात्या धीट, शूर; समयीं आपल्याला हार आली तर ही फजीती भूषणास्पद होईल, नाहीं बरें? तेंही राहो. राजसिंगजी, नुक्तेंच आपण परवांच्या गुप्तदरबारांत राणाजींच्या अपरोक्षच बादलजींला संबोधून लाचारी दाखविली होती कीं, 'अशा वादानें आपण महाराजांचा धडधडीत अपमान करीत आहों, ' तें आठवतें का ? हल्लीं आपणही त्याच

गुन्ह्यांत डुबत आहों. अहो, आपल्याला राणाजी काय, आणिक राजकुमार ऊरसिंगजी काय, एकच.

**राजसिंगजी**:– (तिरस्कारानें) हो, हो, हो; पुरे. आजाला नातू शिकवणार. संग्रामसिंगजी, तुह्मीही त्याचेच बंधु. व्हा मागें. ( संग्रामसिंगास मागें लोटतो. )

**गोरा**:– ( बादलास धरून ) बेटा, बेटा; मागें हो; मागें हो. ह्मातार्‍यांच्या हत्येचें पातक माथीं कां घेतोस ? यांत पुरुषार्थ तो काय?

**बादल**:– ( सुटण्याचा प्रयत्न करून ) काका, सोडा-मला. हे राजद्रोही आले पहा अंगावर तुटून. सोडा.

**संग्रामसिंग**:– ( म्यानांतून आपला खंजीर काढून, पुन्हा दोघांच्या मध्यें उभा राहून ) मित्रहो, आतां हें दिव्य बघा. जर कोणी तिघांपैकीं एक पाऊल पुढें सरसावलां तर तुमच्या कोपाग्नीला मी आपली प्राणाहुती देईन. जर तुमच्या तरवारी, रक्तबिंदु प्राशिल्याशिवाय परत जाणार्‍या नसतील तर हें त्यांला रक्त लावा! ( आपली करांगुळी कापितो ) अशीच जर आमची स्वामिभक्ति असेल तर धिक्कार असो तिला. अहो, आमचे विचार कोठें दडाले? आंतल्याआंत तंटेबखेड्याचे योगें बडेबडे देश ध्वस्त झाले आहेत. शिव शिव! राणाजींच्या नशीबाचा आजच सतारा फिरला काय? ही दुर्गति पाहण्यापरीस डोळे फुटलेले बरे; मिटलेले त्याहून बरे–

( इतक्यांत एक दासी संचार करिते. )

**दासी**:–(हात वर करून) सर्व दायाद भायाद लोक, आपला

---

१ कांहीं तरवारींची अशी प्रसिद्धि असे कीं, त्या रक्ताचा निदान बिंदु तरी घेतल्याशिवाय म्यानांत जावयाच्या नाहींत. ती काढणारा मनुष्य तरी आपलें बोट कापून त्याचें रक्त तीस लावी. २ दायादाचे दायाद ते भायाद

' हा लठ्ठालठ्ठीचा वादविवाद दृष्टादृष्टी निरखून बघून, पद्मिणी राणी साहेब, आपल्या एकनिष्ठ स्वराजनिष्ठेविषयीं संतुष्ट होऊन, आपल्या सर्वांनां घरोघरीं जाण्याला परवानगी देतात. आणि शहाच्या जाबजबाबाला स्वतांच उत्तर प्रत्युत्तरदेण्याला इच्छितात. तरी सर्वांहीं गृहीं जाऊन याकामीं रिकामी तसदी देण्याघेण्याची माफी करावी. ( दासी निघून जाते. )

राजसिंगः–( माना हालवून ) येंव्. केसरीसिंगजी, ही भाटागत बोलणारी दासी ऐकिली? होईना प्रळय; आपल्याला काय? चला. ' ज्याचें कुडें त्या पुडें. '

केसरीसिंगः–हो. याउपर राहण्यांत गोडी काय? ( दोघे उठून जातात. इतक्यांत संग्रामसिंग मूर्छना येऊन पडतो. )

ऊरसिंगः– (ओरडून ) मामा, संभाळा, धरा त्यांनां तोलून. ( बादल त्यास संभाळून वरचेवर धरितो. )

ऊरसिंगः–( गोरायास अनुलक्षून ) आजोबा, येथें स्वामिभक्तीचें खरें वारें वसतें. बाकी हे सर्व लोक–आमचे चुलतबंधु महाराज लक्ष्मणसिंग ह्यांनीं[1] बाबांच्या वतीनें राज्याचा बंदावा करून दिल्याकारणानें तें यांनां खपत नाहींसें झालें; आणि हें परचक्र आल्यापासून यांच्या क्रोधाग्नीच्या ज्वाळा भडकूं लागल्या. आगखीं[2], त्यांत शत्रूच्या पैशाचें अवदान; ह्मणून जास्तीच बिथरले. असो. झालें तें बरें झालें. आई पद्मिनीकडे जाऊन पुढील तर्तूद जलद लाविली पाहिजे. व संग्रामसिंगजींनाही त्यांच्या घरीं साक्षेपानें पोहोंचवायास व्हावें. उठा तर मग.

( संग्रामसिंगाला उठवून जातात. )

---

१ लक्ष्मणसिंग हा मसनदीचा परंपरेनें वारस होता. तथापि अल्पवयस्क ह्मणून, त्याच्या वतीनें राणा भीमसिंग राज्य हांकी. २ आगत्य.

## प्रवेश २ रा.

स्थळः-बादशहाचा गोट. वेळः-संध्याकाळ.

( एक हुजऱ्या आपल्याशींच पुटपुटत येतो. )

हुजऱ्याः-काय चमत्कार आहे! मला शाहजादीनें सक्त ताकीद करून, तीनतीनदां बजावून सांगितलें आहे कीं, 'कन्हय्या, तूं माझ्या विश्वासाचा आहेस ह्मणून सांगतें; आतांच्या आतांच माझा इराणी घोडा, स्वारीचें जीन घालून, एका घटकेच्या आंत तयार ठेव.' तर यांतील इंगित काय? पाच्छानें तर तिला राणा भीमसिंग आणीक पद्मिनी यांच्या एकांतांतल्या बोलण्या चालण्यावर देखरेख करण्याकरितां गुप्तपणें डेऱ्यांत बसविलें आहे. ( जरा थांबून ) किंवा राण्याला भुलून त्याला घेऊन पळून तर जायचें नाहींना तिच्या डोक्यांत शिरलें? अलीकडे इला फार चाळे सुचले आहेत. आणि बापानें तर तिकडे कडेकोट तयारी केली आहे कीं, आज रातोरात, राणा, पद्मिनी, तिचे बरोबर आलेला तिचा सगळा जनानी गोशा, यांनां सर्वांनां कैद करून पार दिल्लीची वाट दाखवयाची. मग यांत हिचा मुद्दा काय असावा?

( पडद्या पलीकडे ) 'सलाम कन्हय्या, सलाम.'

( एक बातमीदार बाहेर येतो. )

हुजऱ्याः-अरे, हारे कोण भिकार्डा येताहे? ( न्याहाळून पाहून.) अरे, हा हजूर बातमीदार हुसेन. 'सलाम.' हुसेन, तुझा हा भिकाऱ्याचा भेश या गुजरीच्या वख्तीं मला बिलकुल ओळखिला नाहीं. बरें किल्यांतली काय खबर आहे?

बातमीदारः-घात! घात! खाविंदाच्या जिवावर बडी तोहमत!! हुजूर पहारेवाले मला भिकारी समजून चोहींकडून पिटाळून लावितात. माझी जलदी वर्दी लाव जा.

हुजऱ्याः-( मनांत ) हें लचांड आलें आपल्या कामाला. ( उघड ) हुसेन डरतोस काय? खुदावंत पाच्छा काय गैर-

सावध आहेत? पांच हजार पठाण हत्यार उसपून खाश डेऱ्याच्या सभोंवार छपून बसाविले आहेत; पांच हजार घोडा सरहद्दीवर नंगी समशेर खडा आहे. आलेल्या पालख्या परतल्या कीं, सगळ्या भोईबिई लोकांची चट कत्तल उडवून बायकांनां गुलाम करणार—

बातमीदारः—( घावरून ) काय? पद्मिनी आली गोटांत?

हुजऱ्याः—होय, खासगी डेऱ्यांत सुद्धां आली. राणाभीमसिंगाची अखेरची भेट घेण्याला पद्मिनीला हुजुरांतून एका घडीची फुरसत दिली आहे. तितकी संपली कीं,—

बातमीदारः—( घाबऱ्या घाबऱ्या ) फीर, फीर, झटकर मागल्या पायीं. ठकास महाठक भेटला आहे. बाबा, या पालख्यांतच घाला आहे. एका पलखांत गलीमाच्या हिम्मतदार बांकेप्याद्यांचा पाच्छाला शह बसेल!

हुजऱ्याः—तो कसा?

बातमीदारः—आधीं हुजूर डेऱ्याची वाट चाल; मग ती हकीकत. ( दोघे मागें जाऊं लागतात. )

बातमीदारः—दोस्त, काय त्या राजपूत मुत्सद्यांची कावेबाज हिकमत! अरे, काय त्यांचा खलिता! 'जर पाच्छा राण्याची सुटका करण्याची कुराणावर कसम करीत असेल तर राणी पद्मिनी त्याजबरोबर जाण्याला राजी आहे. राणी परमुलखीं जाणार; करितां—बादशहाच्या आणि तिच्या इतमामाला साजेल अशा तिच्या जाथू असलेल्या जनानी लवाजिम्यापैकीं निदान दोनशें तरी—लवंडच्या ह्मणून, दाया ह्मणून, मैत्रिणी, गाणाऱ्या वगैरे—तहत तिजसाथीं दिल्लीस जातील. प्रधान, मंत्री, सेनापति, यांच्याही बायका राणीला बोळविण्यासाठीं गोटांत येऊन परततील. अशा सुमारें सहा सातशें पावेतों बुरख्यांच्या पालख्या संध्याकाळीं येतील. आमच्या जनानखान्याची पडदपोशी नीट रहावी, ह्मणून कोणीही त्यांजकडे पाहूं नये, अगर आसपास फिरकूं नये.' वगैरे खू-

प शर्ती आहेत. पण बाबा, मला अशी बातमी लागली आहे कीं, दरपालखींतून अस्सल राजपूताची नवी पोलादी औलाद हातावर शिर घेऊन, हत्यारबंद, दोनदोन तीनतीन, धुमसत बसली आहे; पालख्यांचे भोईपण कसलेले बुड्ढे, लढाऊ पाळेगार आहेत. आतां फडशा उडवितील. राणीपद्मिनी मर्दानी पेहराव करून आली आहे कीं, आपण कोणास ओळखितां न यावें. प्रसंग बेतल्यास पाच्छाकडे जाऊन राण्याची सुटका करवणार; नी मग आपल्या पोटांत कट्यार खुपसून जीव देणार–घेणार; परत जाणाऱ्या पालख्यांतून राणा आणि राणी अघाडीसच पळून जाणार. तिकडे खासे निवडक स्वार दोन हजार घेऊन कुंवरजी, गोरा, बादल वगैरे सरदार हल्ला करण्याला गडाखालीं बारींत येऊन थडकले आहेत–बाबारे, आजची रात उजाडली तर आपली–

( पडद्यापलीकडे गलबला होतो ) ‘ अरे, दगारे दगा, धांवा. धांवा कोणी. तोडा हरामखोराला ! भला गवसला आहे तावडीस; तोडा !! ’ ( शिंग, कर्णे वाजतात. )

हुजऱ्याः–( भिऊन ) हुसेन, घात ? बादशाही डेऱ्याला डेराडारे[1], डराडा. चल, चल; पळ इथून. ते छाटले पाहरेकरी. तोबा ! टो-टो-टो- ( बोबडी वळते. )

बातमीदारः–बाबारे, पळ; पण माझ्यातरी रस्त्यांत तिडबिडूं नको.

( दोघेही पळून जातात. )

## प्रवेश ३ रा.

स्थळः–अरण्य वेळः–दिवे लागणीचा सुमार.

( एक शाहजादी घोड्यावर बसून येते. )

शाहजादीः–( आपल्याशींच ) आतां मात्र माझ्या बाबाच्या

---

१ गराडा

जिवाची मला बिलकुल धास्ती राहिली नाहीं. माझा धाकटा भाऊ शाहजादा मुबारिक स्वारांचीं दोन पदकें घेऊन माझ्या बाबाच्या बचावासाठीं खडा आहे; त्याच्या सभोंवार हत्तींचा कोट बनला आहे. बडाभाई, शाहजादा खिजरखान, वझीर नुसरतखान, राणा मालदेव वगैरे खासे सरदारांनीं शत्रूच्या फौजेची दाणादाण करून पाठलाग करिताहेत. पहा, मला कशी शान नामी संधि सांपडली आहे. दावेदार, अगर सोयरे, कोणीही मला यावेळेस अटकाव करणार नाहींत. ( चपापून ) अरे पण तो माझा कलिजा इतक्यांत कोठें गडप झाला ? ( जरा विचार करून ) राणातर स्वतां एकटाच त्या पाठलाग करणाऱ्या मालदेवाच्या स्वारांवर चाल करून तुटून पडला; आणि इकडे तो माषुक अमीर या पुढील गर्द आंबराईत घुसलेला मी बघीतला; पण तो अखेरीस फिरून परीसरी तेथल्यातेथेंच गडप झाला अँ ! या उपर त्याला कोठें हुडकूं ? का बऱ्याबोलानें परत फिरूं ? रॅणच्या[1] रणरणित रेताडांत 'पाणी पाणी' करून गळा सोखून जसा वाटसरू सैरावैरा धांवतो तशी याच्या नादाला लागून, जनाची, मनाची शरम सोडून प्रसंग पडल्यास सर्व नातेगोतांची बेपर्वाई करण्याला राजी होऊन येथपावेतों आल्यें; आणखी आतां परतूं ? छी छी. साधला तर याच वेळीं नामी लाग साधेल. नाहीं तर त्याची आपली मग साऱ्या जन्माची ताडातोड. तरी एकदांची अखेरची निकराची मजल करूंया. (घोडा आंबराईकडे फेंकीत) ओहूहो, तो माझा जिवलग प्यारा एकटाच, तेथें झाडाला घोडा बांधून बसला आहे. ( घोड्यावरून उतरून पुरुषवेष घेतलेल्या पद्मिनीसमोर जाऊन तिला मुजरा करिते. )

**राणीपद्मिनीः**–( चकित होऊन ) अहो, आपण कोण ? जरा दूरच असा. असे जवळ जवळ काय येतां ? हां हां; हें काय ?

---

१ गुजराथेंतील रणचें मैदान.

अंगाजवळ अगदीं थडकलांसे ? तुह्मी कोण ? तुमची जात कोण ? ( भिऊन ) तु-तु-तुह्मांस–

शाहजादीः–( हांसून ) हां, हां; बडे अमीर, माझे प्यारे अमीर, आपण जोरदार मर्द असतां असें जनानी नेभळेपण काय दाखवितां ? कावरे बावरे काय होतां ? मी शाहजादी रजियाबेग आपली लवंडी आहें. घाबरूं नका.

राणीपद्मिनीः–शाहजादी रजियाबेग ! ( थरथर कांपते. )

शाहजादीः–माझे प्यारे, माझे उमदे अमीर, भिऊं नका. मी बादशहाची बेटी खरी; पण आपली बटीक आहें. ( हांसते. )

राणीपद्मिनीः–( मनांत, धीर धरून ) काय ? ही मला पुरुष लेखते ? तर हें सुदैवच समजलें पाहिजे. तरी हें भीतीचें चिन्ह युक्तीनेंच उडवूं या. ( उघड ) काय ? आपण शाहजादी रजियाबेग ? आपण कोणी जंगली देवता, नाहींतर आकाशांतील परी असाल असा मला प्रथम भास झाला.

शाहजादीः–नाहीं, नाहीं. बादशहाबेटी रजियाबेगच आहें. कोणी सैतान, खबीस नाहीं.

राणीपद्मिनीः–मग, माझ्याच मागें कां लगट करून आलां? ( हंसते. )

शाहजादीः– ( हांसून ) आपल्याचकरितां आपल्यामागें आलें. ( शाहजादी अगदीं जवळ ठेपून पद्मिनीच्या हातांत हात देऊं लागते; व पद्मिनी हळूहळू मागें पाय काढिते. )

शाहजादीः–( हांसून ) काय तुह्मी हिंदु लोक नामर्द? तशांतून तुह्मी रजपूतबच्चे, आह्मां खिलजी बायकांना भितां?

राणीपद्मिनीः–दूर रहा.आह्मी मुसुलमान लोकांना शिवत नाहीं.

शाहजादीः–ह्मणजे? एकमेकांना शिवल्यावांचून कसें होणार? ( हांसते ) हं हं: मग ही दुनिया चालेल तरी कशी? बरें, दोस्तांदोस्तांची गांठ पडली ह्मणजे?

जिवाची मला बिलकुल धास्ती राहिली नाहीं. माझा धाकटा भाऊ शाहजादा मुबारिक स्वारांचीं दोन पदकें घेऊन माझ्या बाबाच्या बचावासाठीं खडा आहे; त्याच्या सभोंवार हत्तींचा कोट बनला आहे. बडाभाई, शाहजादा खिजरखान, वझीर नुसरतखान, राणा मालदेव वगैरे खासे सरदारांनीं शत्रूच्या फौजेची दाणादाण करून पाठलाग करिताहेत. पहा, मला कशी शान नामी संधि सांपडली आहे. दावेदार, अगर सोयरे, कोणीही मला यावेळेस अटकाव करणार नाहींत. (चपापून) अरे पण तो माझा कलिजा इतक्यांत कोठें गडप झाला? (जरा विचार करून) राणातर स्वतां एकटाच त्या पाठलाग करणाऱ्या मालदेवाच्या स्वारांवर चाल करून तुटून पडला; आणि इकडे तो माषुक अमीर या पुढील गर्द आंबराईत घुसलेला मी बघीतला; पण तो अखेरीस फिरून परीसरी तेथल्यातेथेंच गडप झाला अँ! या उपर त्याला कोठें हुडकूं? का बऱ्याबोलानें परत फिरूं? रैणच्या रणरणित रेताडांत 'पाणी पाणी' करून गळा सोखून जसा वाटसरू सैरावैरा धांवतो तशी याच्या नादाला लागून, जनाची, मनाची शरम सोडून प्रसंग पडल्यास सर्व नातेगोतांची बेपर्वाई करण्याला राजी होऊन येथपावेतों आल्यें; आणखी आतां परतूं? छी छी. साधला तर याच वेळीं नामी लाग साधेल. नाहीं तर त्याची आपली मग साऱ्या जन्माची ताडातोड. तरी एकदांची अखेरची निकराची मजल करूंया. (घोडा आंबराईकडे फेंकीत) ओहूहो, तो माझा जिवलग प्यारा एकटाच, तेथें झाडाला घोडा बांधून बसला आहे. (घोड्यावरून उतरून पुरुषवेष घेतलेल्या पद्मिनीसमोर जाऊन तिला मुजरा करिते.)

**राणीपद्मिनीः**—(चकित होऊन) अहो, आपण कोण? जरा दूरच असा. असे जवळ जवळ काय येतां? हां हां; हें काय?

१ गुजराथेंतील रणचें मैदान.

अंगाजवळ अगदीं थडकलांसे ? तुह्मी कोण ? तुमची जात कोण ? ( भिऊन ) तु-तु-तुह्मांस–

शाहजादीः–( हांसून ) हां, हां; बडे अमीर, माझे प्यारे अमीर, आपण जोरदार मर्द असतां असें जनानी नेभळेपण काय दाखवितां ? कावरे बावरे काय होतां ? मी शाहजादी रजियाबेग आपली लवंडी आहें. घावरूं नका.

राणीपद्मिनीः–शाहजादी रजियाबेग ! ( थरथर कांपते. )

शाहजादीः–माझे प्यारे, माझे उमदे अमीर, भिऊं नका. मी बादशहाची बेटी खरी; पण आपली बटीक आहें. ( हांसते. )

राणीपद्मिनीः–( मनांत, धीर धरून ) काय ? ही मला पुरुष लेखते ? तर हें सुदैवच समजलें पाहिजे. तरी हें भीतीचें चिन्ह युक्तीनेंच उडवूं या. ( उघड ) काय ? आपण शाहजादी रजियाबेग ? आपण कोणी जंगली देवता, नाहींतर आकाशांतील परी असाल असा मला प्रथम भास झाला.

शाहजादीः–नाहीं, नाहीं. बादशहाबेटी रजियाबेगच आहें. कोणी सैतान, खबीस नाहीं.

राणीपद्मिनीः–मग, माझ्याच मागें कां लगट करून आलां? ( हंसते. )

शाहजादीः–( हांसून ) आपल्याचकरितां आपल्यामागें आलें. ( शाहजादी अगदीं जवळ ठेपून पद्मिनीच्या हातांत हात देऊं लागते; व पद्मिनी हळूहळू मागें पाय काढिते. )

शाहजादीः–( हांसून ) काय तुह्मी हिंदु लोक नामर्द? तशांतून तुह्मी रजपूतबच्चे, आह्मां खिलजी बायकांना भितां?

राणीपद्मिनीः–दूर रहा.आह्मी मुसुलमान लोकांना शिवत नाहीं.

शाहजादीः–ह्मणजे? एकमेकांनां शिवल्यावांचून कसें होणार? ( हांसते ) हं हः मग ही दुनिया चालेल तरी कशी? बरें, दोस्तांदोस्तांची गांठ पडली ह्मणजे?

राणीपद्मिनीः–( हांसून )परस्परांची भेट झाल्यावर आह्मी स्नान करितों.

शाहजादीः-तरमग, मी आपली दोस्त आहें, ह्मणून पहिल्यानेंच कळविलें. सबब मला अगोदर भेटा, नी मग स्नान करा.

राणीपद्मिनीः–शाहजादी, काय हें बदफैली बोलणें? आह्मी राजपूत; हाडाचे क्षत्रिय आहों. शत्रूला पाठ देत नाहीं; आणि परक्या स्त्रीला पोट देत नाहीं! समजलां?

शाहजादीः–पहिल्या गोष्टीच्या पारखेची अजून वेळ आली नाहीं. दुसऱ्याची मात्र संधि नजीक ठेपली आहे! मजसारिख्या पऱ्या पैशापांसरी नाहींत. ही तुमच्या हिंदु लोकांतली अप्सरा तुझ्मांलाच, अल्लाच्या लालाला, ह्मणून भाळली. हा माझा नूर पहा शुक्राच्या चांदिणीवाणी. ( आंगावरील जामा व तोंडावरील बुरखा काढून टाकते. )

राणीपद्मिनीः–( तिचें रूप पाहून ) अहाहा! काय गोजिरवाणी साजिरी काया आहे! खरीच शुक्राची चांदिणी लखाकत्याहे. परंतु, अशा या आपल्या रूपाचा, आपल्या मोठेपणाचा, आपल्या हुशारीचा उपयोग काय? हा जो आपला बागबगीच्या बोलून चालून लोकाखातर बनविला आहे; त्याचा हेवा भलत्याला बिलकुल नसावा.

शाहजादीः–महाराज, लोकाच्या बागबगीच्याचा हेवा नसावा, हें वाजबी आहे. पण उन्हातान्हांतून आल्यावर घडी दोघडी त्यांत ऐषआराम करण्याला कांहीं हरकत नाहीं. ( हास्यमुख करिते. )

राणीपद्मिनीः–नुस्ता सुखामुखी सावलींत बसून ऐषआराम करण्यांत खरीखुरी हरकत नाहीं. मात्र, तेथील फळांचा, फुलांचा उपभोग घेणें फार गैरकायदा–फार गैर चालीचें आहे.

शाहजादीः–तरीपण आपसुखास खालीं पडलेलीं फुलें, फळें, बेतमाफक घेण्यांत फारसा गुन्हा घडणार नाहीं !

राणीपद्मिनीः—( मनांत ) बरेंच झालें. ही काबुली, दुराणी मैना मंजुळ मंजुळ मंजुरव करूं लागली आहे. तर घटकाभर हिला या बोलण्याच्या लांबलचक चऱ्हाटांत गुंतवावी.

शाहजादीः—( हांसून) बोला, बोला, बडे मानकरी उमराव, पायांखालीं पडणारीं फळें, फुलें घेण्याला आपल्याकडून कांहीं नड, अडचण, हरकत आहे? गुन्हा आहे कांहीं?

राणीपद्मिनीः—(हांसत) बेगम साहेब, दिगर मनुष्याची असली बिन्‌मोजबी, क्षुल्लक बाबीची मालमत्ता देखील हिरावून घेण्यांत—फारसा नाहीं तरी थोडातरी—खचीत गुन्हाच आहे. फिरून, आपण जी बाब योजून इकडे आल्याचें दिसतें, ती तर बेसुमार जबाबदारीची, बुऱ्या फजीतीची, बेहद्द पाजीपणाची, कमालीच्या फाजिलपणाची आहे. ( हांसते ) हो, हो, हो.

शाहजादीः—( हांसत ) माझे अमीर साहेब, आपण बहकतां काय? ही झाडून सारी दुनिया याच बाबीपासून पैदा झाली! याच बाबीनें पशू, पक्षी, जीवजंतु, कीडमुंगी, चटसारीं वेडीं करून टाकिलीं आहेत; ज्या बाबीखातर तुमचे देव, ऋषि, जोगी, बैरागी, आमचे खलिपा, मुल्ला, फकीर सुद्धां पिसाट बनून बायकांचे बंदगुलाम बनले; ज्या बाबींत सांपडून माझे प्यारे, तुमच्या आईबापांनीं तुह्मांस पैदा केलें. ( हांसते ) हो, हो, हो ! तिला तुह्मी खोड लावितां? मला वाटतें, त्याच बाबीनें तुमच्या डोक्यांतील मगज बिघडला आहे.

राणीपद्मिनीः-छे, छे; तसें नाहीं. पण आपण परक्याच्यामालकीची जिंदगी बिन्‌हुकूम आपल्या ताब्यांत घेणें फार धोक्याचें व गैरवाजबी होय. ( हांसते. )

शाहजादीः—हां, हां; असें आहे काय? ( मान डोलवीत ) तर सांगतें. आजदिन तागाईत ह्या जिंदगीची मालकी खुद्द आमची आहे. तर हा बघा—माझे प्यारे अमीर साहेब—खाविंद साहेब,

राणीपद्मिनीः–( हांसून )परस्परांची भेट झाल्यावर आह्मी स्नान करितों.

शाहजादीः–तरमग, मी आपली दोस्त आहें, ह्मणून पहिल्यानेंच कळविलें. सबब मला अगोदर भेटा, नी मग स्नान करा.

राणीपद्मिनीः–शाहजादी, काय हें बदफैली बोलणें? आह्मी राजपूत; हाडाचे क्षत्रिय आहों. शत्रूला पाठ देत नाहीं; आणि परक्या स्त्रीला पोट देत नाहीं! समजलां?

शाहजादीः–पहिल्या गोष्टीच्या पारखेची अजून वेळ आली नाहीं. दुसऱ्याची मात्र संधि नजीक ठेपली आहे! मजसारिख्या पऱ्या पैशापांसरी नाहींत. ही तुमच्या हिंदु लोकांतली अप्सरा तुह्मांलाच, अल्लाच्या लालाला, ह्मणून भाळली. हा माझा नूर पहा शुक्राच्या चांदिणीवाणी. (आंगावरील जामा व तोंडावरील बुरखा काढून टाकते.)

राणीपद्मिनीः–( तिचें रूप पाहून ) अहाहा! काय गोजिरवाणी साजिरी काया आहे! खरीच शुक्राची चांदिणी लखाकत्याहे. परंतु, अशा या आपल्या रूपाचा, आपल्या मोठेपणाचा, आपल्या हुशारीचा उपयोग काय? हा जो आपला बागबगीच्या बोलून चालून लोकाखातर बनविला आहे; त्याचा हेवा भलत्याला बिलकुल नसावा.

शाहजादीः–महाराज, लोकाच्या बागबगीच्याचा हेवा नसावा, हें वाजवी आहे. पण उन्हातान्हांतून आल्यावर घडी दोघडी त्यांत ऐषआराम करण्याला कांहीं हरकत नाहीं. ( हास्यमुख करिते.)

राणीपद्मिनीः–नुस्ता सुखासुखी सावलींत बसून ऐषआराम करण्यांत खरीखुरी हरकत नाहीं. मात्र, तेथील फळांचा, फुलांचा उपभोग घेणें फार गैरकायदा–फार गैर चालीचें आहे.

शाहजादीः–तरीपण आपसुखास खालीं पडलेलीं फुलें, फळें, बेतमाफक घेण्यांत फारसा गुन्हा घडणार नाहीं!

राणीपद्मिनीः–( मनांत ) बरेंच झालें. ही काबुली, दुराणी मैना मंजुळ मंजुळ मंजुरव करूं लागली आहे. तर घटकाभर हिला या बोलण्याच्या लांबलचक चऱ्हाटांत गुंतवावी.

शाहजादीः–( हांसून) बोला, बोला, बडे मानकरी उमराव, पायांखालीं पडणारीं फळें, फुलें घेण्याला आपल्याकडून कांहीं नड, अडचण, हरकत आहे? गुन्हा आहे कांहीं?

राणीपद्मिनीः–(हांसत) बेगम साहेब, दिगर मनुष्याची असली बिन्‌मोजबी, क्षुल्लक बाबीची मालमत्ता देखील हिरावून घेण्यांत–फारसा नाहीं तरी थोडातरी–खचीत गुन्हाच आहे. फिरून, आपण जी बाब योजून इकडे आल्याचें दिसतें, ती तर बेसुमार जबाबदारीची, बुऱ्या फजीतीची, बेहद्द पाजीपणाची, कमालीच्या फाजिलपणाची आहे. ( हांसते ) हो, हो, हो.

शाहजादीः–( हांसत ) माझे अमीर साहेब, आपण बहकतां काय? ही झाडून सारी दुनिया याच बाबीपासून पैदा झाली! याच बाबीनें पशू, पक्षी, जीवजंतु, कीडमुंगी, चटसारीं वेडीं करून टाकिलीं आहेत; ज्या बाबीखातर तुमचे देव, ऋषि, जोगी, बैरागी, आमचे खलिपा, मुल्ला, फकीर सुद्धां पिसाट बनून बायकांचे बंदेगुलाम बनले; ज्या बाबींत सांपडून माझे प्यारे, तुमच्या आईबापांनीं तुह्मांस पैदा केलें. ( हांसते ) हो, हो, हो ! तिला तुह्मी खोड लावितां? मला वाटतें, त्याच बाबीनें तुमच्या डोक्यांतील मगज बिघडला आहे.

राणीपद्मिनीः-छे, छे; तसें नाहीं. पण आपण परक्याच्या-मालकीची जिंदगी बिन्‌हुकूम आपल्या ताब्यांत घेणें फार धोक्याचें व गैरवाजबी होय. ( हांसते. )

शाहजादीः–हां, हां; असें आहे काय? ( मान डोलवीत ) तर सांगतें. आजदिन तागाईत ह्या जिंदगीची मालकी खुद्द आमची आहे. तर हा बघा–माझे प्यारे अमीर साहेब–खाविंद साहेब,

इकडे नजर द्या. हा पहा, ह्याचा कायमचा अगदीं मुकरर मुकरर ताबा, कबजा, हक्क, मालकीसकट तुमच्या हवालीं करितें. (आपला उजवा हात पुढें करिते ) झालें ? ध्यातर हा आतां आपल्या हवालीं. काय ? अजून पतकरत नाहीं ? महाराज, ह्यासाठीं तर इराणच्या बादशहाचा मुख्य शाहजादा नूरसिकंदर झुरत बसला आहे. बुखाऱ्याचा नवा खानसाहेब, मूर्तिपूजका सारिखी माझे तस्बिरीपुढें दररोज तीन वखत गुडघे टेंकितो आहे! कां, महाराज; खालीं मान कां घातली? ह्याची कां चीज करीत नाहीं?

राणीपद्मिनी:–( मनांत ) हर, हर! हिची केवढी योग्यता; आणि या मदन-व्याधीनें किती दीन केली आहे ! बापुड्ये, वर सोन्याचा मुलामा दिलेला हा पितळेचा डागिना आहे बरें. व्यर्थ कां फसतेस? (उघड) बेगम साहेब, तुह्मीं द्यायला तयार झालां; पण तो घेण्याला कोण तयार आहे ?

शाहजादी:–काय? असला हा सोन्यासारखा हात घेण्याला आपण तयार नाहीं? बरें असें कां? देणारा व घेणारा हात दोन्हीही बराबर तोलाचे आहेत. सुरेखपणाची दोहोंत बिलकुल तफावत नाहीं. ( हास्यमुख करिते. )

राणीपद्मिनी:–शाहजादी, हें पहा; एखादें गुलाबाचें अगर गुलछबूचें नवें सुकुमार नाजुक फूल आहे; परंतु तें ओंगळ ठिकाणीं पडलें आहे; तर त्याचा कोणी वास घेईल का? तशीच आपली जात आह्मांला अपवित्र वाटते; आपला हात नव्हे !

शाहजादी:-हं, हँ; एकून आपल्या मतानें आमची महंमदीधर्माची जात अपवित्र आहे. असो. मला आपण हिंदु करा. आपल्याकरितां जे जे त्यांतले बंद निर्बंद आहेत, ते ते कडक रीतीनें पाळीन !

राणीपद्मिनी:–शाहजादी, गध्याचा घोडा कसा बनेल? ( हांसते. )

शाहजादीः–बडे अमीरं, आमचे काजी, मुनशी, मुफ्ती वगैरे सांगतात कीं, हिंदु लोकांत मागें कांहीं क्षत्रिय, कोळी, मांग, असे असून मोठे बडेबडे पूज्य ब्राह्मण बनले! हें कसें?

राणीपद्मिनीः–( आश्चर्य करून ) असें पुराणांतरीं सांगितलें आहे खरें. तरी पण ते सर्व हिंदुच होते; मुसुलमान नव्हते. हिंदूचा मुसुलमान होईल; पण याच्या उलट कधींही होणें नाहीं. दूध नासून दहीं होतें. तथापि दह्याचें दूध होईल का?

शाहजादीः–महाराज, बोलण्यांतले पोकळ डावपेंच व प्रत्यक्ष घडणाऱ्या गोष्टी यांत हमेश मेळ पडतोच असें नाहीं. बरें; हेंही राहूं द्या. घोड्याचा गद्धा बनवाल? तर त्याला माणसांचा राजा बनवीन!

राणीपद्मिनीः–गध्याचा राजा बनला तरी तो परिणामीं गद्धाच!! वायफळ बोलण्यांत हंशील काय? बेगमसाहेब, आपली सर्व आशा निष्फळ आहे. आपण जशा प्रकारचा मनुष्य मला समजतां तसा मी नव्हे. माझ्या हातून कधींच जी गोष्ट घडावयाची नाहीं तिजविषयीं आपण वारंवार काय उगीच आग्रह धरितां? निदान असली शरमेची गोष्ट आह्मां सूर्यवंशीयांचे हातून तरी घडावयाची नाहीं.

शाहजादीः–थांबा, थोडें ऐका; आमचे फारशी अखबारनविसांनीं असें लिहिलेलें आढळतें कीं, एके वेळीं एका यूनानी[1] बादशहानें तुमच्याच या 'सूर्यवंश सूर्यवंश' ह्मणून ज्याची तुह्मी इतकी बडिवार सांगतां, त्याच सूर्यवंशामधील एका राजास आपली मुलगी देऊन आपला जांवई केलें; आणि त्या संयोगापासून हल्लींचा हा मोठा प्रसिद्ध वंश वाढला आहे. कां? कसें काय? गद्धीचा घोडा बनला!!

राणीपद्मिनीः–( मनांत ) कर्म मोठें कठीण आहे. ( उघड ) छी, छी; शाहजादी, तें सर्व त्या ग्रंथकाराचें थोतांड आहे. आ-

१ ग्रीक. ग्रीकलोकांनांही 'यवनांत' गणीत असत.

इकडे नजर द्या. हा पहा, ह्याचा कायमचा अगदीं मुकरर मुकरर तावा, कवजा, हक्क, मालकीसकट तुमच्या हवालीं करितें. (आपला उजवा हात पुढें करिते ) झालें ? घ्यातर हा आतां आपल्या हवालीं. काय ? अजून पतकरत नाहीं ? महाराज, ह्यासाठीं तर इराणच्या बादशहाचा मुख्य शाहजादा नूरसिकंदर झुरत बसला आहे. बुखाऱ्याचा नवा खानसाहेब, मूर्तिपूजका सारिखी माझे तस्बिरीपुढें दररोज तीन वखत गुडघे टेंकितो आहे! कां, महाराज; खालीं मान कां घातली? ह्याची कां चीज करीत नाहीं?

राणीपद्मिनीः–( मनांत ) हर, हर! हिची केवढी योग्यता; आणि या मदन-व्याधीनें किती दीन केली आहे ! वापुड्ये, वर सोन्याचा मुलामा दिलेला हा पितळेचा डागिना आहे बरें. व्यर्थ कां फसतेस? (उघड) वेगम साहेब, तुह्मी द्यायला तयार झालां; पण तो घेण्याला कोण तयार आहे ?

शाहजादीः–काय? असला हा सोन्यासारखा हात घेण्याला आपण तयार नाहीं? बरें असें कां? देणारा व घेणारा हात दोन्हीही बराबर तोलाचे आहेत. सुरेखपणाची दोहोंत बिलकुल तफावत नाहीं. ( हास्यमुख करिते. )

राणीपद्मिनीः–शाहजादी, हें पहा ; एखादें गुलाबाचें अगर गुलछबूचें नवें सुकुमार नाजुक फूल आहे ; परंतु तें ओंगळ ठिकाणीं पडलें आहे; तर त्याचा कोणी वास घेईल का? तशीच आपली जात आह्मांला अपवित्र वाटते ; आपला हात नव्हे !

शाहजादीः–हं, हूँ ; एकून आपल्या मतानें आमची महंमदीधर्माची जात अपवित्र आहे. असो. मला आपण हिंदु करा. आपल्याकरितां जे जे त्यांतले बंद निर्बंद आहेत, ते ते कडक रीतीनें पाळीन !

राणीपद्मिनीः–शाहजादी, गध्याचा घोडा कसा बनेल? ( हांसते. )

**शाहजादी**:—बडे अमीरें, आमचे काजी, मुनशी, मुफ्ती वगैरे सांगतात कीं, हिंदु लोकांत मागें कांहीं क्षत्रिय, कोळी, मांग, असे असून मोठे बडेबडे पूज्य ब्राह्मण बनले! हें कसें?

**राणीपद्मिनी**:—( आश्चर्य करून ) असें पुराणांतरीं सांगितलें आहे खरें. तरी पण ते सर्व हिंदुच होते; मुसुलमान नव्हते. हिंदूचा मुसुलमान होईल; पण याच्या उलट कधींही होणें नाहीं. दूध नासून दहीं होतें. तथापि दह्याचें दूध होईल का?

**शाहजादी**:—महाराज, बोलण्यांतले पोकळ डावपेंच व प्रत्यक्ष घडणाऱ्या गोष्टी यांत हमेश मेळ पडतोच असें नाहीं. बरें; हेंही राहूं द्या. घोड्याचा गद्धा बनवाल? तर त्याला माणसांचा राजा बनवीन!

**राणीपद्मिनी**:—गध्याचा राजा बनला तरी तो परिणामीं गद्धाच!! वायफळ बोलण्यांत हंशील काय? बेगमसाहेब, आपली सर्व आशा निष्फळ आहे. आपण जशा प्रकारचा मनुष्य मला समजतां तसा मी नव्हे. माझ्या हातून कधींच जी गोष्ट घडावयाची नाहीं तिजविषयीं आपण वारंवार काय उगीच आग्रह धरितां? निदान असली शरमेची गोष्ट आह्मां सूर्यवंशीयांचे हातून तरी घडावयाची नाहीं.

**शाहजादी**:—थांबा, थोडें ऐका; आमचे फारशी अखबारनविसांनीं असें लिहिलेलें आढळतें कीं, एके वेळीं एका यूनानी[१] बादशहानें तुमच्याच या 'सूर्यवंश सूर्यवंश' ह्मणून ज्याची तुह्मी इतकी बडिवार सांगतां, त्याच सूर्यवंशामधील एका राजास आपली मुलगी देऊन आपला जांवई केलें; आणि त्या संयोगापासून हल्लींचा हा मोठा प्रसिद्ध वंश वाढला आहे. कां? कसें काय? गद्धीचा घोडा बनला!!

**राणीपद्मिनी**:—( मनांत ) कर्म मोठें कठीण आहे. ( उघड ) छी, छी; शाहजादी, तें सर्व त्या ग्रंथकाराचें थोतांड आहे. आ-

१ ग्रीक. ग्रीकलोकांनांही 'यवनांत' गणीत असत.

मचे पति–( दचकून ) आमचे सांप्रतचे नृपति महाराणे, हे सेनाख्य वंशांतील उत्तमोत्तम कुलीन आहेत. ( जरा थांबून ) आतां तरी आपण परत फिरा. आपल्या विषयीं आपल्या गोटांत मोठा गवगवा झाला असेल. बरें, आपल्यासंगें लग्न लावलेलें बादशहास न आवडून तो आपला दोघांचाही प्राण घेईल; आपली दोघांचीही येणेंकरून जातगोत जाईल; आपल्याला कोणी आश्रा देणार नाहीं; असा आपला सर्वस्वीं नाश आहे, तर मनाला वेळींच आवर घालून अशा गोष्टीपासून दूर असावें हेंच बरें. (जरा थांबून) मला फार आश्चर्य वाटतें कीं, आपल्या स्वजातींत पुष्कळ मोहरेदार पुरुष सोडून आपलें मन इकडेच कोणीकडे झुकलें? (हांसते.)

शाहजादीः–आपण चतुर, शाहणे, बडे वाकबगार असून म्यां आपणांस सांगावें असें नाहीं. परंतु इष्काची-प्रीतीची गति वेलीसारखी वांकडी नी हट्टखोर आहे. चाहील तिकडे कलते, चाहील त्याला कंवटाळते! बगदादच्या खलीपांनां हिंदु स्त्रियांचीच आवड कां? कमलादेवी माझ्या बाबावरच कां भाळली? शाहरियार बादशहाच्या पद्मिनीसारख्या रूपवाल्या बायकोला काळा काळा बेरड मासाऊद सिद्धी कसा गोड वाटला? आमच्या लोकांत पद्मिनी प्रमाणें बायका नाहींत ह्मणतां? मग माझा बाबा तिच्यावरच इतका आषक कां? हें पहा इथेंच ठळठळित उदाहरण. आणि इतक्याकरितां तुह्मी पायानें लोटीत असतां मी डोक्यानें चालत येतें! मला आपल्याहून कमी जोरदार समजतां? असा हात धरिला तर हालूं देणार नाहीं. ( पद्मिनीचा हात धरिते ) भुंग्याला कमळाचें पोट फाडण्याला बळ नाहीं? पण प्रीतीनें अडकून जातो. महाराज, माझा जीव आपल्यावर बेसुमार आषक झाला आहे. ही बादशाहबेटी हरयेक कामीं आपल्याला उपयोगी पडेल. मुसुलमान होऊन लग्न लावीत असाल तर माझ्या बाबा कडून तुह्मांलाच चितूरची गादी देववीन;

तुमच्या जिवलग महाराण्याला सोडवीन; राणीपद्मिनीची सुटका करवीन; नाहीं तर लवंडी होऊन तुमची तहांहयात खडी चाकरी बजावीन. बोला, बोला; मुके कां ?

राणीपद्मिनीः–( मनांत ) कर्माची कहाणी नी कथा ! बोलूं काय कपाळ ? अग मेल्ये कैदाशिणी, मला सोडिलेंस ह्मणजे पद्मिनी सुटलीच. हँः हिला धरिलें कामवासनेनें आणि इणें धरिलें मला. भगवंता, आतां तूं नाहींतर ते धांवलां तर सोडवाल आह्मां दोघींनां या सावळदंडांतून. ( हळु हांसते. )

शाहजादीः–( रागावून ) काय, तुह्मी माझ्या बोलण्याला उत्तर तर देत नाहींच; पण उलटे हांसतां? अहो, तुह्मी काळे लोकच महा काफरे; तुह्मांला दयामाया बिलकुल तिळभर पण नाहीं. अरे, गोटांत आल्यावर जेव्हां तुह्मीं राणाभीमसिंगाबरोबर पळून जाण्याचें खलबत मांडिलें तेव्हां मीं तें पडद्याआड सर्व पाहिलें. तेव्हांच रे, तुमचा दोघांचा बेत बाहेर फोडिला असता तर आतां तुला कैदेंत घालून, हाल हाल करून, पाहिजे तसा वरमीस आणला असता; पाहिजे तें कबूल करविलें असतें. काय करूं रे! फसलें मी. ( करकर दांत खाऊन पद्मिनीकडे बघते. )

राणीपद्मिनीः–(मनांत ) बया इतका वेळ रंभा दिसत होती; तीच आतां त्राटिका दिसूं लागली! काय विषयवासनेची मौज आहे; इच्यासारखें तात्काळ प्रीति जोडणारें व तोडणारें असें साधनच नाहीं! ज्यांची परस्पर ओळख नाहीं–भाषण नाहीं–कधीं कधीं भाषा, धर्म, आचार इत्यादि सुद्धां भिन्न–अशांनां क्षणांत मित्र करिते, व केव्हां त्यांत व्यत्यय आला कीं, एकमेकांवर अगदीं 'जीवकाप्राण' करणाऱ्यांनां क्षणांत शत्रूहून दुष्ट करिते! हे दोन्ही मासले इथेंच पहा. ( उघड ) बेगम साहेब, उगीच कां माझा अंत घेतां ? साफ मजकडून हें होणें नाहीं.

---

१ ( याचामूळचाअर्थ ) परधर्मी; लबाड; खोटे.

शाहजादीः–( रागानें ) असें? बरें, मघाशीं भीमसिंगानें तुझे मुके घेतले, व तुला कवटाळून वेंगेंत धरिलें, त्याची तुला लाज नाहींरे वाटली? तुला वाटलें 'तुह्मीच दोघे तंबूत आहां' नव्हे? राण्यानें 'पद्मिनी' ह्मणून ह्मणतांच त्याला डोळे काय मारिलेस; भिंवया काय गरगरावल्यास; बोलतांनां नटव्यासारिखें मुरकलास किती? तर तूं असा कोण त्याचा? अशा हवाशीर जंगलांत अशा शुभ्र चांदिण्यांत, मजसारखी तरणी ज्वान अप्सरा तुझी घडीघडी मिनतमाना करणारी सेवेला हजर असतां, जेव्हां तूं मागें मागें हटतोस तेव्हां तूं खरा पुरुष आहेस कीं नाहीं याचीच भ्रांति वाटते! किंवा राजेलोकांच्या गमतीखातर ठेवलेल्या माषुक पोरांपैकीं तूं एक नरम असावास! हा पुरुषभेष टाकून बायकांचा तरी घे. ह्मणजे फार जास्ती खुलशील. तुझे हात कसे मऊ गोंडस आहेत! यांत नामी नामी बांगड्याभर. ( पद्मिनीच्या मनगटास हात लाविते ) अरे, तुझ्या हातांत बांगड्या कोठून? ( पद्मिनीच्या अंगावरील जामा दूर करून) ओ! आंत बायकोचा पेहराव! ( डोक्यावरील मंदील काढून ) अँ, डोक्यांत सुद्धां बायकांचे नग ( तिच्या अंगावरील बाहेरचे सर्व कपडे काढून ) ओ···· ····ओ, बिसमिल्ला? ही तो खास खबसुरत औरत आहे!! ए, सांग तूं कोणाची आहेस. ( जरा विचार करून ) आँ, ही ती स्वतां पद्मिनीच!! पुरुषाचा पेहराव करून आली होतीस? ( मनांत, चरकून ) अरेरे, मोठा घात झाला. आतां ही माझी सारी फजीती बाहेर सांगेल. त्यापक्षीं तिलाच चला घोड्यावर घालून नेऊं. ( उघड ) अगे, तूं समजलीस? तुला नेण्या करितांच तुझ्या पिच्छेस आलें. हा वेळ उगीच आपला लपंडाव खेळलें. तर चल कशी बऱ्या बोलानें माझ्या बाबाकडे. न येशील तर हा खंजीर पाहिलास. असाच खुपशीन. ( खंजीर बाहेर काढिते. )

राणीपद्मिनीः–( घाबरून ) शाहजादीसाहेब, ये क्षणीं

मज अनाथाला गय करा. हें सारें सोंग मी आपला बचाव करण्याकरितां आणिलें; आपल्याला फसविण्यानिमित्त नव्हे. (रडत) मी गरीब गाय वाघाच्या गुहेंतून मोठ्या मुषकिलीनें बाहेर पडल्यें. तथापि दुर्दैवानें पुन्हां सांपळ्यांत सांपडलें. बेगमसाहेब, माझा गुन्हा माफ करा. पाहिजे तर कट्यारीनें माझा गळा येथें कापा; पण पुन्हां गोटांत परत नेऊं नका.

शाहजादी:–( मनांत ) अरेरे! खरोखर या गरीब बिचारीची मला फार कींव येते. परंतु करणार काय? हिला सोडून देणें ह्मणजे आपली अब्रूच मोकळी सोडून देण्यागत आहे. हिला धरून नेली कीं आपण गेल्याचा गवगवा झाला असल्यास, तो बंद पडेल; आपला फजितवाडा होणार नाहीं; वर्त्तोळ्याला थोर बहाद्दरीही मिळेल. तर येवेळीं दया निव्वळ घात करील.(उघड) वा! भली सोंगाडीच दिसती. चल; झट्टपट्टे पुरे.

राणीपद्मिनी:–(आकाशाकडे डोळे व हात करून, रडत.) परमेश्वरा, या जगतांत निखालस न्याय नाहीं; काडीमात्र दया नाहीं; सद्गुणांचें नांव नाहीं. याविषयीं, हे सर्वसाक्षी, तुझे डोळे झांकले का?

( शाहजादी पद्मिनीला आपल्या घोड्याकडे लोटीत नेते. )

राणीपद्मिनी:–( ओरडून ) देवा, धांव आतां. तुजविणें या संकटसमयीं इतर कोणरे, दीनदयाळा, त्राता आठवूं? पहा या पद्मिनीची ही मदोन्मत्त हत्तीण दुर्दशा दुर्दशा उडवीत आहे!(धाड्कन मूर्छित पडते. )

( पडद्यापलीकडे, दीर्घस्वदानें ) ‘ भिऊं नको, भिऊं नको. पद्मिनी, या खांडयाच्या एका घायानें त्या हत्तिणीचें गर्दनच छाटून टाकितो. भिऊं नको; धीर धर; आलों. ’

शाहजादी:–(दचकून) या अल्ला! हा पहा, त्या डोंगराच्या डगरींतून, फत्तरावाणी घडाडत आला हिचा यार, धगड! आतां आपलाच बचाव करावा हें बरें. ( घोड्यावर बसून पळून जाते. )

## प्रवेश ४ था.

स्थळः–अरण्य ( तेंच ) वेळः–चांदिणी रात्र.

( पद्मिनी मूर्च्छा येऊन पडली आहे; इतक्यांत मालदेव येतो )

मालदेवः–( आपल्याशींच ) अरे, हें काय? शब्द अगदीं एकदम बंद! आवाज तर थेट पद्मिनीप्रमाणेंच मंजूळ. अरेरे! बिचारीला त्या हत्तिणीनें दडपलें नाहींना? (न्याहाळून पाहून) हो खचीत. त्या झाडाशीं ती लहान पांढरी हत्तीण आहे. ( धांवत पुढें जाऊन ) सोंडबिंड कांहीं दिसत नाहीं हें कसें?

( पडद्यापलीकडे घोडा खंकाळतो ) 'हिं–हिं; हिं–हिं;'

मालदेवः–अरे बाप! तें तर घोडें आहे. असें टंगळमंगळ नको. जलद तिथेंच चला जाऊं.

( पुढें गेल्यासारखें करून एकाएकीं तटस्थ उभा राहतो. )

मालदेवः–ओहोहो! ही येथें पद्मिनीच पडली आहे. ( निरखून पाहून ) इला इजा नाहीं झाली कांहीं; परंतु घाबरून पडली आहे. (जरा तिजकडे साभिलाषदृष्टीनें पाहून ) अहाहा! ही पद्मिनी नव्हे; तर केवळ नवरत्नांनीं भरलेला ठेवाच पुढें पडला आहे; परंतु मज हतभाग्याचे हाताला हा कोठून लाधणार? त्याजवर पातिव्रत्यरूपी, एकलहरी, उग्र फणी फोंफावतो आहे. या तीव्र सर्पापुढें मंत्रतंत्र, औषधि, सर्वकांहीं रद्द आहेत. (जरा थांबून) आतां फुरफुरत असलेल्या या माझ्या हातांनीं गप्पकर इला कंवटाळून धरूं का? किंवा या माझ्या भुकेलेल्या मुखानें हिच्या अधरामृताचें गटगट पान करून शांत होऊं? हो, काय हरकत आहे? येथें भीतीचें प्रयोजनच नाहीं. तर मना, आतां तूं आपली यथेच्छ वासना पुरी करून घे.

( इकडे तिकडे पाहूं लागतो; तंव पद्मिनी मूर्च्छेंत बरळते. )

राणीपद्मिनीः–प्राणनाथ, प्राणनाथ; आपण जवळ असून अशी माझी दुर्दशा करावीना? मजवर ईश्वरच कोपला आहे.

मालदेवः–(इकडे तिकडे साशंक पाहून) अँ? भीमसिंग येथें

आहे? कोठें कोणीसुद्धां दिसत नाहीं. हो, हो, तो जर येथें असता तर इला रानटी हत्तिणीनें भेडसावलेंच नसतें. ही बरळत तर नाहींना? ( नीट पाहून ) होय मूर्च्छना येऊन बेशुद्ध झाली आहे खचीत. ( मनांत ) तो मोठा कपटी आहे; आसपास असेल कदाचित्; पण निदान इच्या स्पर्शसुखाचा तरी लाभ दवडितां नये. ( जरा विचार करून ) हो, हो; असेंच करूं या. ( जवळच्या झऱ्याचें पाणी पानांतून आणून तिच्या डोळ्यांना लावतो; व आपल्या मांडीवर तिचें डोकें धरितो; व वारा घालितो )

मालदेवः—( मनांत ) हाय, हाय; हिचें मस्तक माझ्या मांडीला लागलेंमात्र तों इतक्यानेंच मी आपणास धन्य ह्मणवितों; मग ज्याचें मस्तक इच्या मांडीला सदैव लागत असेल, त्याचें भाग्य काय वर्णावें? अरे, ही सावध होऊं लागली.

( पद्मिनी चाळवते व त्याच्या मांडीवर हात टाकिते. )

राणीपद्मिनीः— ( सावध होऊन ) प्राणनाथ, गेली ती?

मालदेवः— ( मनांत ) अहाहा! पद्मिनी, 'प्राणनाथ' हा तुझा मधुरतर शब्द जर मी कोण आहें हें समजून बोलली असतीस, तर राज्य, धनदौलत, घरदार, या सर्वांवर या क्षणीं पाणी सोडून, तुझा असा पाणी धरून ( तिचा हात धरितो ) विंध्याद्रीसारिख्या पर्वताच्या निबिड अरण्यांतील एखाद्या महानदीच्या किनाऱ्यावरील पर्णकुटीचा अक्षय्य आश्रय धरून राहिलों असतों; कीं, जेणेंकरून तुझ्या अप्रतिम समागमसुखाचा अव्याहत अनुभव प्राप्त झाला असता! ( मोठा सुस्कारा टाकितो) झालें, हें सर्व मनोराज्यच झालें. आतां ही सावध झाल्यावर आपल्या कपाळीं काय अक्षता लागतील त्या खऱ्या. (पद्मिनी डोळे उघडते.)

राणीपद्मिनीः—प्राणनाथ, हें असें काय बरें? मौनव्रत कां धारण केलें? माझ्यासाठीं पुष्कळ श्रम पडले ह्मणून? महाराज, त्या शाहजादीनें माझ्या जिवाची दैना दैना उडविली! गेली का पण ती?

( इकडे तिकडे पाहून) गेली एकदाची. काय बाई, मी घेरी येऊन पडलें होतें. तिला कोंनाहीं माझ्या वेषावरून मी पुरुषच वाटलें; आणि ह्मणून माझ्यामागें वेडी होऊन आली !—पण बोलत कां नाहीं ?

मालदेवः— ( मनांत ) ही बोलत्याहे तरी काय ? भीतिभ्रमानें वेडीबिडी तर झाली नाहींना ? शाहजादी काय ! इच्या मागून वेडी होऊन येते काय ? ' हत्तीण ' ' हत्तीण ' ह्मणून ओरडली काय ! सगळाच विजातीय घोंटाळा ! ! ( जरा थांबून ) नाहींतर मी स्वतांच नसेनना स्वप्नांत ? स्वप्नांतही आपण स्वप्नांत आहों कीं काय, असा भास होतो ! ( चकित बसतो. )

राणीपद्मिनीः— (झट्कन उभी राहून) मी नाहीं जा, अशानें एक शब्दसुद्धां जवळ बोलायची. हें काय बाई ? मेलें ऐकायचेंच नाहीं, जळ्लं कसें तें. (तिरकस दृष्टि करून रागानें त्याच्याकडे पाहते; व लागलीच चपापते ) अँ ? हें काय ? तुह्मीं कोण ?. ते कुठें आहेत ? ती कुठें गेली ? शाहजादीच का तुह्मी ?

मालदेवः—पद्मिनी, नीट विचार करून पहा; ह्मणजे मी कोण ? काय ? तें सगळें कळेल.

राणीपद्मिनीः— ( मनांत ) हा मेला, तो काळतोंड्या मालदेव असेल. तर मग मुसुलमानाच्या हातून सुटून मांगाच्या तावडीस सांपडलें ह्मणांयची. (उघड) मला नाहीं आठवत कोण ते.

मालदेवः—तरमग मी खराखुराच दुर्दैवी. पद्मिनी, जो तुला या संकटसमयीं उपयोगीं पडला, यास्तव ईश्वराचा फार फार आभार मानितो; ' तुझें सदा सर्वकाळ कल्याण असो, अशी ज्याची परिपूर्ण इच्छा होती व आहे;—( दचकल्या सारिखें करून ) परंतु हाय, हाय; ईश्वरा—( जरा थांबून ) बरें, तें असो. पद्मिनी, इतःपर तुझ्या सेवेकरितां ' तन मन धन' खर्चे करून सर्वस्वीं झटणारा; ( हांसून ) पद्मिनी, ज्याणें तुझें अप्रतिम लावण्य ऐकून, नळराजा जसा दमयंतीकरितां अहर्निशि

कामाग्नीनें जीवंत जळत राहिला, तसा तुझ्या विरहानें होरपळून गेलेला; आणि ज्याणें तुला लहानपणीं मागणीही घातली होती;— असा हा दुर्दैवी, हतभाग्य, मंदभाग्य, झालोरकर—सेवक—मालदेव!

**राणीपद्मिनीः**— ( मनांत ) एकूण, अखेरीस हा तो कर्मनष्ट चांडाळच ठरला तर. मेल्यानें बोलण्याचा उपक्रमच पहा कसा विलक्षण केला आहे तो. याच्याशीं आतां बोलावें तरी पंचाईत; न बोलावें तरी पंचाईत; बोललें तर हा कांहीं तरी फाजील वाचाळपणा करीत बसणार; न बोललें तर पदरीं कृतघ्नपणा येणार आहे. याणें आपल्यास नुक्तेंच संकटांतून सोडविलें किमान्पक्ष हा त्यांतून सुटण्याला कारण तरी झाला खरा. तर— ( जरा विचार केल्यासारिखें करून ) हो, हो; असाच मार्ग बरा. (उघड) मालदेवराव, खरीखरी मी आपली फारफार ऋणी आहें. आपण या बिकटप्रसंगीं येथें आलां नसतां तर मी अशीच बेशुद्ध पडून राहिलें असतें; व कदाचित् रानांतल्या हिंसक पशूंलाही मी बळी पडलें असतें. यावेळीं मी आपल्याला माझा बंधु बादलजीच समजतें!

**मालदेवः**—(मनांत) अरेरे! इनें मला या शेवटल्या भाषणानें अगदीं ठार केलें! असो; कांहीं चिंता नाहीं. (उघड) पद्मिनी, तुझ्या या संकटसमयीं राणाभीमसिंग यानें जें कर्म करण्यास उचित तेंच माझ्या कपाळीं आलें, याविषयीं मला अतिशय लज्जा वाटते!

**राणीपद्मिनीः**—( मनांत ) दुष्टा, पापिष्ठा, 'कुत्र्याचें शेंपूट वांकडेंच.' थांब. तें बुंधासकटच तोडून टाकतें. ( उघड ) खरेंच तें. भ्रतारानें जें पाळण करायाचें तें बंधूच्या माथीं येणें हें कितीतरी दुःखाला कारण होय! हरहर, ईश्वरा, कोणाही मनुष्याला, कोणतेही काळीं, कोणाचेंही असलें जडजोखीम न पडो. ( जरा थांबून) बरें, मालदेवराव, त्यांचा शोध कांहीं आहे का?

**मालदेवः**—(मनांत) निष्ठुर स्त्रिये, जरकरितां तूं मला अशीं खडाखड ताडातोडीचीं उत्तरें देतेस, तर मग मी तरी तुमची होईल ते.

वढी ताडातोड होण्याविषयीं कां कमी करूं? ( उघड )हाय, हाय! पद्मिनी, जी गोष्ट होईल तितकी छपविण्याविषयीं मी प्रयत्न करीत होतों; व जी गोष्ट मघांशीं तोंडांतून पडतां पडतां म्यां मोठ्या मुष्किलीनें आंवरली; त्याच गोष्टीचा तूं उल्लेख करितांक्षणींच माझ्या पोटीं भडभडून आलें. शिव, शिव!

**राणीपद्मिनीः**— ( मनांत ) परमेश्वरा, माझ्या प्राणनाथांची गति काय झाली असेल बरें? परंतु, छि, छि, या दुरात्म्या मैंदाच्या बोलण्यावर काडीमात्र मुद्धां भरंवसा ठेवून उपयोग नाहीं. (उघड ) ( रडत रडत ) मालदेवराव, सुजनांची दुर्गति पाहून कोण बरें असा पाषाणहृदय आहे कीं, ज्याच्या अंतःकरणाला दयेचा पाझर फुटणार नाहीं? सांगा आतां जें काय असेल तें. भवितव्य कांहीं चुकत नाहीं.

**मालदेवः**— पद्मिनी, जेव्हां घोडे स्वारांनीं तुमची दोघांची लगड पिछाडी केली; तेव्हां मीं तुझांस ओळखून, तुमच्याविषयीं मनाला मनस्वी खेद झाला. इतक्यांत राणा तर त्यांवर तुटून पडला, तों चार पांच स्वार त्याची नजर चुकावून तुझ्या मागें लागलेले पाहून मी तुझ्या बचावासाठीं त्यांजवर घोडा घातला. पण पुन्हा परत माघारा पाहतों तों राण्याचा घोडा रक्तबंबाळ एकटाच सैरावैरा धांवत आहे; आणि माणूस तर तेथें एक देखील दिसत नाहीं! शेवटीं, तुला तरी सोडवावें या हेतूनें इकडे दवड केली!—

**राणीपद्मिनीः**— ( भुईवर अंग टाकून शोक करिते ) ईश्वरा, मज पापिणीसाठीं त्यांनां असा प्रसंग यावाना ? आमच्या सर्व शुभचिंतकांची मेहनत वायां व्हावी? हरहर, मीच अन्य जन्मींची चांडाळीण—आणि म्हणून—

**मालदेवः**— ( मनांत ) आपली इच्छा प्रगट करण्याला आतां कांहीं हरकत नाहीं. ( उघड ) ऊठ, ऊठ पद्मिनी. ( तिला उठविण्याला तिच्या जवळ जवळ जातो ) झालें तें झालें; सर्व गो-

ष्टी ईशपराधीन आहेत. आतां राण्याची निरर्थक आशा सोडून मजसमागमें चाल. पादशहाचे स्वार तुझ्या शोधांत आहेत.

( पद्मिनी मागें मागें हटते.)

**मालदेवः**— पद्मिनी, मजसवें चलण्याला मागेंपुढें करूं नको. पहा, पैसा, ससासारखीं दुर्बल परंतु पुष्टिकारक पारधीचीं जनावरें, तरुण रूपवती स्त्रिया, यांजवर धूर्त पुरुष सदा टपलेले असतात. त्यांनां संरक्षणच पाहिजे. याकरितां तुझ्या रक्षणाची सेवा मला करूं दे; आणि तुझ्यासाठीं जळून जाणाऱ्या या दीन देहाच्या रक्षणाची तूं दया कर. मलाच तुला प्रथम देऊं केलें होतें. पद्मिनी, त्याचें वय काय? तुझें वय काय? माझें रूप, यौवन किती? याचा विचार तूं पूर्वींच केला असशील. पण मतलबी आईबापापुढें उपाय काय? असो. आतां तरी माझ्या प्रीतीची चीज कर. तुला त्याचीं उत्तम उत्तम—सुरेख फळें येतील!

**राणीपद्मिनीः**—(मनांत) पापिष्टा, हें माझें संरक्षणका? (उघड, कानावर हात ठेवून ) शिवशिव, असले हे अमंगळ शब्द पुरे! मालदेवराव, जें झालें व होणारें तें होऊन गेलें. मग त्याची ही पापी चर्चा कां? आपण समयीं धांवलां,हे आपले मजदीनावर आजन्म उपकार आहेत. आतां वेळेस आपल्या मनांतून माझ्या या दुःखशोकानें विव्हळ झालेल्या अंतःकरणावर डागच देणें असतील तर निरुपायास्तव मलाच येथून चालतें झालें पाहिजे. ( उभी राहून जाऊं लागते. )

**मालदेवः**—प्रिये पद्मिनी, राणा किती जरठ! तशांत त्याला कुटुंबें किती; तुझें तारुण्य काय लुसलुशीत! बरें, त्याची कुवत ती काय; नी, त्यांतून तुझ्या स्वतांच्या वांट्याला कितीकशी येणार? खरखरीत भुकेल्याला शिळी बुरसलेली कोंड्याची भाकर कितपतशी शांति देईल बरें? फिरून तोही आतां नष्टच झाला !!

**राणीपद्मिनीः**—( क्रोधावून ) दुष्टा, चांडाळा, असली ही

जिव्हा झडो–किडे पडोत–अक्षय नरकांत लोळो! मूर्खा, हिरा जर जुना झाला तर त्याचें पाणी जातें काय? कितीकांनीं तो उगाळिला तथापि झिजेल? अरे हिणकसा, सोनें जुनें झालें ह्मणून हिणकस होईल? जा पापिष्टा, तोंड काळें कर.

मालदेवः–( सक्रोध हास्य करून ) प्रिये, तुजसम बावनकशी पुतळी कितीकांनीं आंगावर घेतली; तुजसारखी हिरकणी कित्येकांनीं झिजविली; तथापि तिला उणेपणा येईल काय? परंतु इतकें सांग ‘ लग्न लावणार कीं निका?’ पहिलें पसंत असल्यास घोड्यवर बसून मजबरोबर चल; नाकबूल असेल तर येथच्या तेथें तुला पकडून शोधांत असलेल्या घोडेस्वारांच्या ताब्यांत देऊन बादशहाकडे पाठवितों. कोणतें पतकरतें?

राणीपद्मिनीः–(रडत) देवा, आगींतून काढून मला या फोंपाट्यांत पाडिलेंस कीं रे. आमच्या शुभ्र रविकुळाचें सत्व तरी कुठें गेलें? देवा, देवा! सूर्यनारायणा; या निर्वाणसमयीं खराच तुझा अस्त झाला आहे. मग तुला आह्मां दीनांची दशा कोठून दिसणार? सिंहिणीला या नष्ट लांडग्यानें छळावें?

( मालदेव त्वेषानें पुढें सरसावून जातो. )

राणीपद्मिनीः–ये, ये, कुळकळंका, पुढें ये; आणि स्त्रीहत्या अक्षय्य नरकप्राप्तीसह घे. एक पाऊल पुढें सरशील तर त्रागा करून प्राण देईन; आणीक माझी हत्या तुझ्या माथीं घालीन! देवा, हा नीच कीचक मला नहाक छळितो आहे. तरी माझे प्राणनाथ कां धांवत नाहींत? प्रभो, त्यांनां तरी सुखी राख!

मालदेवः–( ओरडून ) प्रिये सैरंध्री, तुझ्या अरण्यरुदनाचा उपयोग काय? यासमयीं, तुझ्या आणखी चार पतींसह जरी मूर्तिमंत भीमसिंग आला, तरी हा अद्वितीय कीचक त्या सर्वांचा चकनाचूर करून, अनंतर दुःशासन बनून खचीत खचीत तुज-पांचाळीचें वस्त्रहरण केल्याशिवाय सोडणार नाहीं! समज-

लीस ? ( पडद्या पलीकडे उंच स्वरानें ) रे नरपशो .रे आर्जितरौरवा[1] कौरवा, भैरवापरि हा विभीषण भीमसिंग, कराळ[2] करवाळासह[3] तुझा काळव्याळ आला, बघ; तुझे प्राण हरण केल्याशिवाय सोडणार नाहीं ! ! समजलास ?

(भीमसिंग प्रवेश करितो व त्याला पाहून मालदेव पळून जातो.)

**राणाभीमसिंगः**—रे यवनशतबंधो, अरे कलियुगदुःशासना, ही या भीमसिंगाची दुर्धर प्रतिज्ञा ऐक. 'समरंगणांत प्रसंग आल्यास तुझ्या रक्तानें पितरांचें तर्पण न करीन तर मी क्षत्रिय कुलोत्पन्नच नव्हे. असें स्थिरचर ससाक्षिक सांगतों.'( मिशांवर ताव देतो ) प्रिये पद्मिनी, तुझी मी आज फार वेळ उपेक्षा केली; या कारणें तुला पुष्कळ ताप सोसावा लागला. याजविषयीं मला फार खंत वाटते. याची मला क्षमा कर.

( पद्मिनी भीमसिंगास कडकडून मिठी मारिते. )

**राणीपद्मिनीः**—प्राणनाथ, हे पाय खुशाल असले ह्मणजे माझी सदोदित क्षमाच आहे. पण आपण आलां कसे या वेळीं ?

**राणाभीमसिंगः**—प्रिये, तें सर्व यथावकाशानें सांगेन. तूर्त आपले स्वार दोन गौवर[4] चोरबारींत तयार आहेत. त्यांजबरोबर रातोरात किल्यावर गेलें पाहिजे. तर चला. हल्लचांत एकंदर आपली सरशी झाली; व मगासच्या शाहजादीला आपल्या लोकांनीं पाडाव करून नेलें; आतां बादशहाला तह करण्याखेरीज तोडच राहिली नाहीं. जगदीश कृपेनें तुमच्या सर्वांच्या प्रयत्नाला आणि आपल्या सरदारांच्या तरवारींनां यश आलें. ( मनांत ) अरेरे ! बिचारा वृद्ध योद्धा गोरा लढाईंत पडला ! पण हें यावेळीं हिला कळवूं नये. ( उघड ) करितां चला आपआपलें अश्वारोहण करूं. ( ईश्वराला नमन करून दोघे जातात. )

## अंक दुसरा समाप्त.

---

१ 'रौरव' सात नरकांपैकीं एक. २ कराळ=भयंकर. ३ करवाल=तरवार. ४ "गौ" =( गुजराथेकडे) एक कोसाला ह्मणतात.

... ग्रंथ संग्रहालय

# अंक तिसरा.

## प्रवेश पहिला.

स्थळः–चितूरराजवाडा.

( राणाभीमसिंग, राणीपद्मिनी आणि सिंगराव बोलत बसलेआहेत. )

**राणाभीमसिंगः**–( पद्मिनीस ) प्रिये, हा भाट काय सांगतो हें ऐक नीट. एखादी मुलगी चांगलीशी आली तरी आधीं तुझ्या पसंतीस उतरत नाहीं. बरें, कदाचित् उतरली तर माझ्या ऊरसिंगाच्या मनाला येत नाहीं. आणि मला तर असें झालें आहे कीं, एकदां त्याचें लग्न केव्हां होतें. ह्मणजे मग ' हरि हरि ' ह्मणण्याला मोकळे. गुरूपदेशाची इच्छा होती तीही ज्ञानराज महाराजांनीं परिपूर्ण केली; ( हांसून ) आणखी, सुंदर सुंदर रत्नांच्या उपभोगाची, आपण–

**राणीपद्मिनीः**–( हांसून ) पुरे. मेलें नुसतें तोंडानें ह्मणायला काय होतें ? ( सिंगरावास ) कायरे, इतकी वर्णनीय मुलगी आहे ती ? सारा इत्थंभूत वृत्तांत सांग.

**सिंगरावः**–माताजी, जयपूर, बिकानेर, नागोर आणि आह्मी, या चार राजांचें माळव्यांत एकत्र जमलेलें कूट पाहून काफूर जो निसटला तो नर्मदा उतरून तडक त्यानें कर्णाटकची वाट धरिली. मग आह्मीं जोधपुराकडे वळून लमाणांनां लुटणारे जे पुंड उठले होते, त्यांचा बंदोबस्त करून कांहीं मुक्काम तेथें केले. त्या रानांत आमचा तळ असतां एके दिवशीं सकाळींच आह्मो स्वार होऊन शिकारीस गेलों. सुमार प्रहर दिवसाला एक भला गलेलठ्ठ माजलेला रानडुकर अवचित झाडींतून उतरून समोर राजपुत्राच्याच घोड्यावर पाठमोरा चवताळून येऊन त्याणें

त्याची कूस तर साफ दुभांगली; पण तें अस्सल तल्लख आरबी जनावरच! त्याणें डुकराची मुसंडी जमीनिवर पडतां पडतां चुकविली; आणि आतां एकदम पडणार तंव राजपुत्रानें वरच्यावर अल्लग हरिणा सारखी टण्कन उडी मारून एका शिलेदाराच्या मागें घोडच्यावर बसला. शिलेदारी तट्टू काठेवाडी अबलख होता. हंहं ह्मणतां दोघांनां घेऊन दूर उडाला. इतक्यांत 'राजपुत्र पडला! राजपुत्र पडला!' असा एकच हाहाःकार होऊन चोहींकडून तेथें स्वार कोसळले. तों पुन्हा राजपुत्र दुसऱ्या कुमाइतावर बसून येऊन पाहतो तों ते वराहराज दूर चालते झाले. तेव्हां त्याचा माग काढीत काढीत राजपुत्र चालला. डुकरानें माघारा वळून एकाएकीं राजपुत्रावर हल्ला करावा; त्याणें त्याला हटवून त्याचा पाठलाग करावा; अशी झटापट होतां होतां तो डुकर एका उंच जोंधळ्याचे अफाट शेतांत घुसला. तेथें राजपुत्राचा प्रवेश होईना ह्मणून निराश होऊन हळूहळू दोन प्रहरचे सुमारास आमच्या तळाकडे स्वारी परतली. इकडे खाशाडेऱ्यांत भोजनाची तयारी झालीच होती; परंतु 'ईश्वरानें कुंवरजीवर आज मोठी खैर केली' ह्मणून बडेबडे टाकूर लोकांनीं पुष्कळ खैरात करून राजपुत्राला टोलेजंग मेजवानी दिली—

राणीपद्मिनीः—( हांसत ) मेल्या, तुझी मात्र बिन्‌श्रम खूपचंगळ उडाली.

सिंगरावः—हो; मग तर तुमची राजे लोकांची हांजी हांजी करून आह्मीं गरीबांनीं आश्रय कां संपादावयाचा? असो. पुढें जेवून उठून विडा अत्तर गुलाब चालला आहे तों एक तरणीताठी मुलगी दुरून कांहीं काळें काळें ओढीत येतां दिसली. आमची सर्व मंडळी आश्चर्य करीत हें काय आहे ह्मणून चौकशी करवणार तों तीच मुलगी—गोरीगोरी पान; बांधा चौंवळीच्या शेंगे सारिखा पि-

१ ( गरीबलोकांस ) धर्मादाव.

ळदार आणि मांसळ;सर्व शरीरावयव एकमेकांस साजतील असे यथा माप, आणखी पूर्ण फुललेले; तारुण्यानें व उन्हानें गाल आणि हाता-पायांचे तळवे अळित्यापरि लालीलाल झालेले; भव्य कपाळावर कुंकुवाची चिरी आणि डोळ्यांत काजळ रेखलें आहे; त्यावर घामाचे कण चमकताहेत; काळ्या लुगड्याची खचून कांस मारिली आहे; तंगदार तांबडी कांचोळी ल्याली आहे; कुळकुळित तुळतुळीत केशांच्या घट्ट बुचड्यावर पिंवळ्या, शेंद्री, शेवंतीच्या फुलांची व झेंडूच्या गोंड्यांची थाटून दाटण उडाली आहे; डाव्या हातानें काळा भेसुर लठ्ठ डुक्कर डावी तंगडी धरून फरफरावीत आहे; उजव्या हातानें भुरभुर उडणारे कपाळावरील कुरळ कुरळ केश वारीत आहे, जणुंकाय ती साक्षात् जगदंबाच महिषासुराचें मर्दन करून विजयश्रीनें प्रफुल्लित मुखकमळ झालेली अशी ती हंसतमुख सुस्वरूप स्त्री राजपुत्राच्या संमुख येऊन उभी ठाकली. आणि गंभीर मंजुळ वाणीनें त्याला ह्मणाली ‘ महाराज ही आपली शिकार पहा!’

राणाभीमसिंगः–(हांसून) शाबास! हिचें नांव मुलगी! (पद्मिनीकडे बोट करून ) नाहीं तर हें आमचें रत्न: जेव्हां शाहजादी हाताला धरून फरफरावूं लागली, तेव्हां लागली तिच्या पुढें गळा काढून गयांव्यां करायला.

सिंगरावः–होहो; महाराज, आज इतके दिवस लोटले; पण मला अजून त्या गोष्टीची पुरी वार्ता नाहीं कळली. आपण तेथें अकस्मात् कसे उपटलां?

राणीपद्मिनीः – शिंगराव, पुरे मेल्या त्या दुःखाच्या गोष्टी. झाल्या, गतल्या; आतां काय त्याचें ? कथेंत भाकड कथा नको. तेव्हांचें स्मरण झालें कीं, माझ्या काकाविषयीं पोटांत भडभडून येतें. ( डोळ्यांत आसवें आणिते. )

राणाभीमसिंगः-अरे, यांत मोठें नवल नाहीं. आह्मी दोघें

बादशाही डेऱ्यांतून परतणाऱ्या पालख्यांतून पळालों; पुढें घोडे तयार होतेच; त्यांवरून भरधांव चाललों; इतक्यांत बादशाही पदकांतली खाशी मंडळी आली पाठीवर. हिला त्या घनदाट झाडींत जाण्याला खुणावून मी त्यांनां सामना झालों. त्यांची दाणादाण करून आडमार्गानें लोकांची नजर चुकावीत चुकावीत, दडून तिकडे जात असतां ती शाहजादी दुरून पाहिली. ती कोण, काय, हें तिच्या भाषणोद्गारांवरून उमगून, पुढें ती काय करिते हें पाहण्याच्या इराद्यानें, घोड्याची टांप न वाजवितां, वळणें वळणें घेऊन, पद्मिनीपासून शब्दाच्या टप्प्यांत, आडवळणावर वृक्षाच्या आड उभा राहिलों आणि तेथून शाहजादीची आणखी मालदेवाची सारा गम्मत पाहिली. ( हांसतो. )

राणीपद्मिनी: –( हांसून ) जळ्ळी मेली असली गम्मत ती! प्राण जाईतों कोठें गम्मत बोलली आहेका ? ए शिंगरा, चालूंदे पुढें तुझी हकीकत. पण सुरेख होतीरे ती मुलगी?

सिंगराव:– सांगतोंच आहेंना? आपल्या सारख्या सासूबाईंनां तसलीच सूनबाई साजे. मात्र ती मर्दानी बाण्याची देखणी आहे; नाजूक पुतळी नव्हे. असो. असा तो महिषासुरमथनीचा अवतार पाहून, आह्मीं तोंडांत बोटें घालून, एकमेकांकडे उगीच टकटक् पहात राहिलों. कोणी तिजशीं चकारशब्द बोलेना. तेव्हां राजपुत्रानें स्वतांच तिला हटकलें ‘ मुली, तूं कोणाची कोण ? आणि येथें कोठें राहतेस ?’ तिणें हास्यमुख करून उत्तर दिलें. ‘ महाराज, आह्मी सोळांके कुळांतले असून प्राचीन काळीं अन्हलवाडा[1] येथें बल्हारे नांवाचे जे राजे राज्य करीत होते, त्यांपैकीं माझा बाबा होय. माझे आजेपणजे बेदनूर व त्याच्या खालचे प्रांत यांचे सत्ताधारी असत. परंतु दिल्लीचा तख्ताधिपति सुल्तान नासुरुद्दीन पादशहा, याच्या बुल्बन् नामक वजीरानें त्यांजवर चढाई क-

---

१ अन्हलवाडा, ज्यास हल्लीं ‘ पाटण ’ ह्मणतात.

रून त्यांस तेथून हांकून लाविलें. नंतर ते तर प्रयत्न करितां करितां मरून गेले; माझ्या बाबाजवळ जिवाचें माणूस कीं काणूस कोणी देखील राहिलें नाहीं; पैशाविणें आमची कंगाल दशा आली; माझे दोन लहानगे भाऊ व मी अशीं तीन मुलें मोठ्या खानदानीनें पोसायाचीं पडलीं; आमच्या भायादांनीं शत्रूपरीस आमची दुर्दशा मांडिली ! शेवटीं निरुपायास्तव माझा बाबा आमचें कुटुंब घेऊन या रानांत आला. आणि शेतभातीवर आपला निर्वाह चालवूं लागला. आतां आह्मी मुलें जाणतीं होऊन त्याच्या शेतकामास हातबोट लावतों. आणि निर्धास्त येथें सुखानें काळ काढतों. आज सकाळीं जेव्हां कुकुडकुंबा 'कुकूकुकू' करूं लागला, तेव्हां माझ्या आईनें मला नाहूंमाखूं घालून, चटणीभाकरी देऊन, या पलीकडल्याच्या पलीकडल्या शेतांत माझा बाबा माळा घालून शेताच्या राखणेकरितां रात्रींचा परसा पेटवून राहतो. त्याला सोडविण्याकरितां मला पाठविलें. मघांशीं तुमची शिकार आमच्या शेतांत शिरलेली म्यां पाहून आठदहा सडक उंच ज्वारीचीं ताटें उपटून, भाल्यासारीं त्यांचीं टोकें शेवटून, त्याच्या दोन्हीं कण्यांत दोन खुपशिलीं; आणि जंव तो उलट खातो तंव आणखीं दोन ताटें त्याच्या एका बरगडींत मारिलीं. ताटें टच्‌टच् मांसाला टोंचून अंगाला भिडून राहिल्यानें त्या फडांत त्याला अरतापरता फिरतां येईना; हत्तीला निगंड अगर दरवाज्याला अरगळ घालावी तसा खिळून राहिला. शेवटीं ठिकठिकाणीं आणखी आमच्या गांवठी बरच्या मारल्यावर तो जमिनीवर पडला; आणि ती शिकार आपली असें माहित असल्यामुळें आपल्याकडे आणून टाकिली. आतां मी जातें.' मुलगी उपवर पाहून तिला मीं ह्मटलें. 'मुली, लग्न करितेसका?' ती ह्मणाली 'अरे जा; तुमच्या जरत्कारूच्या सवें लग्न कोण लावितो?'

---

१ बंधन.

मीं मात्क्यानें ह्मणालों ' मुली, बघ; मजपाशीं खूप दौलत आहे. ' तिणें उत्तर केलें ' मला दौलतीशीं लग्न करणें नाहीं; मर्दाशीं होय ! ' ( हांसतो. )

**राणीपद्मिनीः**–( मोठ्यानें हांसत ) हुहुहुहुः बरी मेल्या फजीत्या, तुझी, बरी टर उडविलीन् तिणें. भारी मेल्याला बायकांशीं अचावचा बोलायला पाहिजे.

**राणाभीमसिंगः**-( हांसत ) हो, हो, होः अहो नामर्दगाजी, पढा आपला इतिहास–पुढें.

**सिंगरावः**– या प्रमाणें आह्मांला सर्वांला विस्मयांत पाडून ती तर निघून गेलीच; परंतु पश्चात् कुंवरजीला तिचा अगदीं भुंगा जडला. घटकेघटके, तिची गोष्ट काढल्याविना त्याच्यानें राहवेना. त्या डुकराकडे जाई; त्याच्या तीनतीनदां जखमा मोजी; तिच्या वाटे कडे पाही; तिची हरयेक गोष्टीची वाखाणणी करी. तिसऱ्या प्रहरानंतर घोडे फेरण्याच्या निमित्तानें आमची कांहीं निवडक मंडळी घेऊन तिच्या त्या शेताकडेच एक लांब रुंद पटांगण होतें तेथें कुंवरजी गेले. संध्याकाळ पावेतों घोड्यांच्या कसरतींचे व शिपायांच्या हस्तकौशल्याचे, परोपरीच्या कुसरींचे खेळ खेळल्यानंतर मकाणाला जाण्याला आह्मी परतलों. वाटेनें येत असतां समोरूनच एक बाई, दुधाच्या चरव्यांची उतरंड डोक्यावर घेतलेली व दोन हातांत दोन सोरटी रेड्या धरून चाललेली, अशी दिसली. आमच्यापैकीं एक जण ह्मणतो ' गड्यांनों, इच्या डोईवरल्या घड्या घडघडल्या तर भली मजा होईल. ' झालें; इतकी कल्पना निघाली मात्र, तों एक घोडेस्वार ' घोडा मस्ती करितो ' असें मिष करून तिच्या जवळ जाऊन लगटला; आणि आतां ती जखडलेली भांड्यांची उतरंड ढांसळणार इतक्यांत ती धीट बाई काडीभरसुद्धां न डगमगतां चालल्या चालल्याच तिनें मोठ्या खुबीनें चट्कर एका ह्मशीचें जगडव्याळ वांक-

डें तिकडें शिंग घोड्याच्या जेरबंदांत आडकवून वरल्या स्वाराला धाड्‌कन् उलथाच्या पालथा खालीं पाडिलें. मग काय ? जो अकटोविकट हंशा पिकला, आणि जी एकच हुऱ्योहुऱ्यो उडाली ती पुसतां सोय नाहीं.माझें तर हंसतां हंसतां पोट दुखूं लागलें. आणि जेव्हां तिला जवळ आल्यावर आह्मीं पाहिलें कीं, सकाळचीच ही मुलगी आहे, तेव्हां महाराज, काय सांगूं ?—गप्पकर सारे आह्मी निमूट तिजकडे पहात चित्रागत तटस्थ उभे राहिलों. अथापि तिची मुखचर्या इतकी गंभीर होती कीं, आनंदाचें अथवा हांसण्याचें कांहीं एक चिन्ह तिच्या तोंडावर दिसलें नाहीं. ती दूर गेल्यावर जो तो तिची 'धन्य, धन्य, शाबास !' करूं लागला. राजपुत्र ऊरसिंगजी तर तिचें शौर्य, धैर्य आणि सौंदर्य इत्यादि गुणांनीं इतके वेडावले कीं, आमच्या तळाकडे जाण्याचें सोडून त्यांनीं तटक तिच्या पाठोपाठ तिचे बापाच्या घरीं एक जासूद पाठवून त्याला आणिलें. तो आला, तो कांहीं भीडमर्यादा न धरितां गालीच्यावर राजपुत्राच्या मांडीशीं मांडी लावून लोडाशीं टेंकून बसला! 'तुमची मुलगी मला बायको करण्याकरितां देतां काय ?' असा राजपुत्रानें त्याला बिनदिक्कत प्रश्न केला. महाराज, पद्मिनी माताजी, या कामीं ऊरसिंगाच्या उतावळेपणाविषयीं आपणांला जें नवल वाटेल, त्याजपेक्षां तिच्या बापानें जें त्याला उत्तर दिलें त्याचेविषयीं पराकाष्ठेचें आश्चर्य होईल. तो ह्मणाला 'कुंवरजी, माझी मुलगी तुह्मांला देण्याविषयींचा रुकार मजकडून साफ मिळणें नाहीं. तुह्मी जरी मोठे राजे झालां, तरी तुमचें कुळगोत आह्मांला पसंत नाहीं. फार प्राचीन काळीं त्यांत कांहीं घोंटाळा झाला आहे, असें आमच्या ऐकिवांत आहे. तशांतून ती पडली, गरीब दशेला आलेल्या थोर कुळांतली मानी मुलगी. तुह्मी व तुमचे चाकरमाने तिला हिणवाल; तिची हेळसांड कराल; माझी साळीभोळी पोर पट्‌कन् प्राण टाकील. आणखी फिरून,

आतां ती जाणती आहे; तिला बरें वाईट सर्व कळतें. तर तिला जेवेळीं व ज्यापाशीं लग्न लावणें आवडेल तेव्हां तिला माझी मुभा आहे. परंतु तिच्या मनाविरुद्ध 'अमक्याशींच लग्न कर' असें मी कदापि ह्मणणार नाहीं.' राजपुत्रानें आपल्या कुलीनपणाविषयीं त्याची खात्री करण्याचा पुष्कळ प्रयत्न केला; आणि त्याच्या पुढें आपल्या वंशावळीचें साद्यंत झाड लिहून ठेविलें. तें पाहून तो ह्मणाला 'कुंवरजी, तुमच्या गळ्याची शपथ, मला लिहितां वाचतां येत नाहीं. मला अगर माझ्या दोन्ही मुलग्यांनां फक्त एक जंब्या नी ढाल द्या; आह्मी एकेकटे वाघाची शिकार मारून येऊं; परंतु आह्मांला एक ओळ किंवा अक्षर काढितां येईल तर हराम ! अहो, तरवारीनें पोट भरत नसेल तर ती भिकारी लेखणी नी कलमदान ! आमचे आजेपणजे ह्मणत कीं, महाकाळी आणि महासरस्वती यांचें उभयतां मोठें खडेजंगी वांकडें आहे. विद्येचे निजध्यासें मनुष्य कमकुंवत व कमधीर होतो !! असो. याप्रमाणें त्या दोघांची 'भवति न भवति' झाल्यावर ठाकूर उठून गेला. आणि घरीं गेल्यावर झालेलें वर्तमान त्याणें आपल्या बायकोस सांगितलें. तें ऐकून ती आपल्या नवऱ्यावर रागें भरली. ती मोठी समजूतदार बायको आहे. तिणें त्याला परतून राजपुत्राकडे माघारें पाठविलें आणि कळविलें कीं, 'आह्मीं मुलीचा विचार घेऊन कायतें आपणांस नक्की कळवितों.'

राणाभीमसिंगः—पुरे. आतां आलें ध्यानांत सर्व. कुंवरजी कांहींतरी वाहणा करून त्या मुलीकरितां तेथें जुजबी मंडळी ठेवून राहिला. परंतु सडा राहिला हें अगदीं अविचाराचें काम केलें. ( जरा थांबून ) बरें, मुलगी तर तुमच्या सर्वांच्या व त्याच्या पसंतीस उतरलीना?

सिंगरावः—पसंतीस ह्मणजे काय? तिला पसंत ह्मणण्याची आमची योग्यताच नाहीं. ब्रह्मदेवानें राजपुत्राशीं गांठ मारिली

असेल तर इच्याशींच असेल. नाहींतर यावज्जीव भीष्माचार्यांगत ब्रह्मचर्यांत दिवस काढावयाचे, असा कुंवरजीनें पण केला आहे.

राणाभीमसिंगः—असो. तर कांहीं चिंता नाहीं. स्वतां तिच्या बापाकडे जाऊन मग बनेल तसें करूं.

राणीपद्मिनीः—हं. पण असली सोन्यासारखी सून हातची जाऊं द्यावयाची नाहीं बरेंका. मी तिला केंव्हां पाहीनसें झालें आहे.

राणाभीमसिंगः—( हांसून ) छेः जाऊं कोण देतो असलें रत्न ? पण सासूबाईंनां आवडलीना ? अहाहा, सासूबाई काय ? उत्तम उत्तम वस्त्रालंकार घालावे; हरिद्रा, कुंकुम, कज्जल सुरेख लेववावें; गळीं, मस्तकीं, हातीं, पुष्पांचे हार तुरे गजरे द्यावे; आणि वसंतऋतूंत देव्हाऱ्यांतील डोल्हाऱ्यांत देवी बसवितात तसें महालांतील मंचकावर बसवावें. ( हांसतो ) हो होः

राणीपद्मिनीः—(हांसून) ह्मणूनच ही मला असली काठेवाडी सून पाहिजे ! तर चला; आपापल्या कामाला लागावें कसें, बाई.

( सर्व उठून जातात. )

## प्रवेश दुसरा.

( फकिराचा वेष घेतलेला राणाभीमसिंग प्रवेश करितो. )

फकीरः—या नरतनूंत येण्या पूर्वीं प्राण्याला लाखोंगणती सोंगें घ्यावीं लागतात. बरें, या सोंगांत तरी वेळोवेळीं किती पडसोंगें आणावीं लागतात. आजकाल्हीं आरसा घेऊन पाहूं लागलों तर माझ्या स्वतांला मी ओळखीन कीं नाहीं याची भ्रांति आहे. तरीदेखील कुंवरजीच्या समोर जाऊन उपयोग नाहीं. त्याणें कदाचित् ओळखिलें तर पंचाईत पडेल. तरी कुंवरजी शिकारीहून जों परत आला नाहीं तों त्याच्या भावी सासऱ्याकडे जाऊन तिकडचा समाचार काढण्याला ही संधि बरी आहे. काय करावें? राजपुत्र आपल्या आवडत्या स्त्रियेसह चितूर शहराला जाण्याकरितां उद-

यीक प्रस्थान करणार ह्मणून ऐकितों. वाटेवर तो खोज्या मालदेव शाहजादीप्रीत्यर्थ त्याला पकडून नेण्याकरितां खड्यानागासारिखा, वेटोळें घालून बसला आहे; आणि या स्त्रीलंपटाला त्याज विषयीं बिलकुल मागमूसही नाहीं. बरें रम्मल बिम्मलाच्या होऱ्याचें ढोंग करून तिच्या बापा करवीं त्याला न जाण्याविषयीं आग्रह करवीन; परंतु तो चतुर मुलगा असल्या थातुर मातुराला धूप घालणार आहे? स्वतांचें रूप प्रगट करून त्याला सावध करीन तर कदाचित् तो लज्जेनें अथवा भीतीनें एकटाच निसटून गेला तरी घात. आणखी, मग या खोऱ्यांत आपलें येणें सर्वांनां महशूर होऊन सध्यांचा आपला निर्भयपणा गमावेल; व त्या दुष्टाकडील बातमी काढण्याला कांहीं साधन राहणार नाहीं. स्वतांच्या लोकांनां तीन दिवसांनीं मागून येण्याला सांगितलें आहे. तेव्हां आतां कसें? (जरा विचार करून) दुसरें काय? प्रभूचें नांव घेऊन संरक्षणार्थ मुलाच्या पाठीवर असावयाचें. मला तरी एकटाच पुढें येण्याची बुद्धि झाली हें भाग्यच समजलें पाहिजे. 'तारत्यापुढें मारत्याचें चालत नाहीं' हें खरें आहे. मावरूलनहर प्रांताकडून तो भला जंगी धरणीकंप[1] शहरोंशहरीं धक्के देत देत घारीनदी[2] उतरून थेट दिल्लीवर आला नसता तर आजकाळ आपल्या राजधानीवरही दुसऱ्यानें आलेली वाव्हटळ कधीं माघारली नसती. अहो, मग पण केवढा कहर कोसळला असता! मी इकडे; ऊरसिंग इकडे; जवळ सैन्याचा उत्तम पुरवठा नाहीं; कोणाला त्या हल्ल्याची अद्याप आगापिछा नाहीं; मलाही नसती; पण या सोंगाच्यामुळें समजली. तेव्हां, ईश्वर तारणारा झाला ह्मणजे कोणाच्यानेंही मारवत नाहीं. तोच आतां काय तड लावील ती खरी; 'भयकृत् भयनाशनः' तूर्त तिकडे चलावें तें बरें. (निघून जातो.)

---

१ दोन लक्ष मोंगललोक पंजाबाकडून लुटीत, देश उद्ध्वस्त करीत दिल्लीवर आले. २ सतलज.

## प्रवेश तिसरा.

स्थलः— अरण्य; ऊरसिंगाचा तंबू. वेळः— रात्र. ( ऊरसिंग व शांता[1] गोष्टी करीत बसलीं आहेत. )

शांताः— सरकार, या मकाणाहून आपली राजधानी किती दूर राहिली ?

ऊरसिंगः— येथून चितूर सारें तीन टप्पे राहिलें. काय तें भीतीचें स्थळ अबूपहाडाच्या लगत्याचें मोठें भयानक विस्तीर्ण अरण्य, तें वलांडलें; व ही सारी आपलीच प्रजा आहे, तेव्हां शत्रूचें तादृश भय नाहीं; आणि सांप्रत आपल्या बरोबर असलेली फौजेची तुकडी मोठी बागेदार कसलेली आहे.

शांताः— पण ही टोळी आली कशी ?

ऊरसिंगः— मी सडा आहें असें समजून माझ्या बाबांनीं माझ्या संरक्षणार्थ ह्यांनां पाठविलें. हे जर त्या दिवशीं असते तर शत्रूचा फन्ना उडविला असता. ( जरा थांबून ) खरोखर शांते, कोण तो ते दिवशींचा प्रसंग ! जर ह्या तुझ्या गोजिरवाण्या गोंडस उजव्या हातानें त्या पठाण स्वाराच्या बर्चीचा फाळ[2] मध्येंच अलग केला नसता, तर आज हा दिवस पाहिला नसता! बाबांनीं हें जर पाहिलें असतें तर तेव्हांच आपलें लग्न लावून देते.

शांताः—( लाजून ) महाराज, त्याची ती इतकी वाखाणणी कशाला ? ही आपल्या मातापितरांची पुण्याई उभी राहिली.

ऊरसिंगः—( हांसून ) हो. आणखी तुझ्या मंगळसूत्राची व हाताची बळकटीही ह्मणसना. नाहींतर हे कृतज्ञ ओंठ या तुझ्या उपकारी हाताचे उतराई होण्याला आज राहिले असते ? ( तिच्या हातांचें चुंबन करितो. )

शांताः—( लाजून ) हें काय बाई ? ( मागें होते. )

---

१ ऊरसिंगाची भावी स्त्री; जिला पुढें सुशीला असें नांव दिलें आहे; व जिचे पोटीं हम्मीरसिंग उत्पन्न झाला. २ पोलादी पान, पात

ऊरसिंगः—( हांसून ) प्रिये, हें चुंबन;(पुन्हा चुंबन करितो) आणि तुझ्या मोठेपणाची खूण.

शांताः—( गोंधळून ) हें काय बाई ?

ऊरसिंगः—( मागें होऊन ) शांते, भिऊं नको. लग्न होई पर्यंत मजकडूनही अन्यथा गोष्ट घडणार नाहीं. ( दोघेंही जरा थांबतात. )

शांताः—( मनांत ) आतां बोलल्या शिवाय जाणें ह्मणजे गैर. ( आणि इथून जाण्याला मन तरी घेतें कुठे ? ) असे झिड-कारिल्यामुळें यांनां राग आला, आणि आपल्या गरीबाचा अंगि-कार करणें यांनीं नाकारिलें, तर इतकी येऊन, आपला सर्वस्वीं नाश होईल. न झिडकारावें तर आई वारंवार सांगते तसें, जन्म-भर यांची वेश्या बनून रहावें लागेल. तेव्हां, दुसरे चार शब्द गोड लागतीलसे बोलावे आणि आपली आज्ञा मागावी. ( उघड ) आपल्या लोकांनीं शत्रूला तोंड देऊन गुंतविलें तरी त्यां पैकीं एक स्वार आपली अगदीं पिछाडी धरून असे. त्याणें किती तरी घाले मधच्या मध्येंच छाटले. तो होता ह्मणून पुष्कळ आपला बचाव झाला. मी चौकशी करीत आहें कीं, असा तो शिपाई कोण ? पण त्याचा पत्ता लागत नाहीं. ( हांसून ) तो आपला ह्मा-तारा शिलेदार मला ह्मणतो 'बाईसाहेब, इतक्या मर्दुमकीचें काम आपल्या मामाजींनींच करावें. दुसऱ्या कोणाच्यानें होणार नाहीं.'

ऊरसिंगः—बाबा कशाचे इकडे येतात ? हा कोण महात्मा अ-सेल तो असो. सज्जनांचें असें कर्म असतें कीं, परोपकार करून गुप्त असावयाचें.

शांताः—तो रम्मल जाणणारा फकीर तरी मुसुलमान होऊन किती चांगला ! माझ्या बाबाला तीनतीनदां विनवून सांगे कीं, 'बाबा, तूं आपल्या—( लाजून थांबते. )'

१ स्वामी किंवा श्रेष्ठ यांचे हाताचें चुंबन करावें.

ऊरसिंगः–( हांसून ) कां थांबलां कां?

शांताः–( ऊरसिंगाकडे बोट करून ) 'निदान पांच दिवस तरी जाऊं देऊं नको. सध्यां होरा अगदीं वाईट आहे; वाटेंत त्यांनां फार दगाफटका होईल. बरें पांच दिवसांउपरांतिक खचीत त्यांला उत्तम पाठबळ मिळेल.' असें त्याणें सांगितलें. त्याच्या ह्मणण्या प्रमाणें दोन्ही गोष्टी घडल्या.

ऊरसिंगः–मला त्या फकीराच्या बोलण्यावर भरंवसा ठेववत नाहीं. माझी भेट घेण्याविषयीं तुझ्या बापानें ( हांसून ) ह्मणजे, माझ्या होणाऱ्या सासऱ्यानें–त्याला सांगीतलें असतां त्यानें तोंड सुद्धां दाखविलें नाहीं.

शांताः–आपण कांहीं ह्मणा; पण तो चांगला खचीत. तो मला ह्मणाला 'बेटा, तूं माझी धर्माची मुलगी. तुला राजपुत्र नवरा मिळाला तर मला गरीब फकीराला ओळखशील तरी?'

ऊरसिंगः–( आपल्याशींच) बायका कितीही चतुर नी शाहण्या झाल्या तरी कोणी त्यांच्या मनाजोगें गोडगोड बोलणारा भुलथाप्या मिळाला कीं, आपल्या फसावयाच्या. ( उघड ) प्रिये, ही तर त्याची पुरी ठकबाजी. तुमच्या विषयीं शेजारीं पाजारीं गुपचुप चौकशी करावयाची; व तेंच तुह्मांला येऊन सांगावयाचें. मला वाटतें हा फकीर शत्रूचा टेहळ्या असावा. दुसरें, त्या टोळीचा सरदार तुला व मला पकडून दिल्लीस नेणार होता; आणि तुला शाहजादा मुबारिक यास नजर करणार होता. मग त्या फकीराचें ह्मणणें खरें झालें असतें कीं नाहीं?

शांताः–( भोंवया चढवून ) महाराज, तसाच प्रसंग येता तर कित्येकांचे प्राण घेऊन मग माझा दिला असता! ( तिचे ओंठ थरारतात. )

ऊरसिंगः–प्रिये, तूं तशीच आहेस; पण रागावूं नको; ख-

शेखर मीं असें ऐकिलें. हिंदु स्त्रियांचीं अप्रतिम लावण्यें पाहून हे शाहजादे त्यांजवर मनस्वी भाळले आहेत.

**शांताः**–( हांसून ) आणि या पायांवर शाहजादी फिदा जाहली आहे !

**ऊरसिंगः**–( हांसून ) ती चितूर शहरांत असतां लोक असें बोलत खरें. पहिलें लढाईचें मूळ तिच्याच मध्यस्तीनें मिटलें. ( जरा थांबून ) पण प्रिये, धर्माचरणांत तिला का पाटीं बसवायाची आहे ?

**शांताः**–परंतु एकदां आपण आपल्या राजमंडळांत गेलां कीं, मग आपल्या आगभाक क्रियेचें स्मरण तरी राहील ?

**ऊरसिंगः**–हें काय विचारणें बरें प्रिये ? ' तुज शिवाय इतर स्त्री वरणार नाहीं; तुला कोणतीही नड करणार नाहीं; तुझी व तुझ्या आई बापांची ह्मणाल तेव्हां भेट करवीन; तुला पडदपोशींत अटकावणार नाहीं; तुझा काडीमात्र आव्हेर करणार नाहीं.' कितीदां तरी त्याची उजळणी करूं ? सांग याहून आणखी कांहीं तुझ्या अटी आहेत ?

**शांताः**–मला अप्रबुद्धेला तूर्त आणखीं काय कळणार ?

**ऊरसिंगः**–शाबास ग; ' अप्रबुद्धि, अप्रबुद्धि ' ह्मणून मला तर सर्व गोंवून घेतलें. ( हांसून ) आणखीही याउपर ज्या ज्या वाजवी शर्ती असतील त्याही मला मान्य आहेत. झालें आतां ? हें घे माझें वचन. ( वचन देण्यास हात पुढें करितो. )

**शांताः**–( हास्यमुख करून ) नाहीं. यथाविधि लग्न झाल्याविना हात सुद्धां पुढें सरसावणार नाहीं ! आई ह्मणते, 'ज्या पुरुषाला एकवार हात दिला तो पुन्हा कदापि आजन्मांत परत घेऊं नये. ' आपण राजपुत्र; पुढेंमागें मर्जी फिरली, किंवा हा क्षुल्लक संबंध न जडावा असें मन फिरलें तर मला मग राखेचा जन्म घालवावा लागेल !

ऊरसिंगः–( मनांत ) अरे, ही हाताशीं देखील हात लागूं देत नाहीं; तों हिच्या या स्फुरण पावणाऱ्या मोहक ओंठाशीं गांठ कशी पडणार? (उघड, जरा सरोष मुद्रेनें ) एकूण मलाच वरण्या विषयीं तुझाही अजून दृढ निश्चय नाहीं तर?

शांताः–(हात जोडून) महाराज, आईबापांनीं देवा प्रमाणें आपल्याला मला वाहिली; या पायांची निरंतर दासी व्हावें ह्मणून मी जन्मघरही सोडून आलें. मात्र, आपली राजेलोकांची जात क्षणांत बदलामीवर यावयाची असें सांगतात. खोटें असल्यास क्षमा असावी.

ऊरसिंगः–छे वेड्ये, असें कोणीं केलें आहे का?

शांताः–हो. पुरुवंशांतला प्रख्यात राजा दुष्यंत.

ऊरसिंगः–अग, पण आमच्या वंशांत?–

शांताः–( हांसून ) एका मोठ्या मुगुटमणीनें आपली लग्नाची निरपराधी बायको रानांत सोडून दिली, ह्मणून नुक्तेंच आई सांगत होती.

ऊरसिंगः–( मनांत ) वा! हा आपलाच वार आपल्या अंगावर आला ( उघड ) पण मी स्वतां फिरेन असें तुला वाटतें?

शांताः–(हांस्यमुख करून) हें मी इतक्यांत काय सांगूं? परंतु आपल्या तीर्थरूप मातोश्रींनां ही गोष्ट नापसंत झाली तर?

ऊरसिंगः–( मनांत ) या विषयीं आपण हिची पुष्कळदां समजूत केली. तरी तिची खात्री होत नाहीं. तर आतां अशी क्लृप्ति लढवूंया. ( उघड ) तूं न आवडलीस तर त्यांनां सोडीन!

शांताः–( चकित होऊन ) छे छे, महाराज, हें काय? गारे करितां हिरे सांडावयाचे?

ऊरसिंगः–प्रिये, तुला वरण्याशिवाय कोणतीही त्यांची आज्ञा मी पाळीन. फारतरकाय, साक्षात् परमेश्वरानें ह्मटलें कीं,

---

१ रामानें सीता टाकिली.

'तुझ्या बरोबर लग्न लावूं नको' तर त्यालाही सोडीन! (पडद्या पलीकडे) 'हां हां मूर्खा, सावध हो; सावध हो; असा एकदम बेफाम होऊं नकोस.'

ऊरसिंगः–(चपापून) आँ, मला बेफाम ह्मणणारा असा कोण?

(एक फकीर प्रवेश करितो.)

शांताः–(चकित होऊन) अहो, हा तो रम्मल शास्त्री फकीर.

ऊरसिंगः–अरे, कोणी पाहऱ्यावर नाहींत? हा आंत आला कसा?

फकीरः–मूर्खा, तुझ्या सारिख्या कृतघ्न मुलाला कैद करण्या करितां आलों. (पडद्याकडे बघून) अरे, कोण आहेत रे, शिपाई; याला कैद करा.

(कांहीं शिपाई लोक आंत येतात.)

शांताः–(रागानें) खोव्या फकिरड्या, माझ्या बावाकडचे तुकडे मोडून खाल्लेस; मला 'माझ्या बेटा, बेटा' ह्मणून ह्मणालास; आणि असा हा अवचित घाला आणिलास?

फकीरः–कुंवरजी, या स्त्रीसाठीं आई बापांला, देवाला सुद्धां सोडण्याला सजलास? (शांतेस) मुली, जो तुझ्या करितां आपल्या आईबापांनां सोडण्यास तयार झाला, तो तुजहून एखादी शानदार स्त्री मिळाली ह्मणजे तुला टाकणार नाहीं का? अशा चंचळ पुरुषाशीं तुझें कसें बनेल?

शांताः–अरे जा, निमकहरामा; तुमच्या पडदपोशींतल्या बायकांगत आह्मी बेइमानी नव्हे. एकदां ज्याला वरिलें त्याला वरिलें.

ऊरसिंगः–(मनांत) चमत्कार आहे! या फकीराचा आवाज, चेहेरा, बांधा सर्व कांहीं हुबेहुब आपल्या बाबांच्या सारखें आहे. आंत आलेले हे सर्व शिपाई आपले पिढिजाद नौकर असून याला हे वश होतात कसे? या फकीराचीं आपण ऐकिलेलीं पूर्वीचीं बोलणीं व करणीं लक्ष्यांत आणिलीं ह्मणजे संशय येतो कीं, बहुशा आपल्या बाबांनींच हा वेष केला असावा.

शांताः–( ऊरसिंगास ) महाराज, भांबावलां काय? उठा. ही तरवार घ्या.(इकडे तिकडे पाहून) अरेरे! येथें दुसरी तरवार नाहीं.

फकीरः–( ऊरसिंगास ) कुंवरजी, बऱ्याबोलानें आमच्या स्वाधीन व्हा. नाहीं तर नाहक जीव गमावाल.

( ऊरसिंग स्तब्ध बसतो. )

फकीरः–काय? बोलत नाहींस? ( शिपायांस ) अरे, याला कैद करा. ( शिपाई लोक पुढें सरसावतात. )

शांताः–( शिपायांस दर्डावून ) खबरदार पुढें याल तर!

( तरवार हातांत घेऊन गरगर फिरवीत ऊरसिंगाच्या पाठीशीं उभी राहते. )

फकीरः–मुली, त्याला सोडून दूर हो. मी तुला आपली सून करीन.

शांताः–( दांत ओंठ खाऊन ) मुसंड्या, पुन्हा बोललास तर तरवार झुगारून आधीं तुझें गर्दन छाटीन.

फकीरः–कुंवरजी, तुझ्या मुळें माझें फार नुकसान झालें. करितां तुला येथून एकाचे[1] दोन केल्यावांचून जाऊं देत नाहीं. ( शांतेस उद्देशून ) मुली, पुन्हा सांगतों, फुकट कां आपल्या आई बापांना नाहींशी होतेस?

शांताः–चांडाळा, तुमच्या सारख्यांच्या हातीं जाणें ह्मणजेच मरण आहे!

फकीरः– बरें आहे. ( शिपायांस ) अरे कमठे जोडा. जोडलेत? ऊरसिंग, बोल; शांते, एकीकडे हो. नाहीं? ( शिपायांस ) अरे उडवा तीर!

( शांता आपल्या शरीरानें ऊरसिंगाचें शरीर झांकून त्यावर पडते; व शीते[2]रहित तीर तिच्या आंगावर पडतात. )

---

१ खरा अर्थ – तुकडे केल्यावांचून, परंतु याहूनही येथें भिन्नार्थदर्शक हे शब्द आहेत असें पुढें कळेल. २ तीराच्या पुढचा पोलादी भाग.

फकीरः– शाबास मुली ! तुझ्या सारखी शूर मुलगी तूंच. माग तुला काय पाहिजे तें.

शांताः– जा तुजजवळ काय मागायचें आहे ?

फकीरः– माग, माग मुली.

शांताः– तुला देण्याची योग्यता कोठें आहे ?

फकीरः– मुली मागून पहा; ह्मणजे समजेल आहे कीं नाहीं ती.

शांताः– इतका उदार झालास तर तुला समजत नाहीं; मी काय मागेन तें ?

फकीरः–मुली, जा तुला हा राजपुत्र दिला. (ऊरसिंगास ) कुंवरजी, या सद्गुणी मुली करितां तुजवर क्षमा करितों. अरे, देवाला, आई बापांनां त्वां सोडिलें, तरी त्यांहीं महासंकट काळींही तुला सोडिलें नाहीं ! देहभानावर ये कांहीं.

ऊरसिंगः–( मनांत ) आपला तर्क खरा. हे आपले बाबाच. ( धांवत जाऊन फकीराच्या पायांवर डोकी ठेवून; उघड ) बाबा, सर्वापराधाची क्षमा असावी. मात्र मनांतील भाव व भाषा यांचा मेळ नसल्यामुळें आज मला मोठा पस्तावा झाला आहे. ( पाय घट्ट धरून बसतो. )

फकीरः–( ऊरसिंगाला पोटाशीं धरून ) मुला मी रागावल्याचें सोंग करून दाखवीत नाहीं; परंतु, मला ह्या विषयीं कांहीं एक कळविलें नाहीं; हें फार गैर केलें. ईश्वराची कृपा ह्मणून सर्व संकटांतून निभावून तुला असली सर्वपरी उत्तम बायको मिळाली, ह्मणून मला फार आनंद झाला.

( शांता फकीरास नमस्कार करून लाजून उभी राहते. )

फकीरः–( हांसून ) बाई तुला 'सून' ह्मटलें तर तरवार बिरवार झुगारशील एखादी आंगावर. असो. मुला, मुली, तुमचा यथाशास्त्र लग्नविधि आपल्या राजधानीस गेल्यावर होईल. आतां

तुह्मीं येथें उगीच तिष्ठत राहून आंगश्यानें भुई दुखवूं नका. चला-कशीं. (तीं दोघें जातात.) (सर्व लोकांस) तुह्मीही जा आणि आपल्या मलूल झालेल्या कायेचें बिछान्याशीं लग्न लावा. (शिपाई जातात; व फकीर हात जोडून आकाशाकडे) प्रभो, सच्चिदानंदा, आज या घटिकेस मानवीप्राण्याच्या इच्छेनें जें जें ह्मणून इच्छावें, त्याचा सुकाळ झाला आहे. त्याच प्रमाणें माझा शेवटही नीट होवो, एवढेंच मागणें आहे. (नमस्कार करून फकीर जातो.)

(पडदा पडतो.)

अंक तिसरा समाप्त.

# अंक चौथा.

## प्रवेश १ ला.

( मालदेव प्रवेश करितो. )

मालदेवः-( आपल्याशींच ) काय करावें ? कसा लाग साधतो ? जन्मास येऊन घटकाभर जरी मोठा अधिकार किंवा सुस्वरूप चतुर स्त्रीशीं संभोग लाधला तर धन्य ! नाहींपेक्षां मनुष्य आणि जनावर यांचा आयुष्यक्रम सारखाच. असो. हा वेडापीर बादशहा-चितूरवरची एकदां स्वारी फसली, दुसऱ्यानें फसली, तरी आपला माझ्या फुसलावणीनें तिसऱ्यानें तयार झाला आहे. आज दहा वर्षांच्या पाठीमागची पद्मिनी, आणि सांप्रतची पद्मिनी यांतलें अंतर लहान मूल सांगेल. पण कामांधांनां हा विचार कोठला ? मद्यानें गुंग झालेल्याला मद्य द्या, साधें पाणी द्या, चाहील तें द्या ; सारखें. तसेंच विषयानें भरीं भरलेल्यांचें. पादशहा ह्मणणार ' पद्मिण लाव; ' बिचाऱ्या रजियाबेगला ऊरसिंगाचेंच ससेमिरें ! ह्मणून चितूरवर जाण्याची ती उचल देणार; बरें अस्मादिकांचा विचार यांनां नादीं गुंतवून चितूरची गादी बळकवावी; आणि वर्तोळचाला पद्मिनीच्या मुखकमळांत साधलें तर भ्रमर व्हावें. काय हो, एकदां हातांत आलेल्या पद्मिनीचें चुंबन तरी घडलें असतें. भोगावी तर असलीच देवांगना भोगावी. फिरून तिनें केलेला अवमान हृदयांत सलताहे; त्याचा सूड उगविणें ह्मणजे हेंच ! पहा आतां-पंचतंत्रांतील कोल्ह्यानें सिंहाकडून सावज मारवून सर्वांच्याच तोंडाला पानें पुशिलीं, तसें करितो. यांत न्यायी मनुष्य मला दोष देणार नाहीं; कांकीं राणाभीमसिंग माझा स्वतांचा द्वेषी; आणि बादशहा माझ्या देशाचा द्वेषी. एवंच दोघेही कपटाला पात्र आहेत ! याला पाप कोण ह्मणेल तो ह्मणो !!

येत्या चंद्रग्रहणांत राणाभीमसिंग सकुटुंब श्रीसोमनाथीं पर्वणीनिमित्त जाणार, अशी बातमी आहे. तेव्हां मस्कतच्या चाच्यांकडून त्याच्या राण्या रात्रीं समुद्रस्नानाला गेल्या कीं, गुलाम करवून त्यांचा गलबतांतच लग्नविधि उरकूं. त्याचवेळीं चितूरला वेढ्यांत घालून चिंतातुर करूं. आणखी आपली जात आहे परम भाविक हरतऱ्हेचीं थोतांडें माजवून यांनां प्रथम भेडसाविलें पाहिजे; एरव्हीं हे लढाईनें कधीं हारीस जाणार नाहींत. मी आतां काय काय इलम करीन ते बोलून दाखविणें बरें नव्हे. हे वडबडचे भाट लोक उगीच त्यांचे पोंवाडे गातात. तूर्त आधीं आपलें पत्रांचें गौडबंगाल चला उठवूं.

( निघून जातो. )

## प्रवेश २ रा.

स्थळः—सोमनाथद्वीपकल्प; एक उंच गोपुर.

वेळः—चंद्रग्रहण.

( एका उच्च गोपुरावर भीमसिंग व पद्मिनी बोलत बसलीं आहेत. )

**राणाभीमसिंगः**—पहा प्रिये, कशी मजा उडाली आहे. रात्र अगदीं पूर्ण ऐनरंगांत येऊन आपल्या चंद्रपती समागमें रमण्याच्या बेतांत होती, तों हा बिलंद दरोडखोर राहु अवचित येऊन त्याचा-गळा दाबितो; गरीब बिचारी शेजारीण पृथ्वी, दचकून जागी होऊन भयानें आंतल्या आंत कुजबुजत्याहे; समुद्राच्या तोंडाला फेंस येऊन आपले मुलाला सोडविण्याकरितां जणुं कांहीं आकाशाच्या निसणीवर आपल्या लाटांच्या सैन्याला चढवीत आहे; आणि अशा धांदलींत ही भाविक भुटीं मंडळी पुण्याच्या गठड्या लांबविताहेत—

**राणीपद्मिनीः**—(हांसून) असली कसली बाई ही काहणी ? पण आमच्या बरोबर स्नानाला यायचें नाहींना ? जाऊं दे बाई मला खालीं; नाहीं तर मोठ्या बाईसाहेब भलतीच कांक्षा घेतील.

राणाभीमसिंगः—प्रिये, एकतर चंद्र संकटांत असतां आपण त्याच्या जिवावर पुण्य कमवावें, हा निखालस अप्पलपोट्येपणा नव्हेका? दुसरा विचार, मला माझ्या राण्यांचें अष्टक एकच आहे; परंतु प्रत्येकीला मी निराळाच. तेव्हां दर एकेकीच्या होतील तीन तीन बुडच्या; पण माझ्या होतील पंचवीस.

राणीपद्मिनीः—हो, प्रत्येक राणीगणीक बुडी तर माराला व्हावी; मग चोवीस होवोत किंवा पंचवीस—

राणाभीम०ः—( हांसून ) पण प्रिये, अशानें किती बरें त्रास पडेल.

राणीपद्मिनीः—( हांसून ) याचा विचार पूर्वींच करायाला पाहिजे होता. बरें पण सांगावें गड्ये, एकदांचें यायचें कीं नाहीं.

राणाभीम०ः—येण्याला मजकडून नकार नाहीं.

राणीपद्मिनीः—आणि येण्याचें चिन्ह तर दिसत नाहीं. पर्व काय पुण्यवान चाललें आहे? मीच आपली शाहणी होऊन जातें कशी. ( जाऊं लागते. )

राणाभीम०ः—( तिला कंवटाळून धरून ) आलां आपल्या पायांनीं; पण जायचें मात्र माझ्या.

राणीपद्मिनीः—ह्मणायचें मात्र नुस्तें तोंडानें.

राणाभीम०ः—( हांसून ) ह्मणतों काय? जायचें माझ्या मर्जी प्रमाणें.

( पद्मिनी राण्याचे हात एकीकडे करून जाऊं लागते. )

राणाभीम०.—आपण रागावलां ह्मणजे हें मुखकमळ या बुभुक्षित नेत्रभृंगांनां जास्तीच आल्हाद देतें. असो. प्रिये आणखी एक तोड आहे.

राणीपद्मिनीः—( तिरस्कारानें ) संगमरवरी कीं, काळवत्री?

राणाभीम०ः—( हांसून ) प्रिये, सगळ्यांनीं एकीला आपला अधिकार द्यावा; किंवा तुमचा अष्टनायिकांचा तांडाच्या तांडाच मजसवें उभा कराल तर तीन बुडच्यांनींच काम होईल.

राणीपद्मिनीः—भलत्याच कामांत अधिकार कसा चालेल ? ( आपल्याशीं ) बाई, अशीच वादविवाद करीत बसलें तर पर्व जाईल सरून. ( राण्यास अनुलक्षून ) कांहीं झालें तरी आतां यायलाच पाहिजे. मग इतकी दूरवर स्वारी तरी कां केली ?

राणाभीमसिंगः—आतां खरें इंगित सांगूं यांतलें ?

राणीपद्मिनीः—आँ ? सांगितलेलें खोटेंच सारें ? आपली स्वारी आहे, आणि कावेबाजपणा आहे.

राणाभीम०ः—पद्मिनी, भास्कराचार्य नामें प्रति बृहस्पति, ज्योतिषशास्त्राचा महान् तत्ववेत्ता, विद्वान् होऊन गेला. त्याच्या शिष्यपरंपरेंतला चूडामणि नामक, केवळ भास्कराचार्यांचा अवतारच, असें अद्वितीय विद्वज्जनरत्न आजच संध्याकाळीं येथें आलें. 'भास्कराचार्यांनीं चंद्राच्यागतीचा प्रथम वेध घेतल्यापासून आजकालपर्यंत त्यांत कांहीं चलन झाल्याचें वाटल्यावरून आज ग्रहणाच्या वेळीं पुन्हा मी तो घेणार आहें; आणखी मलद्वीप[1] व लक्षद्वीप[2] यांचे दर्म्यान एक धूमकेतु[3] उगवूं लागला आहे, त्याचे कक्षेचाही[4] अंतपार काढणें आहे; तरी राजा, तुझी इच्छा हे चमत्कार पाहण्याची असल्यास तुझें ग्रहणप्रीत्यर्थ तांत्रिक जपजाप्य उरकून मला कळीव; ह्मणजे मी येऊन तो तुला दाखवीन ' असा त्यांनीं मला निरोप पाठविला आहे.

राणीपद्मिनीः—( भय चकित होऊन ) कायबाई, ग्रहण पडलें तर पडलें; आणखी शेंडें नक्षत्रही उगवूं लागलें ?

राणाभीम०ः—आपल्याला भिण्याचें कारण नाहीं. तें शंभर योजनांहूनही दूर आहे. असो. असली उत्तम संधी आलेली दवडितां नये. ही स्वयमेव गंगाच आळशावर धांवून आली, ति-

---

१,२ मालदीव आणि लकदिव बेटें. ३ शेंडेनक्षत्र. हें उगवूं लागलें कीं, पृथ्वीवर कांहीं अनिष्ट कोसळणार असा भाविक लोकांचा समज होता व आहे. ४ ग्रहांचा गमनमार्ग.

चा आव्हेर कसा करूं? धन मिळेल, राज्य मिळेल, ( हांसून ) प्रिये, तुझ्या सारखी अप्सराही कचित् मिळेल; परंतु यांहूनही अशा विद्वानाची संगति फार दुर्मिळ. आह्मी राजे लोक मूर्ख ह्मणून विद्वानांची हेळसांड करितों!

राणीपद्मिनीः—पण अशा विद्वानाला ग्रहणांत अनुष्ठान, गायत्रीपुरश्चरण, वगैरे नाहीं करावयाचें?

राणाभीम०:—पद्मिनी, या विश्वांत सृष्टिकर्त्यानें असे जे अद्भुत चमत्कार निर्माण केले आहेत; त्यांचें तथ्य ज्ञान स्वयें करून घेणें, व तें इतरांस करून देणें, याहून विशेष अनुष्ठान तें काय? आणि विद्या, कलाकौशल्यें, व्यापार यांनां राजानें उत्तेजन देणें हें त्याच्या कर्तव्य कर्मांपैकींच होय.

राणीपद्मिनीः—( स्मरल्यासारखें करून ) हो, हो; मलाही त्यांनां परवांच्या रात्रींच्या चमत्काराविषयीं पुसणें आहे. परवां प्रहररात्रीच्या सुमारास उष्मा भासूं लागला ह्मणून येथें आल्यें. तों दक्षिणेकडे समुद्राचे अंगास प्रथम एक दिवा दिसला; नंतर दुसरा; पुढें तिसरा—चौथा—पांचवा;अशी लांबच्यालांब माळिका लागली, अम्मळशानें दिव्यांच्या हारी दिसूं लागल्या; त्यांतले कांहीं दिवे मधेंच विझत; ते लागतात तों पुढचे विझत; मागचे विझत; कांहीं वेळ दिवे सैरावैरा नाचत; पुन्हा हारी बनत; एखादे वेळेस एक दोन तुरळक तुरळक उजेड शिवाय करून सर्वेच विझत; मात्क्यान् सर्व एकदम भक् करीत! या प्रमाणें एक घटका चाललें होतें. नंतर ते दिवे एका मागून एक सर्व समुद्रांत गेलेसे दिसले. तेव्हां हें काय? परवां शनवार चतुर्दशी ह्मणून डोक्यांवर भर्दी घेऊन रात्रीं स्मशानांत शाकिनी डांकिनी तर नाचत नसतील ना! आपल्याला हें कळवणार होतें.

राणाभीम०:—हो, मलाही त्यांनां हें कोडें पुसावयाचें आहेच.

राणीपद्मिनीः—एकूण, स्नानाला येणें होत नाहीं तर आपलें?

राणाभीम०:–आतां आपणच याचा निर्णय करा.

राणीपद्मिनी:–( हांसून ) मीच एकटी जातें हा निर्णय. ( जाऊं लागते. )

राणाभीम०:–(हांसून) यावें लवकर. नाहींतर त्या पंडितानें आपलें वदन पाहिलें तर भ्रमांत पडेल कीं, इतक्यांतच ग्रहण सुटलें कसें ? ( ती जाते. ) ( राणा आपल्याशींच ) गेली. अहाहा ! सुंदर, सुशिल, आणि चतुर स्त्री खरोखरी मृत्युलोकाला इंद्रभुवन करिते. पतीला अशा पत्नीचे योगें खरें पतित्व येतें. अरे, पण अद्यापि चूडामणी कां येत नाहीं ? (दूर समुद्राकडे पाहून ) अँ ! कालच्या ठिकाणीं आजही दिवे दिसूं लागले. ( आणखीं पाहून ) आणि पुन्हा कालच्यापरीस आज जास्तच ! येवढ्यांत तो विद्वान येता तर याचा कांहीं तरी तर्क काढिता.

( पडद्यापलीकडे शिंग वाजतें ) ‘ तुतुतुतु ’–

राणाभीमसिंगः–( साश्चर्य ) आँ ? ही सूचना कशाची? बरें हे आमचे स्वारलोक कोठें लगबगीनें वाहूं लागले ?

( इतक्यांत एक हुजऱ्या घाबऱ्या घाबऱ्या येतो. )

हुजऱ्याः– सरकार , धांवाधांवा; अरब व सिद्दी यांच्यांनीं तीन दिशांनीं गलबतांतून उतरून आपल्या जनानखान्याला धरून नेत आहेत ! त्या पहा त्यांनीं शेंकडों मशाली, चंद्रजोती पाजळिल्या आहेत. इकडे चौथ्या अंगाला तटबंदीवर शत्रूचा भडिमार सुरू झालाच आहे. उजेडाकरितां तीन चार घरें त्यांणीं पेटवून दिलीं !!

राणाभीमसिंगः–अल्लल्ल् ! जिकडे तिकडे उजेडच उजेड. अरे, लौकर माझा खांडा, चिलखत, शिरस्त्राण आणा. हा इकडे ठाकुरलोक जमण्याचा नगारा झाला.

( दोघे निघून जातात )

पडदा पडतो.

ग्रंथ संग्रहालय ... ठाणे.

## प्रवेश तिसरा.

स्थळः-चितूरशहरांतील राजवाडा. वेळ:-रात्र.

( सुशीला आपल्या रंगमहालांत बसली आहे. जवळ मुलगा निजला आहे. )

सुशीलाः-( आपल्याशींच ) बाई, आज अजून स्वारी कां येत नाहीं ? बरें, दासी तिकडचा समाचार काढण्यासाठीं गेली तिचापण ठिकाण नाहीं. आणि जों जों अवकाश होत आहे तों तों माझी चिंता दुणावत चालली आहे. सौख्य येत येत आलेलें गोड; परंतु दुःख एकदम आलेलें बरें. कोठून मेला तो दैवज्ञ[1] आला ? आणि काय मेल्यानें माझ्या लेंकराविषयीं त्यांच्या प्रेमळ-मनांत अशुभ भरविलेंन् कोण जाणें ? नाहीं तर कितीही काम असलें तरी साऱ्या दिवसांत कांहीं तरी निमित्त करून दोनदां तीनदां येणें हें आपलें व्हायचेंच; निदान ओझरती नजर तरी करून जायचें. पण आज अगदीं रामशिवा गोविंदा ! मींच होऊन तिसऱ्या प्रहरीं मुलाला घेऊन नजर बागेंतल्या बसण्याच्या बंगल्यावरून जगदंबेच्या दर्शनाला स्वारी नेली. पण माझ्या मेण्याकडे बगतो कोण ? एकदां नजर चुकून आली; तों डोळे अगदीं लाल झालेले-मुद्रा क्रूर-तोंडावर उदासपणाची कळा आलेली-काय बाई, शुद्ध नरसिंहाचा अवतार दिसत होता ! ही रात्र मोठी भयंकर वाटते. बाई रात्री, दुखणें, चोर, जार, अविचार, रानटश्वापदें हीं तुझ्या अमलांत फार बळावतात. आतां काय करशील तें खरें. ( एकाएकीं दचकून ) पण हे जिन्यांत पाय कोणाचे वाजतात ? बहुधा खाशास्वारीचेंच ! ( मुलाला उचलून ) बाळा, आतां तुझें कर्म काय ओढवतें नकळे. ईश्वराची कृपा तुला काय राखील ती राखील. ( त्याचे मुके घेऊन त्याला हळूच पालखांत[2] निजविते. )

( ऊरसिंग प्रवेश करितो; व सुशीला त्याला चार पावलें सामोरी जाते. )

---

१ ज्योतिषी. २ मोठा बैठा पाळणा.

ऊरसिंगः– ( कठोरवाणीनें ) सुशीले, तुला माझे जिवाची आस्था आहे कीं नाहीं?

सुशीलाः–( हांसून ) हें काय बाई विचारणें?

ऊरसिंगः–ही हांसण्याची वेळ नव्हे. तुला माझे जिवाची, आपले सर्व कुटुंबाची, आस्था आहे कीं नाहीं?

सुशीलाः–बाई, नुस्तें तोंडानें कोरडें 'होय' ह्मणायचें मला फार वाईट वाटतें.

ऊरसिंगः–तर मग, सगळ्या कुटुंबाखातर, सगळ्या राष्ट्राखातर, तूं आपला, किंवा माझा, किंवा दुसऱ्या इतर कोणाचा जीव गेला असतां फारशी खंत करणार नाहींस?

सुशीलाः–(मनांत) ज्या दत्ताला भीत होतें तेंच पुढें येणार.

ऊरसिंगः–कां? मौन कां धरिलें? असें करणें न्याय्य आहे. कुळाकरितां एक सोडावा; ग्रामाकरितां कुळ सांडावें; देशाकरितां एक ग्राम सोडावा.

सुशीलाः–(मनांत) आतां धैर्यच धरिलें पाहिजे.(उघड)होय. तसें करून सर्वांवरचा अपाय टळत असला तर तें अवश्य करावें.

ऊरसिंगः– ( तिला एक पत्र अर्धपडें दाखवून. ) बरें, हा शिक्का कोणाचा?

सुशीलाः–( पाहून ) मामाजींचा.

ऊरसिंगः–( पत्र हातांत देऊन ) तर मग हें आज्ञापत्र पहा.

सुशीलाः–( पत्र पाहून मनांत ) देवा, घात झाला! ( उघड ) मग ना कोणाची? पण या अज्ञान बाळाचा असा काय अपराध, कीं त्याला त्याच्या आजोबांनीं अरण्यांत सोडण्याविषयीं एकदम हुकूम करावा?

ऊरसिंगः–वेड्ये स्त्रिये, अपराध नाहीं ह्मणूनच त्याला शस्त्रघात नाहीं! ग्रह आपल्या गतीनें फिरत असतां अनिष्ट येतात; मुद्दाम येत नाहींत; मग त्यांचीं दानें कां करावीं? श्रावण-

मांसांत दिवसास घोडी प्रसूत झाली तर ती कां देऊन टाकि-तात ? यांत तिचा तो अपराध काय ? सारांश, आपल्याला जें जें अनिष्टकारक त्याचें विसर्जन करून टाकावयाचें. आज या पायगुणी मुलाच्या योगानें राज्यांत काय काय अनर्थ चालले आहेत ! आमच्या हाडवैऱ्यानें बाबांना सोमनाथीं कोंडून ठेविलें आहे; राजपुत्र अजितसिंग व कांहीं सरदार मजवर कां अतिशय बिथरले आहेत न कळे; देशांत अवर्षण आणि सैन्यांत पुराणां-तरीं ऐकिलेली महामारी यांणीं कहर उडविला आहे; प्रत्यहीं नवीं नवीं दुश्चिन्हें होत आहेत तीं तुला ठाऊक आहेतच. त्या पक्षीं असला हा पांढरे पायांचा पोरच गेलेला बरा !

**सुशीला**:–( डोळ्यांस पाणी आणून ) महाराज, मी अबला काय बोलूं ? परंतु हें पायगुणी मूल निमालें, ह्मणून त्याजबरोबर होणारा परिणामही बंद झाला ? घरावरील 'घू घू' करणारें घुबड मारिलें ह्मणजे भावि अनर्थ टळेल ? सरकार, दुर्वार्ता सांगणाऱ्या शत्रूच्या दूताला ठार केलें तरी शत्रूचा हल्ला चुकावयाचा नाहीं. दुश्चिन्हें संकट सुचवितात मात्र; बाकी, त्यांजकडे काय आहे ? उलटें–

**ऊरसिंग**:–स्त्रिये बस्स. मी येथें तत्वज्ञान ऐकण्याला आलों नाहीं. विघ्न करणाऱ्याला विघ्न केलें पाहिजे ! आणि बाबा असें भलतें करण्याला निराधार कां सांगतील ? कालच येथें एक फल-ज्योतिषी आला. त्याला, या गोष्टीचा पडताळा पाहण्या करितां हा मुलगा कोण, कोणाचा, वगैरे न कळवितां दाखविला. तेव्हां त्याणेंही सांगितलें कीं, ' या मुलाचीं आईबापें, गणगोत, या-च्या पांचव्या वर्षीं विलयाला जातील; याच्या वाडवडिलांचें पद शत्रु हिरावून घेतील; याला पुष्कळ गंडांतरें आहेत; त्यांतून

---

१ माघे बुधेच महिषी ॥ श्रावणे वडवादिवा ॥
सिंहेगावःप्रसूयन्ते ॥ स्वामिनो मरणं ध्रुवम् ॥

२ हा रोग या देशांत पर्वी फारसा नव्हता.

वांचला तर मात्र आपल्या वंशाचें गेलेलें स्थान परत संपादील.' तेव्हां पुढें ?

सुशीलाः—( हात जोडून ) ज्या अर्थी मामाजींची अशी आज्ञा आहे, आणि ज्या अर्थी फलज्योतिषाचेंही असेंच मत आहे, त्या अर्थी आतां बोलणें उरलेंच नाहीं. इतकेंच मात्र कीं, स्मशानांतील काळेश्वराचे देवालयांत मध्यरात्रीं भयंकर सिंहनाद होतो तो याला रानांत सोडिल्यानें बंद होईल का ? भालू, दिवाभीतें दिवसास शहरा भोंवतीं ओरडतात, तीं याचें मांस खाऊन उगीच बसतील ? बरें हें रानांत सोडिलेलें मूल कदाचित् आपल्या शत्रूनें नेऊन वाढविलें तर तेंच पुढें आपल्या नाशाला कां कारण होणार नाहीं? ( स्मरल्यासारिखें करून ) हो, हे सर्व अनर्थ, दोष—माझ्या मुलाच्या माथीं बांधिले, मग याच्या सर्व आज्यां शिद्यांनीं कैद केल्या असतां त्यांची सुटका झाली, ही गोष्ट जमेस कां धरिली नाहीं ? माझें या पायांनां दुसरें कांहीं मागणें नाहीं. पण आपणच मला वारंवार सांगत असतात 'पूर्ण विचार केल्यावांचून कोणतेंही काम करूं नये. पुष्कळ मनुष्यें मागून पस्ताव्यांत पडतात.' करितां याचा वेळींच विचार व्हावा. ( त्याच्या पायां पडते. )

( ऊरसिंग चकित उभा राहतो. )

सुशीलाः—आपले गुरुजी सांगतात 'राजानें वैद्य, ज्योतिषी, न्हावी, आचारी यांजवर अतिशय विश्वास ठेवूं नये; आणि भानगडीच्या प्रसंगीं तर नाहींच.' ज्योतिषी कितीही उत्तम गुणी असला तरी द्रव्याला वश होऊन भलतेंच भाकित सांगणार नाहीं असा नेम आहे का ? आपण मुलांचें नांव गांव सांगितलें नाहीं तरी तर्कज्ञांनां तें तेव्हांच ताडितां येतें. आणि हें पत्र घेऊन येणारा जासूद त्या वेढ्यांतून आधीं सुटला कसा ? आणखीं, मामाजींनीं आपल्या सुटकेचा हाच उत्तम उपाय योजि-

ला काय ? हा मरून तो वेढा उठत असला तर हा मुलगा आणून देतें. ( जरा थांबून ) हा जासूद बाहेरून जरी आपला असला तरी आंतून खचीत शत्रूच्या थैलीचा गुलाम आहे. मला याची व या पत्राची अतिशय शंका येते.

ऊरसिंगः–( मनांत ) हिची शंका कांहींअंशीं खरी आहे. ( उघड ) अगे, जासूद एक खोटा ठरला, पण त्या ज्योतिषाचें काय ? तो सांगतो तेते सर्व ताळे पटतात; आणखीं तो स्वतां फार भोळा आहे.

सुशीलाः–आपला क्षय होणें असल्यास मुलाचा क्षय होऊनही तो राहणार नाहीं; आमचा कुळक्षय नेमला असल्यास मुलगा जीवंत राहून कुळक्षय होत नाहीं; ' वांचला तर पितरांचें पद परत घेईल ' असें तोच ह्मणतो. बरें, ' हिला कुलदीपक पुत्र होईल ' असा श्रीज्ञानराज महाराजांनीं मला आशीर्वाद दिलेला आपल्याला ठाऊक आहे; या करितां हें कुसंतान नव्हे.

ऊरसिंगः–पण तोच हा मुलगासा कशावरून ? ( हांसून ) आणखी तुला पुत्र नाहीं होणार ?

सुशीलाः–' या मुलाचे पांचवे वर्षी आईबाप गमावतील. ' असें जर त्या वाद्याचें भाकित आहे, तर तो कुलदीपक हाच असला पाहिजे याला आज पांचवें वर्ष आहे.

ऊरसिंगः–शाबास प्रिये, खूप शान सिद्धांत केलास. मोठे मोठे ब्रह्मसिद्धांती, सूर्यसिद्धांती, यांमध्येंच तुझी गगना केली पाहिजे.

सुशीलाः–( मनांत ) 'स्त्रिये,' 'स्त्रिये,' जाऊन 'प्रिये' आलें. आतां चिंता नाहीं. ( उघड ) महाराज, याउपरही आपली मर्जी

१ ह्याच हमीरसिंग पुत्रानें चितूरची गादी पुनः मिळविली. हा मोठा पराक्रमी होता. याणें बारावे वर्षीं चुलत्याच्या एका शत्रूचें डोकें लढाईत तोडून आपल्या खोगिराला बांधून आणून चुलत्यास नजर केलें! २ भविष्य वाद्याचें.

तशीच असेल तर ही आपली तरवार–हा माझा मुलगा (झटकर मुलगा उचलून पुढें आणिते )–आणि ही त्याच्या मानेवर माझी मान. ( मुलाच्या मानेवर आपली मान ठेविते. ) परंतु परमेश्वरा, विनाकारण, अविचारानें मुलाचें क्रियाकर्मांतर करणें बापाच्या दैवीं नको ! ( आसवें ढाळीत ) हर, हर ! बाळा, या निरपराधी मरणापरीस तुला जगदंबेच्या बगडावर तरी घातलें असतें. हें माझें पापी कलेवर प्रयागीं अरकेशीं[1] तरी पडलें असतें–किंवा, बाबानें मला लहानपणींच नाहींसें केलें असतें–ह्मणजे हें दुःख पाहणें नको होतें. नको ग मेलें असलें तरवारीच्या धारेवरचें राज्यपद. यापेक्षां एखाद्या नांगऱ्याचें झोंपडें पुरवलें !

**ऊरसिंगः**–पुरे पुरे प्रिये. ( मुलगा गलबलून जागा होतो त्यास उचलून घेऊन आसवें ढाळूं लागतो. ) प्रिये, सुशीले, क्षमा कर मी तुमचा अन्यायी आहें. आतां मला वाटतें कीं, हें कोण्या धूर्त शत्रूचें कपट आहे. अविचाराला वश होऊन अघोरकर्म आचरीत होतों. ( सुशीलेचे डोळे आपल्या पदरानें पुसून ) प्रिये धन्य त्या महासाधूच्या आशीर्वादाची ! आणि धन्य तुझ्या बुद्धीची ! नाहीं तर आज मोठाच घात झाला असता.

( इतक्यांत एक हुजऱ्या घाबऱ्या घाबऱ्या वर येतो. )

**हुजऱ्याः**–सरकार, राजपुत्र अजितसिंगाच्या[3] वाड्यासमोर जबर रण माजलें आहे. राजपुत्र उमरों[4] याला मोठ्या महाराजांचें शिक्कामोर्तबाचें एक गुप्त पत्र आलें कीं, ' पत्रदर्शनीं अजितसिंगाची लागेल ती वाट लावावी. तो फितुर होऊन आपल्या सर्वांच्या जिवावर उठला आहे !–

---

१ प्रयागीं सुयोगावर अरकसानें चिरून घेतलें ह्मणजे प्राणी मुक्त होतो. असा समज होता. हल्लीं हें सरकारानें बंद केलें आहे. २ मुलगी झाली कीं मारून टाकावयाची अगर बळी द्यावयाची अशी राजपुतांची चाल असे. ३ भीमसिंगाचा दुसरा मुलगा. ४ भीमसिंगाचा एकपुत्र.

ऊरसिंगः–अरे बाबा, झटकर जाऊन राजपुत्र उमरा याला माझी आण घाल; आणि लढाई तहकूब ठेवीव. जा भरकन्. (हुजऱ्या जातो ) प्रिये खचीत खचीत कोणी तरी धूर्तानें हें कमालीचें कावित्र केलें आहे. मुलाला टाकण्याविषयीं मला पत्र; माझ्या विषयीं अजितसिंगाच्या मनांत वैरभावाची भरवणी; त्याच्या विषयीं राजपुत्र उमरा याला हुकूम–कांहीं बुवा इंगित कळत नाहीं यांतलें. कोणाच्या मनांतून आमची यादवी व्हावी असें दिसतें. असो. मी तर येतों आतां; पण इकडील बंदोबस्त मात्र नीट ठेवा.

( ऊरसिंग जातो व पडदा पडतो. )

## प्रवेश चौथा.

स्थळः–चितूरचा राजवाडा. वेळः–रात्र.

( **राणाभीमसिंग** व इतर सरदारलोक विचारांत आहेत. )

**राणाभीम०**:–बादलजी, जमले सर्व मानकरी ? ( इकडे तिकडे पाहून ) अहो, माझा बाळपणचा मित्र–माझ्या राज्याचा खांब–स्वामिभक्तीची साक्षात् मूर्ति–माझा संग्रामसिंग; ( डोळ्यांस पाणी काढितो ) आणि आतां कीर्तिशेष– यांचा पुत्र कोठें दिसत नाहीं ?

( संग्रामसिंगाचा पुत्र **जसवंतसिंग** प्रवेश करितो. )

**राणाभीम०**:–या, जसवंतसिंगजी; या. ( उठून आपल्या हातानें त्यास उजव्या हातास जवळ बसवितो. ) बसा.

**जसवंतसिंग**:–सरकार, आपण मला उजव्या बाजूस बसविलें; काल मला महाराजांनीं स्वहस्तानें विडा दिला; हा बहुमान माझ्या बाबाला पाहिजे होता. त्यानें पराक्रम करून, मी पहिल्या प्रतीचा उमराव झालों, याची मनाला फार खंती वाटते.

**राणाभीम०**:– ( साश्रु ) बाळा, कोणतीही देहेनगी अथवा कोणताही अधिकार त्याला देणें, ह्मणजे त्याच्या अनुपम योग्यतेचें मोल करण्यासारिखें होतें ! बाबा, सोमनाथच्या वेढ्यांत

तो पडला नाहीं, तर माझा उजवा हातच गेला. आणि या करितांच तुझ्या बरोबर म्यां त्याला तीळपाणी दिलें. त्या वेढ्यांतून त्यानें माझी सुटका करावी, आणि त्याजवर संपूर्ण राज्यकारभार सोंपवून मी शांतपणानें सुखोपभोग घ्यावा, असें माझ्या कपाळीं कोठलें ?

**जसवंतसिंग**:—असो. सरकार,आजरात्रीं मंडळी कां जमविली?

**राणाभीमसिंग**:—बाबारे, सांगतों. सर्व सरदारहो, ऐका. ही लढाई सुरू झाल्या तागाइत आज एक आठवड्यांत नीज माझ्या पासून पळाली होती. गेल्या रात्रीं मात्र आंग टाकीटाकी तों नीज आली. तों मध्यरात्रीच्या सुमारास अवचित् दचकून जागा झालों. मग पुनः झोंप लागेना. नाना प्रकारचे विचार मनांत चालले आहेत; दिवा मंदमंद तेवत आहे; चोहींकडे अगदीं इतकें सामसूम झालें होतें कीं, नजर बागेंतील झाडाचें खालीं पडलेलें पान सुद्धां टपकन् ऐकूं येई; राणी कधीं घोरत नाहीं—परंतु काल बिचारी दुःखनिद्रेंत जी घोरूं लागली, तो आवाज दूर वाघ डुरकतो आहे, असा कठोर भासूं लागला; राळीचें किरें चाललें आहे; महालांत पाकोळी कशी आली नकळे ? ती मधून मधून लफ्लफ् करीत उडत आहे; सारीं मनुष्यें गाढ झोपेंत आहेत—मी तोंडावर विरविरीत शेल्याचा पदर घेऊन पडलों होतों—तों 'राजा, क्षुधित रे, क्षुधित; राजा, क्षुधित आहें रे ! भूक-भूक-भूक ! !' असा घसा ओढलेला शब्द ऐकून प्रावरण दूर केलें. तंव या समोरच्या दोन खांबांमध्यें एक विशाळ, तेजःपुंज अशी धिप्पाड स्त्री-तांबडीं वस्त्रें नेसलेली, ताम्रपुष्पांच्या माळा ल्यालेली, लाल मळवट भरलें आहे; पोटाला बखळ पडली आहे—अशी तिला पाहून माझ्या तर डोळ्यांपुढें चक्र झालें ! चिपडीनें डोळे उघडून पाहतों, तों ती उभीच समोर. धीर करून शस्त्र तिजवर फेंक-

---

१ बायकांचें घोरणें अशुभकारक मानितात व मानीत.

णार होतों; इतक्यांत ती ओरडून ह्मणाली– ' राजा, मी ग्रामदेवता आहें, पिशाच नव्हे. मला नरपशु बळी पाहिजेत. ' मी ओरडून ह्मणालों, ' काय ? देवी, माझे आठ हजार सोयरे धायरे बळी पडूनही तुझी तृप्ति नाहीं झाली अजून ? ' ती बोलली ' रे इतर काय कामाचे ? मला राजे बळी पाहिजेत. नाहींपेक्षां मी जाईन' ! असें ह्मणून पाहतां पाहतां ती जेथल्या तेथेंच अदृश्य झाली ! !

( सर्व एकमेकांकडे चकित पाहतात. )

**जसवंतसिंगः**–सरकार, कदाचित् हें सर्वच स्वप्न असेल.

**ऊरसिंगः**–किंवा, एखाद्या देवतेचा मानपान चुकून तिनें हा आपल्याला स्वप्नांत दृष्टांत दिला असेल.

**राणाभी०ः**–मलाही प्रथम स्वप्नच वाटून दिव्यावर बोट धरून पाहिलें; भाजलें. ती शेषशाईची तसबीर पलंगाजवळ आणून ठेविलेली अद्याप तेथेंच आहे.

**जसवंतसिंगः**– महाराज, हें सारें करणें स्वप्नांत.

**राणाभीमसिंगः**–( मनांत ) कसलेले पोक्त लढाऊ शिपाई जाऊन अशा अज्ञ मुलांशीं प्रसंग पडला आहे. भगवदिच्छा ! ( उघड, हांसून ) अरे, सारें स्वप्नांत? बरें मी त्याजविषयीं रोजनाम्यांत मुद्दां लिहिलें आहे तें ?

**जसवंतसिंगः**–तें पण स्वप्नांतच! माझा आईकडूनचा पणजा झोंपेंत उठून आंघोळ करून पूजा करी; आणि दुसऱ्या दिवशीं ताजी पूजा बघून त्याला मोठा विस्मय वाटे!!

**बादलः**– ( हांसून ) असेल बुवा. ( जरा थांबून ) किंवा मागें जशीं खोटे शिक्यांचीं पत्रें आलीं, त्यांगत तर हें कृत्रिम नसेल ना ?

**राणाभीम०ः**– समजत नाहीं. तरी पण या जागेवर तसें करणें अशक्य आहे.

( आकाशांत शब्द होतो. )

'राजा, कृत्रिम, भूत-प्रेत-पिशाच, मंत्र, तंत्र, इंद्रजाळ, यांची शंका सोड. हा स्वप्न नव्हे; दृष्टांत नव्हे; सत्य मिथ्या काय तें समक्ष अवलोका सारे.'

( सर्व वर पाहतात, व देवी अधांतरीं पुन्हा दृष्टीस पडते .)

**देवीः**— राजा, पुन्हा सांगतें. या वुभुक्षित आत्म्याला राजपिंडांचे बारा कवेळ अर्पण करशील, तर मात्र ही तीव्र क्षुधा शांत होईल! प्रत्येक राजपुत्राला राज्याभिषेक करावा; त्याला मुकुट, छत्र चामरादि राजचिन्हें लेववावीं; त्याणें तीन दिवस राज्य करून चौथे दिवशीं बळी पडावें; असे एका मागून एक बारा राजे बळी पडतील तर ठीक. नाहीं तर तुझ्या कुळांतून निरंतर नष्ट होईन! भूक भूक भूक!! ( देवी अंतर्धान पावते. )

( सर्व चकित होऊन बसतात. )

**बादलः**—( खेद युक्त स्वरानें ) हाय, हाय, काय गति ?

**ऊरसिंगः**—( त्वेषानें, उठून ) मामा, अशी आपली आज दीनवाणी कां ? देश जाऊन आह्मी उरलों,तर मेलोंच;पण आह्मीं मरून देश उरला, तर जगलों. मग कायचिंता आहे ? पहिला बळी मी !

**अजितसिंग व उमराः**—( ओरडून ) नाहीं, मी.मी.

**राणाभीमसिंगः**—बाबानों, तूर्त हें असो. आपण विश्रांतीला जावें, अशी माझी सर्वांना विनंति आहे.

**सर्वः**—जसा सरकारचा हुकूम.

( सर्व निघून जातात व पडदा पडतो. )

## प्रवेश पांचवा.

### स्थळः—चितूर राजवाडा.

( ज्ञानराजमहाराज व राणाभीमसिंग, गुप्त विचार करीत बसलेआहेत )

**राणाभीमसिंगः**—गुरुराज आतां काय करूं, माझ्या प्रजे-

१ घांस.

ची दशा दशा उडाली आहे; सोयरे धायरे हजारों चूर झाले-होत आहेत; कांहीं चिलींपिलीं उरलीं आहेत, तीं ग्रामदेवता खाऊं पाहते! आसपासचे कोण्या राजाचें साह्य मागेन तर कोणी शत्रूला वश झाले आहेत-कोणी दुर्बल आहेत- आज मी शाखा छेदलेल्या वृक्षाप्रमाणें, पंख तोडलेल्या पक्ष्याप्रमाणें, जीवंत असून मेलेला असा उरलों आहें!

ज्ञानराजः-राजा, कालचक्राच्या फेऱ्यांत खालचा वर आणि वरचा खालीं होणें साहाजिक आहे; आणि अशा स्थितींत दुःख होणेंही साहजिकच आहे. परंतु तुला इतकेंच सांगतों, आपल्या स्वतांला ओळख. आपला वंश कोण? आपला कुलाचार कसा? झालें तें झालें; पुढें कर्तव्य काय? हें पाहून कसें वागणें तें वाग. दुखः, शोक, मोह, यांणीं कोण्या मर्त्याला सोडिलें आहे बरें? अथापि वशी¹ जे आहेत ते अघमर्षणानें जसा शरीर मल झाडितात, तसेंच विवेकमज्जनानें मन निर्मळ करितात. असे जे कोणी असतील तेच महात्मे; तेच पराक्रमी; तेच स्थिरधी. अरे, मोठ्या कुलांत उत्पन्न जाहला ह्मणजे मोटा होतो? राया, क्षत्रिय बीज असला तरी शूर क्रियेविना त्याला क्षत्रिय कोण गणील? एवंच आपल्या स्वतांला जो इतका विसरला आहेस तो जाण मात्र; मग ही तुझी दीनवाणी कोठें आहे ती पाहूं.

(राजा अंग थरारवितो.)

ज्ञानराजः-राजा, तुझा कुलगुरु सूर्य, नित्यशः सहस्त्रावधि अभ्रपटळांहीं आच्छादित होऊन पुन्हा त्यांचा भंग करितो. शिबि, श्रियाळ, रघुराय, हे ज्याचे पूर्वज त्याला क्षुद्र मोह लोभांनीं पराजित करावा? बायकांगत रडवावें? अरे, स्थैर्य लक्षण काय?

**॥ ²वोहुटळीचेनि बळें॥पृथ्वी जैसी न ढळे॥ तैसा उपद्रवें मेळें॥ नलोटे जो॥ १॥ दैन्य दुःखीं न तापे॥ भय शोकीं न कांपे॥ देहमृत्यु नवासिपे॥ पातलेनी॥ २॥**

---

१ आत्मसंयमी २ ज्ञानेश्वरी अध्याय तेरावा.

बाबारे, सुखासुखी मोठेपणा मिळत नाहीं. 'आधीं टाक्याचे घाव मग देवकळा.' ह्मणतोस कीं, मागें सारीं पोरेंटोरें उरलीं आहेत; आणि तूंच जर असें अवसान गाळिलें तर ते काय करितील रे? गिलच्याला अशी बातमी लागूंदे मात्र. उद्यां तुह्मांला बायकामुलां सकट गुलाम करून नेतील. ती दशा बरीक तुला अत्यंत दुःसह होईल. श्रीमद्भगवद्गीतेंत सांगितलेलें आठव

'॥ संभावितस्य चाकीर्तिर्मरणादतिरिच्यते ॥'[1]

राणाभीमसिंगः-( उठून ) काय गुरुराज, या माझ्या जीवंत डोळ्यांदेखत आमच्या बायकामुलांची अशी दशा होईल?

ज्ञानराजः-बाबा, व्हावी ह्मणून कोण इच्छितो? पण असा देहभानावर ये. सर्प आपलें सर्पपण सोडील तर त्याला कोणीही पायानें लथडील. अरे, सिंह व्याघ्र कधीं मृत्युला भीत नाहींत ह्मणूनच त्यांच्या वाटेला कोणी जात नाहींत. प्राणी जेव्हां जन्मास येतो, तेव्हांच त्याचें नाळरूपी मृत्यूचें प्रस्थान ठेवित असतात. मग तशांत तुह्मी क्षत्रिय; तुमचें शिर तुमच्या हातावर. राजा, भरवैभवांत मृत्यु येणें उत्तम; भरवैभवांत, तशांत शूरत्वानें लढून मरण येणें त्याहून उत्तम; भरवैभवांत, शूरत्वानें, स्वराजाकरितां, मरणें फार उत्तम; आणि भरवैभवांत, शूरत्वानें, स्वराजाकरितां, स्वदेशाकरितां, मृत्यु आलेला उत्तमोत्तम. असें असून जे वीर शौर्यानें लढले-गेले- स्वर्गस्थ झाले, त्यांजकरितां रडत बसतोस; पुढील योद्ध्यांची काळजी वाहतोस; आणि बापुडवाणा होतोस. हें तुजसारिख्या सुक्षत्रिय महायोध्याला शोभत नाहीं; नुस्त्या क्षत्रियालाही शोभत नाहीं; फार काय, अरे, क्षत्रिय ज्ञातीच्या स्त्रीलाही योग्य नाहीं!

राणाभीमसिंगः-( वीरश्री चढून ) महाराज, मला मरण मुळींच भिववीत नाहीं. मात्र ही माया रडविते. बेहेत्तर माझे बारा पुत्र व मीं बळी पडून माझ्या प्रजेचा बचाव झाला असता तर. परंतु तितक्यानेंही निभाव दिसत नाहीं.

---

[1] गीता अध्याय २ श्लोक ३४. उत्तरार्ध.

ज्ञानराजः—राजा, सांप्रत पैशाची अथवा मनुष्याची या दोन्ही शक्ति तुझ्या क्षीण झाल्या आहेत, शत्रु तह करणार नाहीं; फिरून तो विश्वासघातकी, छांदिष्ट राजा; तुझी स्त्री व श्री यांजवर त्याची नजर; कोठून साह्य येण्याची आशा नाहीं; आणखी ग्रामदेवीही बुभुक्षित आहे ह्मणतोस—बाकी, मला तिजविषयीं खरें खोटें कांहीं एक सांगतां येत नाहीं. असो. तर अशासमयीं स्मृति वचनही असें सांगेल.—

राणाभीम०ः— 'निकरानें शेवटपर्यंत युद्ध करणेंच जरूर.'

ज्ञानराजः—हेंच. '॥ धर्म्याद्धि युद्धाच्छ्रेयोन्यत्क्षत्रियस्य न विद्यते ॥ हतो वा प्राप्स्यसि स्वर्गं जित्वा वा भोक्ष्यसे महीम् ॥' या महत्तत्वाला बळकट धरून कुळाचाराच्या अनुरोधानें वाग. येवढें सांगणें आहे.

राणाभीम०ः—(नमस्कार करून मर्यादेनें) आतां या आज्ञेनुरूप मी वर्तणारच; परंतु मनांत कांहीं पृच्छा येते, याची क्षमा असावी.

ज्ञानराजः—खुशाल बोल.

राणाभीम०ः—जेव्हां या विश्वांत सुकृताला यश नाहीं, व किती अनन्वित घोर कर्में चालतात, असें पहावें तेव्हां असें वाटतें कीं, याला कोणी नियंताच नाहीं—याला सर्व साक्षित्व नाहीं- अनाचाराचा तिटकारा नाहीं. पहा, "हे यवन हजारों गोवध करितात; न्यायनीति कशी ही यांच्या गांवींही नाहीं; गम्यागम्य विचार नाहीं; निष्कारण असो, सकारण असो, मनुष्य मारणें ह्मणजे यांनां चिऱ्हाट चिरडण्यासारिखें ! अशांहीं सुचिर सुखोपभोग घ्यावा; आणि आमची ही दुर्दशा व्हावी ? बहुधा चोहींकडे दुराचाऱ्यांचीच भरभराट आढळते. हा चमत्कार !

ज्ञानराज०ः— ( क्षणमात्र नेत्र झांकून ) बाबा,

पदः—भैरवी, ताल बिलंदी.

॥ ' जग व्यापका हरीला ॥ नाहीं कसें ह्मणावें? ॥ धृ० तंतु

---

२ गीता अ० २ श्लोक ३१. उत्तरार्ध. २ गीता अ० २ श्लोक ३७ पर्वार्ध.

पटीं मिळाले ॥ भूमि नभा परीहे ॥ घट मृत्तिका निराळी ॥ ऐसें कसें ह्मणावें ? ॥ १ ॥ मुक्तीं सुतेज पाणी ॥ पुष्पीं सुवासता हे ॥ भिन्न द्वयें न वस्तु ॥ ऐसें कसें ह्मणावें ? ॥ २ ॥ मी माग तों तुह्मांला ॥ ध्याता श्री पांडुरंगा ॥ ज्ञानेश्वराचे भजनीं ॥ नाहीं कसें ह्मणावें ? ॥ ३ ॥ जग०या० '

( नेत्र उन्मीलन करून, गंभीर मुद्रेनें. )

बावा, जो उत्पत्ति स्थिति लय कारण; पंचमहाभूतें, मन, बुद्धि, अहंकार इत्यादि ज्याच्या प्रकृति; सूत्राचे ठायीं जसे मणि तेंवि सर्व भूतें ज्याचे ठायीं गोंविलेलीं आहेत; आब्रह्मस्तंवपर्यंत ज्याची व्याप्ति आहे; जळांतील जलचरांप्रमाणें ज्याच्यामध्यें स्थिरचर रावेतं; जो सगुण निर्गुण परमात्मा, अनंत मूर्ति, अनंत शक्ति,—त्याला मोहजालांहीं मर्त्य, विकुंठितबुद्धि होत्साता न जाणून भलते भलते तर्क घेतो. राजा, गर्भवासांत रे प्राण्याला कोण पोशितो ? पाषाणाच्या पोटांत दर्दुराला[1] जीवन कोण देतो ? कांसवाच्या पिलांनां कोण स्तनपान देतें ? तूं स्वभाव वादीपणावर जर जाशील तर तो स्वभावच परमात्मा होय. हा विचार फार गहन आहे. प्रस्तुत राहूंदे. याचा व्यवहारदृष्टचा विचार करूं. जगतांत तरी सत्कर्म असत्कर्म अशी निवड आहे कीं नाहीं ? सुष्ट हा दुर्दशेंतही सुगंधी पदार्थासारखा सर्वांनां आवडतो; दुष्ट हा सुदशेंतही दुर्गंधि पदार्थवत् त्याज्य होतो. हें तरी फळ काय सामान्य आहे ? पुन्हा, या देहाचे कर्मभोग पापपुण्यावर नाहींत. तुझ्याच राजाधिराज रामचंद्रानें अखेरपर्यंत कष्ट भोगिले !

राजा, या सृष्टीला नियंता नाहीं ह्मटलें, तर सर्व कांहीं नाहीं. प्रथम, या अंतराळांत जीं अनंतपार क्षितिचक्रें आहेत, तीं एकदम ढांसळून पडतील. अरे, हा प्रचंड चंडांशु सर्व जाळून खाक करील—महोदधि बुडवील—वायु उडवील—पृथ्वी आपल्याला धारण करणार नाहीं—एक दंडधारी राजा नसला ह्मणजे जशी

---

१ बेडुकाला.

प्रजेची दशा दशा उडते, तसें या विश्वाचे तुकडे तुकडे होतील. बरें, हीं सर्वसूत्रें नैसर्गिकच आहेत असें कल्पिलें, तर मग कोणी कोणाचा ना बाप ना आई, पाहिजे त्याणें पाहिजे तें करावें. थोडक्यांत सांगतों येणेंकरून जाति, धर्म, आचार, विचार इत्यादिकांचा खात्रीपूर्वक ऱ्हास होईल. तशांतून तितकीही ज्याला समदृष्टी आली कीं, मूत्र आणि पाणी, सर्प आणि आपण; यांतील भिन्नभाव ज्याचा मावळला, अशा अधिकाऱ्याला—आणि फक्त त्यालाच मात्र—हें मत शोभेल. बाबा, भलतें भलतें बोलूं नको.

'॥ यद्यदाचरति श्रेष्ठस्तत्तदेवेतरो जनः ॥

॥ स यत्प्रमाणं कुरुते लोकस्तदनुवर्तते ॥'

बरें, अनाचार ईश्वर पहात नाहीं ह्मणतोस, तर तूं तरी गुन्हेगार पुढें आला कीं, त्यास एकदम शिक्षा करितोस का? या पापिष्ठ राक्षसांश यवनांची जन्मांतरींची घोरतर तामस तपस्या आहे, तिचा क्षय झाला पाहिजे. मग धडाधड पडतील खालीं. याच खिलजी पादशहाच्या नौतवानीतवानीची वेळ नजीक आली आहे! हल्लीं दिल्लींतील महा अवलिया निजामुद्दिनौला याच्या तपश्चर्येनें बादशहाचा बचाव आहे.

आणखीं, कसोटीला लागण्याची हीच वेळ आहे. सुशील पुरुषांचे हाल हाल झाल्याखेरीज त्यांची योग्यता कोणाला कळत नाहीं. चंदन झिजल्यावरच परिमळ देतो. असें आहे, सुवर्ण तप्ततेनें शोभतें; सती विपत्तीनें; कविता टीकेनें; साधु छलानें आणि शूर समरांगणांत शयनानें शोभतो. परंतु लक्षांत ठेव, '**न प्राणांते प्रकृतिविकृतिर्जायते चोत्तमानाम्**' जेव्हां या आपल्या मानी वक्षांहीं आपल्या जन्मभूमीला लाल रंगवाल तेव्हांच शत्रूच्या दास्यांतून मुक्त व्हाल!!

असो. राजा, सर्व दिवस युद्धाच्या श्रमानें शिणला आहेस; उदयीक पुन्हा युद्धाची झुंपी आहेच. तुला आतां विश्रांति अवश्य पाहिजे. तेव्हां इतकें परमगुह्य सांगतों हें ऐक आणि मग-

---

१ भगवद्गीता अध्याय ३ श्लोक २१. २ गंजिफांतखेळण्याला मार्ग खुटणें; डाव जाण्याची वेळ; अतएव, संहार; क्षय.

मला निरोप दे. ( जरा नेत्रपातें मिटून ) बाबारे, तुझा सुवंश-वृक्ष चिरस्थायी होईल; त्याच्या शाखा सर्व भरतखंडभर पसरतील; तुझ्या वंशांत भरततुल्य सुपुत्र निपजतील; राजनिष्ठ सेवक अवतरतील; याच्या सावली खालीं धर्म, नीति, गोब्राह्मण, सुखेनैव अक्षय्य वास करितील;—जसा वपुरूपी अश्वत्थावर शिवपक्षी वर्तती, तसा या वृक्षाच्या एका शाखेवर साक्षात् शिवाचाच अवतार[1] दुष्ट कीटकांचा संहार करण्याकरितां अवतरणार आहे—अकरावा रुद्र मारुती याचा पूर्णअवतारी[2] पुरुष त्याचा गुरु होऊन ही नर-नारायणाची जोडी या कलियुगांत पुन्हा सद्धर्म जागरूक करील—( नेत्र उन्मीलन करून ) कशाही बिकट प्रसंगीं राजपुत्र हमीर[3]-सिंग व अजितसिंग यांना जपा. त्याचप्रमाणें, मंत्री, सचीव, सेनापति इत्यादिकांच्या कुळींच्या मुळ्या नीट जोपसणा करून त्यांनां या वाऱ्हटळींतून काढून सुस्थळीं नेऊन ठेवा.

( राणा ज्ञानराजांचे पायांवर मस्तक ठेवितो. )

ज्ञानराज महाराजः—( त्याचे मस्तकावर हात ठेवून. )

**( अभंग ) ॥ राया तुझे ठायीं ॥ माया भय नाहीं ॥**
**॥ काया गेलीयाही ॥ सत्व जोडीं ॥ १ ॥**

बाप्पा, आतां माझ्यानें पुढें बोलवत नाहीं. (कंठ सद्गदित होऊन) उपदेश करणें फार सोपें; वागणें फार कठीण. अस्तु, प्रभूची सत्ता! आतां तुला भगवंताच्याच वाणीनें उपदेश व आशीर्वाद करितों—

**" ॥ मयि सर्वाणि कर्माणि ॥ संन्यस्याध्यात्मचेतसा ॥**
**॥ निराशीर्निर्ममो भूत्वा ॥ युध्यस्व विगतज्वरः ॥[4]**
**॥ मय्यर्पितमनोबुद्धिर्मामेवैष्यस्यसंशयम् ॥[5] "**

राणाभीम०:—तथास्तु ! ( नमस्कार करितो. )

ज्ञानराजः—आशीर्वाद. ( दोघे जातात. )

**अंक चौथा समाप्त.**

---

१ शिवाजी राजा. २ रामदासस्वामी. ३ हमीरसिंग, सांप्रतच्या उदेपूरच्या राण्यांचा मूळपुरुष; व अजितसिंग शिवछत्रपतीचा मूळपुरुष होय. ४ गीता अध्याय ३ श्लोक ३०. ५ गीता अध्याय ८ श्लोक ७ उत्तरार्ध.

# अंक पांचवा.

## प्रवेश १ ला.

स्थळः-चितूर राजरस्ता.

( दवंडीवाले दांडोरा पिटीत चालले आहेत. )

दांडोराः-ढब्-ढब्; ढब्-ढब्-ढब्-ढब्-ढब्.

दवंडीवालाः-' ऐका हो, सर्व तमाम नागरीक लोक-गढींतील, वेशीआंतील, वेशीबाहेरील लोक- नर, नारी-सानथारे लोक-अमीरउमराव लोक-शेटसावकार, कोळीमाळी लोक- स्वकीयपरकीय लोक-ऐका; सरकारचा हुकूम ऐका.

दांडोराः-ढब्-ढब्-ढब्-ढब्-ढब्.

दवंडीवालाः-'आपल्या राजघराण्यांतील एकूणएक पुरुषांचा निकाल होईपर्यंत हा किल्ला लढणार; शहरच्या प्रत्येक तसूतसूसाठीं तुंबळ युद्ध होणार; करितां ज्याला जाणें असेल त्याणें वेळींच खुशाल किल्ला सोडून जावें; अशी सरकारची सर्वांना मुभा आहे.'

दांडोराः-ढब्-ढब्-ढब्-ढब्.ढब्.

( पडद्या पलीकडे ) ' नाहीं; नाहीं आम्ही जाणार; नाहीं पळपुटे होणार; आह्मी महाराजासंगें लढूं-पडूं-मरूं. खाल्लेल्या अन्नाची चीज करूं, '

दौंडीवालाः-' शहरांत तूर्त लग्नकार्य-उत्साह वगैरे बंद. '

दांडोराः-ढब्-ढब्-ढब्-ढब्-ढब्.

( दौंडीवाले जातात. )

## प्रवेश २ रा.

स्थळः-स्मशानांतील शंकराचें देऊळ. वेळः-रात्र.

( राणा भीमसिंग शोक करीत चालला आहे. )

राणाभीम०ः-प्रभो दीनदयाळ, मज पामरावर कांहो डोळे-

झांक केली! या मंदभाग्याकडून काय पातक घडलें; आणि हा कुलक्षय पहाण्याला उरलों! आठ दिवसांचें राज्य करून आज माझा कुंवरजी बाळ देह सांडून स्वर्गस्थ झाला. बाळा, मघाशीं तुझ्या मृत प्रेताचा शेवटला संस्कार करीत असतां-लोकें कल्होळ करितील ह्मणून- कठोरअंतःकरणानें डोळ्यांतील एक टिपूस देखील काढिलें नाहीं रे. ( गळा दाटून येतो ) हें स्वर्गांतून पाहून तूं मला काय ह्मटलें असशील? किंवा तुझ्या पितृभक्त मनाला असला विकल्प मुद्धां येणार नाहीं; परंतु बाळा, नाहींबरें-नाहींबरें मी असला कृतघ्न होणार. ( ढळढळां रडतो. ) तुझे लेंकराचे गुग काय काय तरी रे आठवूं. तुझा धाकटा भाऊ अजितसिंग याजवर माझें विशेष प्रेम पाहून माझ्या प्रीत्यर्थ त्वां त्याच्या नांवानें राज्यावरचा आपला वारसा सोडिलास; माझ्या प्रीत्यर्थ तुझी धाकटी आई पद्मिनी हिला औरस पुत्राहून ज्यास्त जपत होतास; ज्या तुला म्यां दुष्टानें संकट काळीं ढालीसारखें पुढें करावें, एरवीं मागें टाकावें; त्या या चांडाळ बापाकरितां अखेरीस मोठ्या संतोषानें बळी पडलास! हेंच माझ्या काळिजाला बा, टच् टच् टोंचित आहे रे. तुझ्या गळ्याची शपथ, टोंचित आहे. बाळा तुझा कसा उतराई होऊं? (मोठ्यानें आक्रोश करितो. ) कुंवरजी—कुंवरजी—माझ्या बाळा कुंवरजी एकवार 'ओ' दे रे. तुजकरितां रडलों नाहीं ह्मणून रुसलास का? परंतु हा पहा, तुझ्या खाईशीं बसून यथेच्छ रडण्यालाच येत आहें. बाळा, तुझ्या प्रिय पत्नीला बरोबर पाठविलें नाहीं ह्मणून तर रुसून बोलत नाहींस ना? पण काय करूं? आपल्या मागें माझें बछडें हमीरसिंग पोरकें पडल नाहीं का?

( पडद्यापलीकडे रुदनाचा शब्द होतो. )

राणाभीम०:—( चपापून ) आँ! इतक्या रात्रीं काळेश्वराच्या देवालयांत कोण रडतें? ( तिकडे कान देतो. )

( पडद्यापलीकडे ) 'मी जाणार, मी जाणार; मला राज्याची काय पर्वा आहे? प्राण निघून गेल्यावर नुसत्या कुडीचा ओढा कशाला?'

**राणाभीम०**:–( दूर पाहून ) ही कोणी स्त्री देवळाच्या गाभाऱ्यांतून बाहेर रडत येत आहे. ग्रामदेवता तर नव्हे ना? देवी, तुझ्या इच्छेप्रमाणें माझा कुंवरजी, चिलयाबाळ, आज तुला बळी दिला; दुसरा बळी आज सिंहासनावर बसला आहे; तिसरा, तीन दिवसांनीं बसेल, याप्रमाणें बारा बळी पडतील-आणि पुन्हा तूं असंतुष्ट होऊन चितूर सोडून जाणार? अरे, मागून ही दुसरी कोण? इकडेच येताहेत. तेव्हां आपण आडून पाहूं या. ( लपतो. )

( दोन स्त्रिया येतात. )

**एक स्त्री**:–आई तुला पदर पसरितें, येवढा नाद सोड कसा. तुझ्या भक्तीसाठीं अद्याप म्यां जीव तरी ठेविला होता. मी बरें तर मग काय करावें? किती रडावें? माझ्या मुलांना, माझ्या मर्दाला पाणी देण्याचें मज हतभाग्येचे कपाळीं आलें आहे! ( दीनस्वरानें) देवा, मज अनाथाला एकट्यालाच कशाला आतां ठेवितोस विपतिभोगण्याला? बाई, तूं पुढें कीं मी मागें.

**दुसरी स्त्री**:–बाई, मरण हें केव्हां तरी येणारच. त्या पेक्षां तें योग्य वेळीं आणखी प्रतिष्ठेनें आलेलें बरें. करितां या उपर माया पाशांत मला गोवूं नको, इतकी कृपा कर. ज्यांच्याकरितां जगायचें ते गेले. एक त्यांच्या मूर्ति शिवाय कांहीं दिसत नाहीं आतां. ते पहा चितेंतून वर येऊन हातानें खुणावताहेत मला. बघ कसें मनोहर रूप घेतलें आहे–आल्यें, सरकार, ही आपली दासी आली–

**राणाभीम०**:–( मनांत ) अरेरे! मज खातर रणकुंडांत पडलेल्या एखाद्या उमरावाची ही साध्वी स्त्री पतिविरह न साहून मज सारखीच येथें आली असावी.

पहिली स्त्रीः—बाईसाहेब! निदान त्या तान्हुल्याकडे तरी पहा.

दुसरी स्त्रीः—तो ज्याच्या आशीर्वादाचें फळ आहे, व ज्याणें त्याला निर्माण केलें, ते मज परीस संभाळणारे ज्यास्त आहेत. आतां मी जातें— चाललें—गेलें बरें, अलके-ही गेल्यें. !

( धांवत जाऊन एका चितेंत उडी घालिते. )

पहिली स्त्रीः—( आरोळी करून ) अरेरे, खरेंच गेली ! अरे, कोणी तरी बाबांनों धांवा रे. बाई सुशीले, मी पण येतें—

राणाभीम०:—( पुढें धांवून ) अहो, धरा धरा तिला.

पहिली स्त्रीः— ( राण्याला ओळखून) सरकार, सुशीलेनें सहगमन केलें ! !

( दोघेंजणें तिला काढण्याचा प्रयत्न करितात; परंतु त्यांचा उपाय चालत नाहीं. )

राणाभीम०:—( घाबरून ) काय ? ही माझी सुशीला ?

पहिली स्त्रीः—जी सरकार. हमीरसिंगाच्या संरक्षणार्थ आपण तिला कोंडून ठेवविली; तरी तिणें खिडकींतून उडी घालून, पतीचा शिरपेंच व कटार यां सहवर्तमान सती गेली ! आणखी मी तिची बटीकही तिच्या सेवेला जातें. आतां जिणें पुरे !!

( तीही त्याच खाईंत उडी घालिते. )

राणाभीम०:—हां हां- अलके, बाई-( दीर्घ स्वरानें ) गेली ! ( डोळे मिटून छाती पिटीत ) हाय, हायरे; मी देखतां देखतां दुर्दैवानें नुमजून सुशीला हातांतून गेली-अलका गेली!! माते ग्रामदेवते, आई कुलस्वामिणी, असल्या असल्या माझ्या रत्नाच्या आहुति घ्या- माझ्या वंशाचा समूळ यज्ञ करा- माझी राजधानी खा—माझी स्वतांची पूर्णाहुती घ्या- पण एकदांच्या संतुष्ट व्हा आणि सुखानें आपल्या पिशाच्च परिवारासह शहरांत वास करा. ( जरा थांबून ) हायरे प्रारब्धा, काय गति आणिली ? कीं, माझ्या निष्पाप धड्याखड्या मुला बाळांची क्रिया पहाणें

कपाळीं आलें ! बाळा कुंवरजी, बाई सुशीले, तुह्मीं आपल्या जीवांचें तर सार्थक्य केलेंच. परंतु मी कर्मकरंटा आतां तुमच्या अनाथ बाळकाला हें काळें तोंड कसें तरी दाखवूं ? त्यानें 'आई कोठें आहे ? बाबा कोठें आहे ?' ह्मणून पुशिलें तर काय, सांगूं हो ? बाबा कुंवरजी, तुझ्या दोन आईचें सांत्वन कसें करूं ? 'कुंवरजी, कुंवरजी' करून जेव्हां ती हंबरडे फोडील तेव्हां तिला कायरे उत्तर देऊं ? बाळा, अतःपर 'कुंवरजी, माझ्या कुंवरजी' ह्मणून कोणाला हाक मारूं ? (रडतो) हं हं हं. (जरा थांबून) अरे, ज्या या माझे दग्ध हस्तांहीं तुझ्या हातांत पुष्टिवर्धक गवताची मोळी बांधिली, त्याच हातांनीं तुझें तर्पण करण्याची वेळ यावीना ! (जरा थांबून) अरेरे, बिचाऱ्ये अलके, तुझें तर्पण करण्यालाही या चांडाळापायीं कोणीं नुरावें काय ? अस्तु. हा मी तुझा धर्मपुत्र आहें. दासी होऊन काय तुझी योग्यता! तुज निपुत्रिका साठीं हा मी नेत्र जळानीं तर्पण करितों. (हातांत अश्रु धरून सोडितो) आणीक कितीक असे निपुत्रिक होऊन या पाप्या करितां बळी पडले असतील. प्रजेचें यथासांग संगोपन हातून होत नाहीं; तर मी कसला कुलांगार राजा. नको नको हा संसार-नको हें राज्यपद–नको हें जिणें; आणि भगवंता, पुरे या यमयातना ! आई चितूरभवानी, हा माझा स्वतांचा बळी घे कसा. या मुलांच्या सरणांतच प्रवेश करितों. (खाई कडे धांवतो.)

(पडद्या पलीकडे) (उच्चस्वरानें) रे, रे, राजा भीमसिंगा निष्फळ–निष्फळ; हें तुझें करणें सर्वथैव निष्फळ ! आरंभिलेला नरमेध यथासांग होऊन शेवटीं अखेरीस तुझी पूर्णाहुति पडली पाहिजे; न तरी झालेलें सर्व व्यर्थ ! !

---

१ मुलगा जन्मतांच एका प्रकारच्या गवताची मोळी बांधण्याची चाल रजपूत लोकांत होती. तें गवत कितीही उन्हाळा असला तरी वाळत नसे.

**राणाभीम०**:—( वर पाहून ) आँ, हें कोण ? ( इकडे तिकडे पाहून ) कोणी नाहीं. हाँ, एकूण या देहानें पूर्णदुःख अनुभविलें पाहिजे, साग्र ऱ्हास पाहिला पाहिजे, अशी भगवदिच्छा आहे काय ? तर हा येथेंच रहातों !

( मूर्च्छा येऊन धाडकन् पडतो. )

पडदा पडतो.

## प्रवेश ३ रा.

**स्थळः**—( दरबार ) राजवाडा.

( **राणाभीमसिंग**, राण्याचा दुसरा मुलगा **अजितसिंग**, **बादल** आणि इतर सरदार बसले आहेत. )

**राणाभीम०**—सर्व सरदार हो. आजपावेतों आपण सर्वांहीं दुःखाचे अतिशय कडु कडु प्याले गट्ट करून आतां दुःखांतील दुःखपणही नाहींसें झालें. काय तो शेवटचा एकच घुटका घेणें राहिलें आहे. माझे अकरा पुत्र फुलपांखरां प्रमाणें, औटदिवस राजरूप धारण करून लोकांतराला गेले; माझी स्वामिभक्त प्रजाही सत्याला जागून त्यांच्या समागमें गेली. आतां एक राजाचें बलिदान पाहिजे. तें मीच होतों. करितां तुह्मांला सर्वांनां विनंति आहे कीं, आज प्रहर रात्रीं अजितसिंग व हमीर यांस घेऊन शत्रूच्या फौजेची फळी फोडून तुह्मीं सर्वांहीं अन्हलवाड्याची वाट धरावी. मामा बादलजी, आपल्या मनास येतेंना ? याउपर आणखी माझ्या प्रजेची निष्कारण हानी पाहवत नाहीं.

**अजितसिंग**:—बाबा, माझे एका सारखे एक रणशूर, पितृभक्त भाऊ शत्रूंची खैरी जिरवून, नांव गाजवून गेले; आणि मी नामर्दासारखा पळून जाऊन माझ्या वांट्याचा माझ्या बाबाला बळी पडूं देऊं ? तर मग धिक्कार असो माझ्या पुरुषत्वाला ! या पेक्षां जन्मास न येतों तर बरें. येणें करून माझ्या जातीला बट्टा; माझ्या कुळाला-गोताला-माझ्या आईला बट्टा ! माझ्या कीर्तीला कीड ! !

**बादल**:—आणि राणाजी, माझें मागें काय उरलें आहे ? माझा बापासमान चुलता गेला; माझें गणगोत गेलें; माझी बहीण पद्मिनी उद्यां अग्निकाष्ठें भक्षण करून जाणार;— तुह्मी जाणार; तरी पश्चात् तुमच्या सगळ्यांच्या दुःखानें झिणून झिणून अंथरुणावर पडून मरूं ?

**सर्वसरदार**:—हुजूर, आह्मीही सरकारचे चरण सोडून कधीं-जाणार नाहीं; त्यांची जी गति तीच आमची. आतां एकच; ‘ मरूं किंवा मारूं.’

**राणाभीम०**:—शाबास ! शाबास वीरांनों. माझ्या प्रजेची तर पराकाष्ठेची धन्य ! परंतु बाबांनों, सर्वच असें करूं नका. ज्ञानराज महाराजांची आज्ञा जर आपणास मान्य आहे, तर आपण आपल्या कुळांतल्या संतानज्योति निर्विघ्न प्रदेशांत सुरक्षित ठेवणें जरूर आहे. करितां लवकर योजना करा. आज मुसुलमानांचा बकरीदचा सण असल्या कारणानें ऐषआरामींत ते जरा गैरसावध राहतील. फिरून आपली अगदीं शेवटची पाळी आली आहे, हें जाणून तर ते दिवसें दिवस जास्त बेफिकीर होत चालले आहेत. तेव्हां आज मध्यरात्रीं एका टोळीनें खुद्द बादशहाच्या गोटावर छापा घालून त्यांनां तिकडे गुंतवावें; तंव इकडे दुसऱ्या शेलकी टोळीनें यांनां संभाळून उजाडण्यापूर्वीं आरवली पर्वताच्या पार जावें. नंतर साडेतिडें कूच करून तिकडे पोहोंचावें.

**अजितसिंग**:—पण सरकार, मी नाहीं जाणार.

**राणाभीम०**:—बाळा, ही हट्ट करण्याची वेळ नव्हे. तुला येवढी माझी गोष्ट ऐकिलीच पाहिजे.

( हुजऱ्या हमीरसिंगाला घेऊन खेळवीत खेळवीत येतो. )

**राणाभीम०**:—( गहिंवरून ) बाळा अजिता, या पोरक्या मुलाला अतःपर आई-बाप-आजा-आजी, तूं. याला नीट जपा बरें. उद्यां संध्याकाळाला तुह्मांला मी नाहीं; आणि मला तुह्मी नाहीं !

**अजितसिंग**:— ( हंबरडा फोडून ) काय बाबा ? एकूण

आज आठ प्रहरांनीं मला ' बाबा ' हा शब्द नाहींसा होणार या जगतांतून! जळो जळो हो, हा माझा देह! ही आपली मज-वरील अतिशय माया मला जन्मभर रडवणार आहे!

हमीरः–( जवळ येऊन ) आजोबा, माझ्या काकाला रडायला काय झालें? माझा बाबा सांपडत नाहीं ह्मणून?

राणाभीम०:–होय बरें बाळा.

हमीरः–( त्याच्या गळ्याला मिठी मारून ) आणीक काका रडतात ह्मणून आपण रडतां?

राणाभी०:–हो-(असें अर्धपडें बोलून डोळ्यावर रुमाल धरितो)

हमीरः–काका, माझी आई कोठें गेली?

अजितसिंगः–बाळा, बाबाला सोधायला गेलीअँ. बाळा, इकडे ये मजकडे. ( त्याला घेऊन त्याचे मुके घेतो. )

हमीरः–काका, माझ्या आईला कोण सोधील बरें?

अजितसिंगः–( डोळ्यांत अश्रु आणून ) आईला सोधायला मी जातों बरें बाळा.

हमीरः–पण ती ह्मणतात देवाकडे गेली! ( रडूं लागतो. ) माझा बाबा पण देवाकडे गेला! माझा बाबा गेला तेव्हां ह्मणाला ' बाळा, मला एकदां शेवटचा मुका देरे. '

( सर्व रडूं लागतात. )

हमीरः–आजोबा, काका, तुह्मी रडूं नका. मी जाऊं देवाकडे बाबाला आणाला? मग माझी आई मला कडेवर घेईल.

( कोणी बोलत नाहींत. )

हमीरः–( सभोंवतीं पाहून ) मी आलों ह्मणजे तुह्मी सगळे रडतां. तर मग मीच जातां इथून ( हुजऱ्याला उद्देशून ) चलरे माझ्या बाबाच्या घोड्याकडे; ह्मणजे तो नेईल मला बाबा जवळ.

( दोघे जातात. )

अजितसिंगः–पहा, हें मूल तुटलेल्या खांदीवरील फुलागत कोमेजलें आहे; अन्नपाणी घेत नाहीं. याचें बापुडवाणें तोंड पा-

हून माझें काळीज करपतें—सरकार, माझ्या भावांच्या मागें मला कां ठेविलें हो ! ही अपेष्टा पाहण्याला ?

**राणाभीम०**:—मुला, तुझा दीनबाप, गाय होऊन, तुज पुत्रापाशीं एकवार येवढीच भिक्षा मागतो कीं, मला राजा धृतराष्ट्रासारखें निपुत्रिकाचें मरण न येऊ. नच ऐकशील तर निरुपाय आहे. माझे हे प्राण आतां फार दिवस टिकत नाहींत. अंगांतील रक्त शोकानें शोषून गेलें आहे. पाहिजे तर हें शस्त्र घे आणि टोंचून पहा. ( शस्त्र पुढें करितो )

**अजितसिंग**:—( ओरडून ) बाबा, क्षमा—

**राणाभीमसिंग**:—आहे.

( दोघेही डोळ्यांस हात देऊन हळूहळू रडतात. )

**बादल**:—राणाजी, आह्मी कांहीं सरदार, यांनां दोघांनां अन्हलवाडच्याच्या शूर ठाकूर मंडळींत सपरिवार सुरक्षित पोहोंचवून तीन दिवसांत परत येतों. कांहींजण तेथें राहतील.

**राणाभीम०**:—( गंभीर मुद्रेनें ) ठीक आहे. ( अजितसिंगास उद्देशून ) मुला, तूं सुज्ञ आहेस. तरी पण शेवटीं दोन शब्द तुला सांगितल्यावांचून माझ्यानें राहवत नाहीं. यांजवर लक्ष दे. 'कसाही प्रसंग आला तरी नीतिमार्ग सोडूं नको.' 'पृथ्वीही कामधेनु, जन हे तिची प्रजा, व आपण त्या उभयतांचे रक्षक; त्यांच्या लालनपालनांतच आपला स्वार्थ आणि परमार्थ होय.' 'स्थिरचराचा स्वामी जो परमात्मा त्याला सदैव शरण असावें.' झालें—येवढेंच. ( जरा थांबून ) आतां शेवटीं भगवान ज्ञानराजांच्या आज्ञे प्रमाणें सांगतों. तुझे दोन पुत्र आहेत; परंतु पुत्रलोभाला आंवर घालून तुझा पुतण्या हमीरसिंग यासच आपल्या पाठीमागें त्वां सर्वांचा अधिकारी करावें. येणेंकरून आपलें कल्याण आहे. ( स्तब्ध होतो. )

**अजितसिंग**:—(उठून नमस्कार करून) बाबा, असेंच करीन.

**राणाभीम०**:—आशीर्वाद. ( प्रसन्नमुद्रेनें ) आतां सुखेनैव

मृत्यु येवो. ( सर्व मंडळीस ) कसें काय? आतां उठावयाचें ना?

सर्वः—‘ हो. ’ ( निघून जातात. )

## प्रवेश ४ था.

स्थळः—पद्मिनीचा रंगमहाल. वेळः—उत्तररात्र.

( राणाभीमसिंग रंगमहाला बाहेर उभा ठाकतो. )

राणाभीम०:—( आपल्याशींच ) आतां एकवार आपल्या प्रिये पद्मिनीची भेट घेणें आहे. बाकी सर्वांच्या झाल्या. तर चला तिकडे. ( पुढें जाऊन ) ती तेथें चिंतातुर बसली आहे. दासीचें व तिचें कांहीं बोलणें चाललें आहे. तरी एकदम त्यांजवळ जाऊं नये.

( जवळ जाऊन अडून उभा राहतो. )

दासीः—( हात जोडून ) बाईसाहेब, असें कष्टी बसून काय होणार? आपण राजपूतांच्या बायका; शूर पुरुषांना जन्म देणाऱ्या! आज राजपूतांचें नांव काढिलें कीं, मोगल, पठाण, खिल्जी थरथरां भितात; त्यांच्या बायका त्यांनां लढाईला न जाण्याविषयीं काकुळत्या करितात; बरें आपला पुढला परिणाम जगजाहीर आहेच. आणखी आपण होऊन स्वतां लाक्षा—गृह तयार करविलेंत. मग असें कां?

राणाभीम०:—(मनांत) एकूण अग्निकाष्ठें भक्षिण्याचा सर्व राण्यांचा व बायकांचा झालेला बेत खास आहे.

राणीपद्मिनीः—दुसरें कांहीं नाहीं. मज कल्येच्यायोगें कुळाला, राज्याला, देशाला, सर्वस्वीं क्षय आला. याची मनस्वी खंत वाटते.

दासीः—हँः बाई साहेब, तर मग द्रौपदी, सीता, यांना देखील काय बोलावें? हा दोष त्यांचाही नव्हे, व आपलाही नव्हे; तर त्या जरठ ब्रह्मदेवाचा! त्यानें बायकांनां सुद्धां भुलविणारें असें अतिमोहक रूप कां द्यावें?

राणाभीम०:—( मनांत ) शाबास मुक्ते. याचें नांव उत्तर. माझ्या अगदीं मनांतलें बोलली.

राणीपद्मिनीः—बाई मुक्ते, पुढील पंथाला लागण्यापूर्वीं एकदां त्यांची चरणभेट घडावी, ह्मणून फार आशा धरून बसलें होतें; परंतु आतां येण्याचें चिन्ह दिसत नाहीं. मध्यरात्र तर उलटून गेली. बाई, एवढी इच्छा राहणार. अस्तु भगवान् आहे. मुक्ते, आजच्या या प्रसंगावरून तुझ्या द्रौपदीच्या धांव्याचा माझ्या मनावर पक्का ठसा उमटला. एकदां ऐकवितेस का बाई, तो शेवटीं?

दासीः—इतकेंचना? ह्मणतें. ( गाते )

श्रीयदुवीरा, नंदकिशोरा, जाते कशी यामिनी ॥ धाक हा पडला माझ्या मनीं ॥ धृ०॥ सहस्र साठीं, बा जगजेठी, येती यति या वनीं ॥ दाविती इच्छा बहु भोजनीं ॥ १ ॥ शापा देतिल बापा, आतां मिळतां अन्न न जनीं ॥ किती तरी हानि कीर्ति लागुनी ॥२॥ धांव दयाळा धांव वत्सला झणि माझ्या धावणी ॥ एकली काय करूं भामिनी? ॥ ३ ॥ श्रीयदु०—

राणीपद्मिनीः—( शेवटला चरण पुनःपुन्हा स्वतः ह्मणते. )

'॥ धांव दयाळा धांव वत्सला, झणि माझ्या धावणी ॥
॥एकली कायकरूं भामिनी॥ एकली कायकरूं भामिनी? ॥'

( राणाभीमसिंग एकाएकीं पुढें होऊन. )

राणाभीम०ः—( हांसून ) प्रिये, एकटी कां? हा मी आलों.

( पद्मिनी लाजून उभी रहते. )

दासीः—बाईसाहेब, खालीं जाऊन मी पंचारतीची तयारी करितें.

राणीपद्मिनीः—( दासीस ) बाई, तूं मोठी चतुर आहेस. तुला मी काय सांगायचें आहे. ( दासी जाते ) ( नंतर राण्यास उद्देशून ) असे असे दक्ष सेवक, पितृभक्त पुत्र, राजनिष्ठ प्रजा, असा सुपीक देश-असें ऐश्वर्य या पायांनां अनुकूल असून—

राणाभीम०ः—(हांसून) प्रिये, अशीं तुजसम अनुपमेय स्त्री-रत्नें या गणनेंत कां वर्जिलीं?

राणीपद्मिनीः—सरकार, या घातुक विषवल्लींचें, मनुष्याकृति नागिणींचें—नव्हे, सर्पिणींचें- वर्णन कशाला?

राणाभीम०:—( टाळी वाजवून ) हो. नागिणीच शब्द बरोबर. प्रिये, अशा रत्नांहीं युक्त क्षणभर जरी जीवित असलें तरी तें धन्य ! मग आज कैकवर्षें अशा रत्नांपासून मला सौख्य होत आहे; यावरून मी किती तरी धन्य गणावा? तूं कां वारंवार मनाला त्याजविषयीं खंता घेतेस ?

राणीपद्मिनीः—महाराज, आपल्या व आपल्या गोताच्या व आपल्या प्रजेच्या नाशास मी सर्वस्वीं कारण झालें, ह्मणून फारच दुःख होतें.

राणाभीम०:—प्रिये, कोणी कोणाच्या दुःखाला किंवा सुखाला कारण होत नाहीं; जो तो आपआपल्या कर्माप्रमाणें फल भोगितो. तूंच जर आमच्या नाशाला मूळ असें ह्मणावें, तर आज बारा वर्षांपूर्वीं जो या शहरावर याच बादशहानें प्रसंग आणिला होता; तेव्हां ही वेळ कां न यावी ? बरें, इतक्या अवधींत त्या बादशहालाच कां मरणानें न गांठावें? किंवा तो बलहीन न व्हावा? तरी हा नेमानेमच असा. हानीला कांहीं तरी निमित्त होतें. पुन्हा आपण मर्त्य; आपल्याला केव्हां तरी महानिद्रा यावयाचीच.

राणीपद्मिनीः— ( कानोसा घेऊन) आँ! पहिला कोंबडा तर झाला. एकूण तीन तासच आतां आपल्या सहवास सुखाचे राहिले मला. ( डोळ्यांस पाणी काढिते. )

राणाभीम०:—वा. फार चांगलें झालें तर. वस्तुतः जितकी देहावसानाची वेळ आतां जवळ येईल तितका आपल्या अपरिहार्य दुःखाचा अंत लवकर होईल; आणि तितका आनंदमय स्वर्गलोक समीप येईल, जेथें दुःख, क्लेश, पीडा इत्यादिकांचें नांवही नाहीं.

राणीपद्मिनीः— जेथें दुःख, क्लेश यांचें नांव नाहीं, तेथें सुखाचा अनुभव तरी कसा येणार ? सर्वच आनंदरूप जर आहे तर कोणाला कोणाची आवश्यकता राहणार नाहीं. दुःखाच्यापायीं सौख्य आणि सौख्याच्यापायीं दुःख, आणि या दोहोंच्या-

पायीं मनुष्यांचा परस्पर संबंध—तेव्हां, अर्थात् स्वर्गाहून मृत्युलोकच बरा. आणि स्वर्गीचें सौख्य आपल्याला येथें असून तें मजकरितां अंतरलें !

राणाभीम०:—प्रिये, सुजनांचें अंतरंग पुष्पाच्या अंतरंगाप्रमाणें अति मृदु असतें. तूं ह्मणतेस तें खरें. या मनुष्य योनींतच भगवंताच्या प्राप्तीचा मार्ग आहे. सर्व सुखोपभोग घेण्याचेंही हेंच स्थान होय. तेव्हां या लोकींचे आयुष्याचा लय इच्छिणें ह्मणजे मोठ्या लाभाची हानीच प्रार्थणें आहे. मनुष्यमात्राला जीव किती प्रिय ! परंतु आपल्या नाशानें बहुतांचें जर हित आहे तरी तो खर्चिण्यांतच सर्व स्वार्थ परमार्थ आहे. आपण मरून अपल्या प्रजेवरचें संकट टळलें कीं, आपलें कर्तव्य झालें; आपली कीर्ति हा आपला अजरामरपणा; आपल्या प्रजेचें जेणेंकरून सौख्य साधेल तें आपलें प्रिय. आणि माझे मतें, हे सर्व हेतु आपल्या एक मरणानें साधणार आहेत. तेव्हां तें जितकें जवळ येईल तितकें उत्तम.

राणी पद्मिनीः—खरें आहे. हाच माझा आतां शेवटला नमस्कार या चरणांनां. ( राण्याचे पायांवर मस्तक ठेवून त्याचें मुख पहात पहात निश्चेष्ट पडते. )

राणाभीमसिंगः—( तिला कुरवाळित) प्रिये, प्रिये—( दचकून) अरे, हें चिन्ह कांहीं निराळेंच दिसतें. ( हाका मारितो ) प्रिये, पद्मिनी-पद्मिनी—

( इतक्यांत एक दासी वर येते. )

दासीः—खालीं पुरोहित[1] स्नान करून सरकारची वाट पहात आहेत.

राणाभीमसिंगः—बरें आहे. मुक्ते, हिला संभाळ. मी जातों. आह्मीही ब्रह्मकर्म[2] सारून तुह्मांबरोबरच सूर्योदयीं पुढील लोकार्थे प्रयाण करणार. येतों आतां. ( राणा निघून जातो. )

( पडदा पडतो. )

---

१ कुलगुरु. २ क्षत्रियांना त्रिकर्माचा अधिकार आहे;

## प्रवेश ५ वा.

स्थळः–समरभूमी. वेळः–प्रातःकाळ.

( राणाभीमसिंग व सर्व सरदार स्नानें करून केशर चंदनाच्या उट्या लावून, सुवासिक पुष्पांच्या माळा धारण करून; सशस्त्र लढाईस येत आहेत. भाट लोक लढाईचीं गीतें गात पुढें चालले आहेत; व हलक्या, सणया, करणढोल वगैरे रणवाद्यें वाजतआहेत. )

पुढील दोन भाटः– ( रणगाणें गातात. )

चालः–' गले बिचकंथा० '

( हिंदुस्थानी, ' राजा गोपी चंद' )

' ॥ चलो चलो भाई ॥ चलो चलो भाई ॥ '–

मागील दोन भाटः–( पुन्हा तेंच ह्मणतात. )

' ॥ चलो चलो भाई ॥ चलो चलो भाई ॥ '–

पुढील भाटः– ' ॥ अडेल, दडेल त्यासि रामदुहाई ॥ '

मागील भाटः–' ॥ अडेल, दडेल त्यासि रामदुहाई ॥'

पुढील भाटः–' ॥ राम दुहाई ॥ रामदुहाई ॥ ध्रु० ॥

मागील भाटः–' ॥ रामदुहाई ॥ रामदुहाई ॥

सर्वः–

॥ 'चलो चलो भय्या ॥ चलो चलो भय्या॥ सकल ह्मणो तव वीरसु-मय्या ॥ वीरसु–मय्या ॥ वीरसु–मय्या ' ॥ १ ॥

( पडद्यापलीकडे कलहोळ होतो.) जय, जयहो जगदंब, जय !

॥ ' लढो लढो भाई ॥ लढो लढो भाई ॥ सोज्वळ निजकुळ, राख बढाई ॥ राख बढाई ॥ राख बढाई ' ॥ २ ॥

॥' लढो लढो भय्या ॥ लढो लढो भय्या ॥ बकरिसरि तोडूं हे सुनि शिय्या ॥ हे सुनि शिय्या ॥ हे सुनि शिय्या ' ॥ ३ ॥

राणा व सरदारलोकः–(बाहेर येऊन) भले शाबास ! भले बहाद्दर ! चालूंद्या.

---

१ शपथ, आण. २ वीरमाता. ३ मुसुलमानलोक.

॥ 'भले भले बाबा ॥ भले भले भाई ॥ बढो बढो लढो लढो मर्द सिफाई ॥ मर्द सिफाई ॥ मर्द सिफाई ॥ ४ ॥

**राणाभीमसिंगः**–( हात वर करून ) हो, हो, हो; थांबा.

**सर्वलोकः**–हो, हो, थांबा; ऐका; सरकार काय ह्मणतात तें ऐका.

( सर्व स्तब्ध होतात. )

**राणाभीम०ः**–( पुढें होऊन ) वीर मित्र हो, माझे सुहृज्जन हो, आज आपल्या आयुष्याचा हा अखेरचा दिवस आहे. इतके दिवस दर संध्याकाळीं आपल्याला घरीं जावें लागे. परंतु आज आपल्याला घर नाहीं. दररोज आपल्याला मागें बायकामुलांची काळजी वहावी लागे; तीं आपण पुढें चालतीं केलीं! देवयज्ञ, पितृयज्ञ सारून आलों आहों. मागें कांहीं एक उपाधि राहिली नाहीं. तेव्हां या भगवान् सूर्यनारायणाबरोबरच आपल्याला अस्तंगत व्हावयाचें—

**सर्वसरदारः**–हो, हो. मागें कोण राहतो ?

**राणाभीम०ः**–तर मग मित्रहो, या तुमच्या विजयी तरवारी परजण्यापूर्वीं माझी थोडीशी विनंति ऐकाल ?

**सर्वसैन्यः**–सरकार, जरूर, जरूर; अलबत ऐकूं.

**राणाभीम०ः**–मित्र हो, प्रथम माझ्या राजनिष्ठ प्रजेला मला पोटभर पाहून घेऊं द्या. माझी प्रजा माझें दैवत; आणि मी त्याचा सेवक होऊन उत्तम चाकरी बजावीन अशी पुष्कळ आशा होती; पण नाहीं तें माझ्या प्राक्तनीं.

**एक सरदारः**–छे छे, सरकार असें नाहीं. गुजराथ, राजपुताना, माळवा, यांतील कोणत्याही प्रजेपेक्षां आह्मी फार सुखी होतों.

**दुसरा सरदारः**–महाराज, प्रस्तुत जे येथें आह्मी आलों आहों ते आमच्या राजाकरितां नव्हे; तर आमच्या बापासारख्या पालका करितां, आईसारिख्या पोषकाकरितां आलों आहों.

---

१ पुढें सरा. २ शिपाई.

**एक लहान सरदारः**-हुजूर, माझा बळी देऊन जर आपण वांचतां तर स्वतांच्या हातानें मी आपलें गर्दन छाटितों!

**एक अति लहान सरदारः**-राणाजी, माझी आई मेली तेव्हां मी रडलों नाहीं; परंतु तुमच्यासाठीं मला फार रडूं येतें. (डोळे पुसतो.)

**राणाभीम०ः**-(त्याचें तोंड कुरवाळून) बाळा, उगी. (सर्व सरदारांस) बाबांनों, कसा तुमचा उतराई होऊं? आजदिनपावेतों माझी पाठ राखून मजसाठीं आपली सर्वस्वाची हानि देखील करून घेतलीत! हे कोठें तुमचे उपकार फेडूं? ही तुमची मनोभावें सेवा ईश्वराकडे रुजु आहे. तोच तुह्मांला सुगति देऊन त्याची फेड करो.

**सर्वसैन्यः**-(राण्यास नमस्कार करून) तथास्तु सरकार!

**राणाभीम०ः**-मित्र हो, या पापबुद्धि शिखानष्टांच्या राजानें राजनीतिविरुद्ध, जनरीतिविरुद्ध, अशी कुरापत काढून हा आपल्यावर चालून आला. क्षत्रियानें शत्रूला पाठ दाखविणें हा त्याचा धर्म नव्हे. तथापि माझ्या प्रजेचा, माझ्या देशाचा, विनाकारण नाश न व्हावा याकरितां म्यां हर प्रयत्न केले; ते आपणां सर्वांस महशूर आहेतच. सामोपचाराच्या चार गोष्टी सांगितल्या. युद्धप्रसंग टाळण्याकरितां एकएक वीराचें द्वंद्व युद्ध करून, अथवा जरिपटक्या जरिपटक्यांची[1] झुंज लावून, त्याणें जय अपजय यांचा निवाडा करावा; असें बादशहास सांगून पाठविलें; खुद्द त्याचें माझें मल्लयुद्ध व्हावें ह्मणून देखील त्याला निमंत्रण केलें; परंतु नामर्द तो! त्याला आपले शूरांचे उपाय कशाला? आणखी या सर्व अनर्थाला कारण आपल्यांतलाच-तो घरभेद्या झालोरचा-

**सर्वसरदारः**-तोडा तोडा त्या निमकहरामाची जीभ! बुडवा त्या जातिबुडव्याला घोड्याच्या लिदींत! करा त्याचीं खांडें.

**राणाभीम०ः**-नाहीं. सरदारहो, त्याला पिटाळून माझ्या ताव-

---

१ दोन्ही पक्षांच्या जरिपटक्याचे हत्तींची लढाई लावून.

डीस द्या. तो माझा वांटा आहे. असो. या मुसंड्यांहीं आपल्या धरत्री मातेला जुलुमानीं पार ग्रासून टाकिलें आहे. सत्कर्म, नीति, दया हीं यांच्या गांवींही नाहींत. तरवारीच्या धारेनें यांणीं आपल्या सनातन हिंदुधर्माचा क्षय मांडिला आहे; सय्यद-कासीम, महमुद, शाहबुद्दीन इत्यादिकांनीं हिंदुस्थान लुटून, जाळून पोळून फस्त केलें; आतां हे दक्षिणेची रांगोळी करीत चालले आहेत; रामदेवरावाला यांणीं दगाबाजीनें जिंकला; रतनभोरच्या राजानें याच्या शरण आलेल्या दायादांना आश्रय दिला, तितक्याकरितां या दुष्टानें त्याचें जीवंतपणीं कातडें सोलून काढिलें ! गुजराथच्या राण्याची राणी व मुलगी बाटवून त्याला भयभंगाला लाविलें !! स्त्रीलोभानें चितूरवर ही याची तिसरी स्वारि !! साधुलोकांच्या यात्रा बंद पाडिल्या. मित्रहो, श्रीगुरुज्ञानराज महाराज सांगत होते–' दिल्लीस साधु नामदेव यांच्या ऐन भजन रंगांत या गोब्राह्मण द्वेष्ट्यांनीं कपिला गाय आणून तिचा सवत्स वध केला ' !!! शिव, शिव, शिव, शिव ! काय काय रे अनर्थ सांगूं कीं, जे ऐकून खऱ्या हिंदूचा नखशिखांत पेट होईल. अरे या क्रूर, नरपशु पादशहाचा कृतघ्नपणा कितीपण अनिवार आहे कीं, ज्या खंबीर मोगलांच्या खांड्याला भिऊन हा भेकरांसारिखा दिल्लींत कोंडून बसला होता, त्यांचा, जेव्हां जंगी लढवय्या सरदार झफरखान याणें फन्ना उडवून दाणादाण केली, अशा संधीस या अधमानें पाजीपणानें त्याचीच कत्तल करवून, त्या लढाईंत आपणाला गाजी ह्मणवून घेतलें ! अशा नष्टाला शरण जाणें कितीसें इष्ट आहे ? अशाला मारणें किंवा स्वयें मरणें हेंच योग्य.

सर्वसैन्यः–मारा-पोळा-जाळा त्याचे तंबु–

राणाभीम०:–बांधवहो, आधीं एकवार परस्पर भेटूं या.

( सर्व एकमेकांस भेटतात. )

राणाभीम०:–( समरभूमि पाहून ) हर हर ! हे आपले

इष्ट, मित्र, आप्त पडलेले आहेत– ( आकाशाकडे हात जोडून ) प्रभो जगदीशा, मजखातर या समरंगणांत पडून ज्यांहीं ज्यांहीं आपलीं उदार वक्षस्थलें अर्पून आपली स्वामिभक्ति गाजविली, त्यांच्या सेवेचें श्रेय करणारा तूं एक भक्तवत्सल समर्थ आहेस ! हा त्यांनां माझा नमस्कार. ( नमस्कार करितो ) माझ्या मृतबंधूहो, तुह्मांपैकीं कोणाविषयीं कोणी रडलें असो, नसो; परंतु निदानीं एक तरी प्राणी आहे कीं, तुमच्या दुःखाकरितां ज्याचे नेत्र साश्रु झाले आहेत ! आज जरी तुमचें नांव सुद्धां नष्ट जाहलें आहे, तरी कवि तुमची कीर्ति गातील! माझे स्वर्गस्थ बांधवांनों ! प्रस्तुत, तुह्मांला ज्यांणीं रणांगणांत छिन्नभिन्न करून पाडिलें त्यांचा सूड उगविण्याकरितां–तुह्मांसवें रणांत शयन करण्याकरितां सजून आलों आहों. तरी सर्व सरदार हो, ( सरदारांकडे बघतो. )

**सर्वसरदारः**–जी सरकार, हुजूर.

**राणाभीम०ः**–( तरवार परजून ) चला ! बघतां काय ? आपलीं बायकामुलें पुढें गेलीं; आपले सगेसोयरे रणांत तोंडें पसरून वाट पहात आहेत. तरी त्यांच्या या दुस्मान मारेकऱ्यांनां- चला, ' दे माय धरणी ठाव करूं. '

**सर्वसैन्यः**–चला; चला.

( पडद्या पलीकडे गर्जना होतात. ) दीन, दीन, बिर् राहेमान.

**राणाभीम०ः**–गड्यांहों, ज्या मुसंड्यांहीं तुमच्या देशाची नासाडी केली; ज्यांनीं तुमच्या संसाराची वाताहत केली; तुमचा कुळक्षय केला; तेच हे तुमचे दावेदार, वैरी, दुस्मान आल. तर हाणा–मारा–घ्या समाचार.

**सर्वसैन्यः**–मारा, मारा, मुसंडे; मारा हरामखोर, चला.

**राणाभीमसिंग आणि सर्व सरदार व सैन्यः**–जय,जय जगदंबे भवानी जयकालीमाते-जय विंध्यवासिनी-राणाजीकी जय,जय!

**भाटलोकः**–' लढो लढो भय्या ॥ लढो लढो भय्या॥ बकरीसरि तोडूं हे सुनिशिय्या ॥ हे सुनिशिय्या ॥ '

(निशाणें फडकत व रणवाद्यें वाजत, वीर लोक निघून जातात.)

## प्रवेश ६ वा.

स्थळः—रणभूमि. वेळः—संध्याकाळ.

( अल्लाउद्दीन बादशहा, त्याचा वजीर व कांहीं सरदार येतात.)

बादशाहः— ( आश्चर्ययुक्त ) काय अजब गोष्ट आहे. माझी फौज ' तोबा, तोबा ' करीत रानोमाळ पळत आहे; पाठीमागें चिमूटभर राजपूत टोळी लागली आहे ! अजून किल्ल्याच्या त्या भागाला माझे लोकांनीं टिकाव धरिला आहे. ( पुढें जातो व इकडे तिकडे पाहून. ) ओहोहो ! इकडे तर नुकतेंच घणघोर युद्ध होऊन गेलें आहे. काय मुडद्यांचे ढीग पडले आहेत; हत्ती, घोडे, स्वार—एकच खच बसला आहे; रक्ताच्या पाटांतून ढाली, पगड्या वाहताहेत; डोकीं तुटलेलीं धडें तरवारी, बरच्या हातांतल्या हातांत राहून सैरावैरा नाचताहेत—ओ अजब देखावा ! ते पहा दोन लांडगे, हातपाय हालवीत असलेल्या स्वाराला फरफरावीत जंगलांत नेताहेत; तों त्याचा इमानी घोडा तीन पायांवर लंगडत जाऊन त्यांनां चावत आहे,टांपा मारित आहे—वजीर,हा सैतानांचा महाल बनला आहे. ( पडद्या पलीकडे उच्च स्वरानें:—दुष्टा, नीच जंबुका, शेवटीं या सिंहाच्या तावडीस सांपडलास. आतां कोठें पळशील ? रे अधमा, त्या अविंधांहूनही तूं नीच. या तुझ्या कुलांगार रक्तानें मी आपल्या प्रतिज्ञेप्रमाणें ज्ञातीचें तर्पण करीन, मग तुझीं आंतडीं कोल्ह्या कुत्र्यांनां घालीन ! )

वजीरः—( कानोसा घेऊन ) नदीच्या वाळवंटाकडे राणाजींचा शब्द ऐकूं येत आहे. ( पुढें जाऊन, घाबरत ) खावंद, पुढें वाढूं नये—राणा जिवावर उदार आहे—तो पहा, माल-देवाचे छातीवर बसून त्याला छाटीत आहे. जसा चौताळलेला वाघ सावजाच्या नरड्याचा घोंट घेत आहे !

( सर्वजण आडून पाहतात. )

(राणाभीमसिंग तरवार उगारून मालदेवाचे छातीवर बसला आहे. )

राणाभीम०:—रे रे मनुष्य राक्षसा,तुझ्या पातकांच्या क्षालनार्थ या रणकुंडांत तुझ्या अवयव-यवांचा होम करितों. स्मर आ-

पल्या पातकांच्या राशी. ज्या या उजव्या हातानें माझ्या मु-नां, माझ्या शिक्क्याचीं खोटीं पत्रें पाठवून, त्यांनां परस्पर मारवीत होतास, त्याला हें प्रायश्चित्त घे. ( त्याचा उजवा हात तोडितो, व त्यांतून रक्त वाहूं लागतें. )

राणाभीम०:–( रक्त ओंजळींत धरून व तोंड आकाशाकडे करून ) हा माझे स्वर्गींचे पितरांनां तिळांजळी ! ( दुसरी ओंजळ भरून ) हा माझ्या मृतप्रजांनां–हा माझ्या गणगोताला–

( मालदेव आक्रोश करितो. )

राणाभीम०:–रे चांडाळा, ज्या पापी हातावर माझ्या पद्मिनीचें मस्तक त्या अरण्यांत धारण केलेंस त्यावर–भुजंगा, तें कृत्य कामवासनेनें केलेंस ह्मणून–हें प्रायश्चित्त घे. (त्याचा डावा हात तोडितो)अरे, स्वजाति सोडून ज्या दुसमान राजाला फितूर झालास त्यालाही ठकवून माझ्या पद्मिनीला पळवीत होतास–त्याच्या शाहजादीकरितां कुटिला, माझ्या कुंवरजीला धरून नेणार होतास ! पापिष्ठा, तुला नरक कुंडें सुद्धां शिवण्याला माघार घेतील !! ( त्याच्या रक्तानें ओंजळ भरून ) प्रिये पद्मिनी, जो नष्ट हात तुला शिवला त्याच्या रक्तानें हा तुला अंजळी घे.(ओंजळ सोडितो व दुसरी भरितो ) हा माझ्या स्त्रियांनां–हा माझ्या मुलांनां–(डोळ्यांस पाणी आणून ) लेंकरांनों मी पण लवकर तुमच्या भेटीला येत आहें ( मालदेवास ) अरे एक जिभेच्या सर्पा, माझ्या प्रजेमध्यें फंदफितुराचें विष कालवून परशत्रूला वाव दिलीस ! ज्या ज्या देशांत ज्या ज्या काळीं तुझें नांव निघेल तेव्हां ते तुझ्या नांवावर थुंकतील. आतां अंतकाळीं आपल्या म्लेंछांच्या पीरांचें स्मरण कर. ईश्वरा, असले घरबुडव्ये, देशबुडव्ये, माझ्या शत्रूच्याही देशांत न निपजोत.( तरवार मारण्याकरितां उंच करितो.)

( इतक्यांत बादल ओरडत ओरडत धांवत येतो. )

बादलः–राणाजी, थांबा मारूं नका त्याला क्षणभर. ते दोन मीं कलीचे अवतार आणिले आहेत, ते ह्याला पाहूंद्या. ( हात

१ सर्प अथवा जार.

बांधलेल्या पुरुषांस मालदेवा समोर आणून, मालदेवास उद्दे-
) कुलांगारा; एका घावांत तुझें मरण आहे—ह्मणून तरी खरं सांग; ह्या दोघां बेरडांना ओळखितोस ?

मालदेवः—( मान हालवून, रडत ) होय बादलजी. त्यांज-बरोबर मी आपल्या अपराधाला व शिक्षेलाही ओळखतों.

बादलः—काळतोंड्या, तुला एकदां ठार करण्यानें शासन पुरें होत नाहीं; प्रत्यहीं तुझे तिळतिळ तुकडे करून शेवटीं नाका कानांत तत सळया टोंचून प्राण घ्यावयाचा, असे शंभर मृत्यु तुला पाहिजे होते! राणाजी, आपले पहिले राजद्रोही राजासिंग, केसरीसिंग वगैरेनां आपण कृपाळू होऊन महायात्रेस जाण्यास रजा दिली, त्यांनीं हे आपल्याला हितशत्रु मागें ठेविले. यांच्या साह्यानें या दुष्टानें देवता, आकाशवाणी, अभद्र शकून इत्यादि करविलीं. दोघां राजपुत्रांनां आह्मी घेऊन जात असतां दुसऱ्या दिवशीं भरमध्यरात्रीं; काळोखमिट्ट पडला होता—मी राजपुत्रांच्या बाजूला पाहरा करीत बसलों होतों—इतक्यांत एक भयंकर किंचाळी ऐकूं आली. 'आई भूक भूक' इतक्यांत दुसऱ्या बाजूला दुसरा आवाज झाला, 'पुत्रा, या दोन राजकुमारांचे यवना करवीं उद्यां बळी पडून, तुला यथेच्छ भक्ष मिळेल!' निजलेली व जागी सर्व मंडळी एकत्र जमवून 'हा घाला येणार कोठून ह्मणून आह्मी चिंतातुर बसलों. तंव मातक्यानें तसेच शब्द झाले. त्या आवेशासरसा आपला जवानसिंग दातांत नागवी तरवार धरून—कांहीं अंतरावरच्या एका सरळसोट सात्विणीच्या झाडावरून तो शब्द आल्याच्या वहिमानें त्यावर चढला. आणि त्याच्या शेंड्यावर तरवारीचे इकडे तिकडे घाव मारणार तों 'शरणरे शरण; बाबा, मारूं नको.' असे दीनवाणी शब्द झाले! पुढें तपासाअंतीं हा एक मांग तेथें सांपडला. ( एकाला तरवार टोंचितो ) आणि हा दुसरा ( दुसऱ्यास तरवार टोंचितो. ) दुसऱ्या झाडावर सांपडला. हे जर सांपडतेना तर आमचा गोंध-

काशीयात्रेस.

ळ होऊन त्याच पहांटेस शत्रूंनीं आमची कत्तल केली असती; कारण, ह्यांनीं त्यांनां आमच्याविषयीं तावडतोब बातमी दिली होती. असो. अशींच ह्यांनीं सर्व इंद्रजाळें केलीं !

**राणाभीम०:**–(मालदेवास सोडून देऊन, रडत)हर हर,देवा, नहाक कीं रे मी आपलीं बाळें मृत्यूच्या दाढेंत दिलीं.हाय, हाय !

( वक्षस्थळ पिटीत मूर्च्छना येऊन पडतो. )

**बादल:**–( त्याला सांवरून ) राणाजी, राणाजी सावध व्हा. तें गलीमाचें लष्कर 'दीन दीन' करीत इकडे येत आहे.

( तो राण्याला वारा घालितो; व इकडे संधी पाहून मालदेव व दुसरे दोन बद्ध केलेले असामी पळ काढितात. )

**राणाभीम०:**–( सावध होऊन ) बादलजी, माझीं दोन्हीं मुलें सुरक्षित पोहोंचलीं ? माझ्या सरदारांचीं बाळें सर्व सुरक्षित ?

**बादल:**–जी, होय.

**राणाभीम०:**–मरणापूर्वी ही सुवार्ता आपण कळविलीत; काय काय आपले उपकार आठवूं ? ( मालदेव इत्यादि त्रिवर्गाला पळतां पाहून ) दुष्टानों, पळा, पळा. क्षत्रिय असून शत्रूला पाठ दाखवून रणांतून पळतां ? हेंच मला पाहिजे होतें. रणांत मरतेत तर तुह्मांला चांडाळांनां आणि आह्मांला एकच सुगति प्राप्त झाली असती; परंतु घ्या आतां या लोकीं अपकीर्ति आणि परलोकीं नरकवास ! बादलजी, या कुलहीनांच्या कुकृतींनीं आपलें काय केलें ? प्रस्तुतकाळा प्रमाणें, आपल्या धर्माप्रमाणें सर्वांनीं आह्मीं धारातीर्थांत देह पतन केले हेंच श्रेयस्कर. आणि श्रीगुरु ज्ञानराज महाराजांचीही अशीच आज्ञा होती कीं, 'अखेरपर्यंत लढाई कर.' तरी आतां क्षणमात्र परमात्म्याचें स्मरण करून समोरून येणाऱ्या सैन्यावर विशस्त्र तुटून पडूं. आपल्या सैन्याला येकत्र जमण्याचा डंका करा.

( बादल डंका पिटितो व राण्याचे लोक जमूं लागतात. )

**राणाभीम०:**–( हात पसरून ) या या, माझे आप्तजनहो, या.

( राणा व सर्व सैन्य हात जोडून परमेश्वराचें स्तवन करितात. )

### पद.

रागः—मालकंस. तालः—त्रिवट.

शरण तुला जगदीशा ॥ पाहि ॥ शरणतुला० ॥ध्रु० ॥ भूतावासा, भूतनिवासा ॥ भूतपति, भूतेशा ॥ पाहि ॥ शरण० ॥ १ ॥ मायामोहें नेणों तुजला ॥ सच्चिद्घनविश्वेशा ॥ पाहि ॥ शरण० ॥ २ ॥ या जड देहा देवा सोडवीं ॥ तोडीं आशापाशा ॥ पाहि ॥ शरण० ॥ ३ ॥

( पडद्यापलीकडे युद्धाच्या गर्जना होतात. ) दीन ! दीन !

सर्ववीरः—( गर्जनाकरून ) जय. जय जगदंब भवानी; जयविंध्यवासिनी; मातापुरनिवासिनीकी जय ! राणाजीकी जय!

भाटलोकः—" चलो चलो भाई ॥ चलो चलो भाई ॥ अडेल दडेल त्यासि रामदुहाई॥ रामदुहाई ॥

( वीर गर्जना करीत, वाद्यें वाजत, व गाणें गात, जातात. )

## प्रवेश ७ वा.

स्थळः— चितूरशहर. वेळः—संध्याकाळ.

(बादशहा अल्लाउद्दीन, त्याचा वजीर व इतर मुत्सदी लोक येतात.)

बादशाहः—वजीर, इतक्या संध्याकाळीं हें एकदम वादळ कोठून आलें ? हा तुफानाचा वारा—ढगें—हा गडगडाट—एकच गर्दी ! बिचारीं पांखरें, जनावरें सुद्धां भयानें किंचाळताहेत !

वजीरः—खाविंद, सकाळपासूनच आज दिवस बदलला आहे. (पडद्यापलीकडे आरोळी होते) 'पडला, पडला; राणाजी पडला'.

बादशाहः—वजीर, राणा पडला! (जरा थांबून ) हां, ही झाली आपल्या तोफांची सरबत्ती. ( माना डोलवून ) खचीत, खचीत वजीर, हें वादळ नव्हे, तर राणाभीमसिंगाला जमीन अस्मानांनीं अखेरची ही बडी सलामी दिली.

( एक स्वार दौडत येतो. )

स्वारः—( बादशहास सलाम करून ) खाविंद, राणा पडला ! ह्मणून खबर देण्याकरितां मला खाविंदांच्या कदमापाशीं पाठविलें आहे.

बादशाहः–(स्वारास)बरें,जा.लष्कर फिरविण्यास हुकूम सांग.

( स्वार निघून जातो. ).

बादशाहः–( डोळ्यांस रुमाल लावून ) वजीर ही वित्तम बातमी ऐकून डोळ्यांनां पाणी आलें. हुशार, सालस मनुष्य जरी वैरी असला तरी त्याचें मरण ऐकून आपल्या सग्यासोयऱ्यांच्या मरणासारखें दुःख होतें. आपल्यावर इलायची खूप मर्जी आहे; ह्मणूनच ही आपली मोहिम सर झाली. चला आतां शहरांत जाऊं.

( सर्वजण शहरांत जातात. )

बादशाहः–( इकडे तिकडे पाहून ) वजीर, शहरचे रस्तोरस्तीं मुर्द्यांचे गंज पडले आहेत; बड्याबड्या हवेल्या आहेत; पण आंत एक माणूस कीं बत्तिसुद्धां नाहीं !

वजीरः–खाविंद, सर्व तमामलोक लढून व जळून खाक झाले असें समजतें.

बादशहः–( चकित होऊन ) खाक झाले ? आणि राणीपद्मिनी ?

वजीरः–( लवून ) हां जाहपन्हाह, तीपण ! अस्सल इसमाला बेअब्रूपरीस जीवगेलेला पुरवतो!

बादशाहः–( खेदयुक्त ) ओहो होहो ! तोबा, तोबा ! काय बुराख काम झालें ! वजीर, आज दुनियेंतून अस्सलपणा–नाजुकपणा–गेला; गेला. आज ह्यांची ही दशा ! कोण जाणे, नशीबाचा सतारा फिरला तर उद्यां माझें काय होईल; माझ्या मुलांचें काय होईल ? माझे पुतण्ये माझे कांहीं भाईबंद माझ्या जिवावर उठले आहेत. (एकाएकीं दचकून) अरेरे, हीं माणसें जळल्याची घाण आली. ( नाकदाबितो ) ती तिकडे मोठी आग धडाडत आहे; तिकडे चला जाऊं.

( सर्वलोक एका जळत्या भुयाराकडे जातात. )

वजीरः–( भुयाराच्या तोंडाशीं एकटाच पुढें जाऊन ) सरकार, साप, साप ! मागें व्हा. वीत वीत अंगावर केस वाढले

।गें येऊन ) खाविंद, या भुयाराच्या तोंडाशीं एक भुजंग फोंफावत बसला आहे ! आंत अजून किंचाऱ्या आहेत ! बायकांचे ढीगच्या ढीग जळून खाक हित !!

( इतक्यांत मालदेव येतो. )

ादशाहः—( मालदेवास उद्देशून ) सैतानजादे, बघ हें तु‍२. गारुडी कसब. कसाया, राण्याचें निसंतान करून तुला काय मिळालें ? तुला मी भाक दिल्याप्रमाणें चितूरची गादी देणारच होतों; व आतां दिली. परंतु बेइमान्या, पद्मिनीचा हेवा धरून त्वां माझ्याशीं देखील दगाबाजी केली. थू तुझ्या जिण्यावर—थू तुझ्या—जातीवर-अरेरे, चूक झाली. तुझी जात किती नेकीची आहे; किती तरी तलवार बहाद्दर; आणि असला हा तूं त्या राव्यांत जातिबुडव्या कावळा पैदा झालास ? आपल्या देशाचा, आपल्या जातीचा, गोताचा, घात केलासरे हा तुझ्या तोंडावर जूता. जा तोंड काळेंकर. ( त्याच्याकडे पाठ फिरवितो ) वजीर, यांची ही असली कडक, नेकीची चालरीत जर माहित असती तर इतका कहर केला नसता. भीमसिंगासारख्या बिनमोल राजाला दोस्त केलें असतें; राणी पद्मिनीला आपली बहिण मानिली असती, जर या निमकहरामखोरानें तिजबद्दल मला खोड्यानाव्या बातम्या दिल्या नसत्या. ज्या मुलखांत असले पाजीइसम निपजतील तो देश सैतानाचें घर ! चला याचें वारेंसुद्धां घेऊं नका. आतां येथली हा पाहिजे ती व्यवस्था करो आणखी, या राण्याचे औरस वारस आहेत, त्यांचा शोध करून त्यांनां व त्यांच्या पिढीजाद नौकरांनां जाहगिरी निर्वेशनें, देऊन बादशाही अमदानीं खालीं अबादी अबाद राहंद्या; राणेसाहेबांचे नांवानें येथें एक शान मनोरा बांधा; आणि ही फत्तराला पाझर फोडणारी राण्याची बखर सोनेरी शाईनें लिहून दफ्तरीं ठेवा. व आमचे शाहजादे नेहमीं कुराणासारखी ती पढोत.

( सर्व सरदारांस अनुलक्षून ) बाबांनों, या पाजी मनुष्यानें

हलकटपणाकरून गादीही कमाविली; आणि त्या भल्या मनु मीनें राजरोसपणें, पण कमनशिबानें, ती गमावली; तरी य फजीती व त्याची वाखाणणीच करितील. या हलक्या मनुष्य च्या नादानें मी मात्र आपली पैशाची, फौजेची, अब्रूचं माणुसकीची फुकट नुकसानी करून घेतली. ( रडतो ) माझे पद्मिनी, ए माझे माई पद्मिनी, बाबा भीमसिंगा, ओ माझे भाई भीमसिंग, माफ करा; गय करा; मी खचीत तुमचा फार लाचार आहें. सर्व लोकांनो, माणुसकीविरुद्ध मजकडून गुन्हा घडला आहे; व मागेंही असे माझ्या हातून घडले, परंतु येवेळीं त्याची पुरी अद्दल घडली. मी फार फार शरमिंदा झालों आहे; तरी ही वेळ मला गय करा. तुह्मी सर्व भाईलोक, मी गरीब तुह्मांपुढें पदर पसरितों, झाली चूक गय करा; तरच बरे; नाहींतर मला तोंड दाखविण्याला देखील जागा नाहीं आतांच काळें करावें लागेल. ( मोठ्यानें ओरडून ) सर्वलोक मेहेरबानी करून थोडी माझी शेवटली विनंती ऐका:—

कवीत.

चाल:—' अजगर करेन चाकरी० ' ( इत्यादि सावकाश सुरावर )

॥ झाला माझा खेळ हा ॥ तुह्मांपरि हा त्रास ॥
॥ दिल्हा ऐसें वाटतें ॥ ह्मणवुनि होत उदास ॥ १ ॥
॥ गाजी तुह्मी देखिले ॥ थोर थोर इरसाल ॥
॥ मी तो गरीब बापुडा ॥ माझा कैंचा माल ॥ २ ॥
॥ करणी माझी आवडे ॥ तुह्मां, तरि तलवार ॥
॥ बिजली सारी चालवूं ॥ चमकत वारंवार ॥ ३ ॥
॥ निंदा, वंदा; दाम हीं ॥ जावो; किंवा नाम; ॥
॥ जातों आह्मी; गै करा ॥ बाबालोक सलाम ॥ ४ ॥

( बादशाह व सर्व लोक जातात. )

( पडदा पडतो. )

पांचवा अंक समाप्त.

# छापत आहे.

'जरठोद्वाह' नामक एक फार सुरस नाटक ह्या पुस्तक कर्त्यानें केलेलें सन १८८६ सालीं कोल्हापूर येथील राजाराम कॉलेजचे कमेटीकडे पाठविलें होतें. हें नाटक बक्षीस मिळवि-ण्याचे हेतूनें केलें होतें असें नाहीं, तर आलिकडे आपल्या लोकांतील लग्नाची चाल अगदीं बिघडली आहे, व त्यामुळें फार वाईट परिणाम होतात; त्यांतील एक हुबेहुब चित्र दाखवावें अशा उद्देशानें रचिलें; तेव्हां अर्थात् हें कमेटीच्या अटीबर-हुकूम लिहिलेलें नव्हतें हें उघड आहे; तथापि कमेटी व तिचे अध्यक्ष मेहेरबान प्रिन्सिपाल साहेब यांणीं त्याबद्दल उत्तम शेरा देऊन एक बदामचें बक्षीस देऊं केलें. परंतु आज-पर्यंत विशेष अडचणीमुळें तें छापण्याचें काम तसेंच मागें पडलें. तें पुस्तक आम्ही हल्लीं छापीत आहों; त्याचीं रायल द्वादशपत्रीं साच्याचीं दोनशेंवर पृष्ठें होतील. त्याचा ता. १ माहे जाने-वारी सन १८९० चे आंत सही देणारास आगाऊ किंमत १२ आणे ठेविली आहे. मागाहून किंमत जास्त पडेल. पुस्तकें जाने-वारी महिन्यांत तयार होऊन ग्राहकांस मिळतील. पत्रव्यव-हार खालीं सही करणाराकडे करावा.

केशवराव रावजी गाडगीळ.

आंग्र्याचा वाडा, मारकेट पोस्ट मुंबई.

---

विक्रीचीं ठिकाणें— कालिका देवीचे रस्त्यावर आंग्रे यांचे वाड्यांत प्रसिद्धकर्त्याकडे व नारायण गोपाळ हर्डीकर बुकसे-लर रामवाडी मुंबई यांजकडे मिळतील.